**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३

निर्णय दिनांक १६-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. सुभाष रतनसिंग महेर,<br>व्दारा पी. एम. राजपूत,<br>एन - ७, सी. १-३७, सिडको,<br>औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुभाष रतनसिंग महेर औरंगाबाद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे ॲडव्होकेट श्री. संतोष दस्तगार यांचेसह व जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. एम.

ए. खालीक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद हे सुनावणीस गैरहजर आहेत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्या कडील दिनांक १०-०१-२००६ रोजीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ ते डिसेंबर २००५ या कालावधी तील प्रभारी व कायम मुख्याध्यापंकाच्या नियुक्तीबाबत व मान्यतेबाबत खालील प्रमाणे माहिती विचारली होती.

१. “ जिल्ह्यातील कोणकोणत्या मान्यताप्राप्त खाजगी अनुदानीत व अंशतः अनुदानित माध्यमिक शाळामध्ये प्रभारी मुख्याध्यापक नेमले आहे व त्यास आपण मान्यता दिल्या आहेत.

२. प्रभारी मुख्याध्यापकांच्या नियुक्त्या करणा-या शाळांची माहिती व अशा शाळेच्या / संस्थेच्या शिक्षकांची सेवा जेष्ठता सूचीच्या प्रमाणित प्रती द्याव्यात.

३. प्रभारी मुख्याध्यापक नियुक्तीचे नियम व शासन आदेशाच्या प्रमाणित प्रती व सविस्तर माहिती.

४. प्रभारी मुख्याध्यापकाच्या नियुक्त्यांना आपण दिलेल्या मान्यतेच्या प्रमाणित प्रती व अशा शाळांच्या संच मान्यतेच्या प्रती द्याव्यात.

५. जिल्ह्यातील किती शाळांच्या सेवा जेष्ठता याद्या प्रमाणित आहेत अशा शाळांची याद्या व माहिती.”

सदर माहितीचा कालावधी हा अपीलार्थी यांनी १९९५-९६ ते डिसेंबर २००५ असा दर्शविला असून सदर माहिती ही व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०१-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देण्यात आला. सदर पत्र अपीलार्थी यांना प्राप्त झाले नसल्याचे अपीलार्थी

यांचे म्हणणे आहे तथापि जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले असल्याचे ते सांगत आहे व त्या प्रित्यर्थ त्यांनी पोस्टाचा पुरावा आयोगा कडे सादर केला आहे.

अपीलार्थी यांच्या म्हणण्यानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपीलामध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०५-२००६ व १०-०७-२००६ रोजी सुनावणी घेतली तथापि अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०३-२००६ च्या अर्जावर सुनावणी घेतली नाही तसेच जन अपीलीय अधिकारी यांनी त्यावर दिलेल्या निर्णयाची प्रत अपीलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले.

अपीलार्थी यांच्या म्हणण्यानुसार जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही तर जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार ही सुनावणी घेतली गेली आहे. सदर अपील निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी यांच्या वकीलानी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे प्रथम जन अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले व प्रथम सुनावणीच्या वेळेस त्यांना काहीही सांगावयाचे नाही असे विधान केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपीलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे आणि जन अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्यामुळे (असे अपिलार्थीचे म्हणणे आहे) व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदींनुसार दिनांक १२-०५-२००६ रोजी राज्य माहिती

आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांना आयोगाने प्रथम अपीलाची सुनावणीची घेण्याचे आदेश द्यावेत व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वेळेत माहिती न दिल्याबद्दल शास्ती लावावी अशी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती ती माहिती त्यांनी अपीलार्थीस पुरविली आहे तथापि अपीलार्थी यांनी केलेल्या अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी केली नसल्यामुळे त्यांनी सरळ राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. जन अपिलीय अधिका-याकडील प्रथम अपिलावरील निर्णयाची वाट न पाहता आयोगाकडे व्दितीय अपिल करणे, प्रथम अपिलावरील सुनावणीमध्ये व्दितीय अपिलचा संदर्भ देऊन आपले म्हणणे न मांडणे ही अपिलार्थीची कृती विसंगतीपूर्ण आहे त्यामुळे या प्रकरणी प्रथम अपिलावरील सुनावणी अपरिहार्य आहे असे आयोगास वाटते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता आणि दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेता असे आदेश देण्यात येत आहेत की, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक १०-०१-२००६ चा माहिती अर्ज, जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा. जर अपीलार्थीस हे निर्णय मान्य नसेल तर अपीलार्थी राज्य माहिती आयोगा कडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्या पासून १५ दिवसाचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष रतनसिंग महेर, व्दारा पी. एम. राजपूत,एन-७, सी. १-३७, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४

निर्णय दिनांक   १६-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. सुभाष रतनसिंग महेर,<br>व्दारा पी. एम. राजपूत,<br>एन - ७, सी. १-३७, सिडको,<br>औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा<br>परिषद, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा<br>परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुभाष रतनसिंग महेर औरंगाबाद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे ॲडव्होकेट श्री. संतोष दस्तगार यांचेसह व जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. एम. ए. खालीक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद हे सुनावणीस गैरहजर आहेत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्या कडील दिनांक २३-०१-२००६ रोजीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑक्टोंबर २००५ ते २१ जानेवारी २००६ या कालावधीतील शिवाजी एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी हायस्कूल खोकडपुरा या शाळेच्या झालेल्या चौकशीच्या मूळ चौकशी अहवालाची पुराव्यासह प्रमाणित प्रत मिळण्यासाठी अर्ज केला.

अपीलार्थी यांना हवी असलेली माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " शिवाजी एज्युकेशन सोसायटी कंधार संचलित शिवाजी हायस्कूल व शिवाजी कला विद्यालय, खोकडपुरा, औरंगाबाद या शाळेच्या नियमबाह्य कामकाजाविरुध्द श्री. धनेगावकर गट शिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियूक्त चौकशी समितीने केलेल्या चौकशीच्या मूळ अहवालाची पुराव्यासह प्रमाणित प्रत मिळणे."

सदर माहितीचा कालावधी हा अपीलार्थी यांनी ऑक्टोंबर २००५ ते २१ जानेवारी २००६ असा दर्शविला असून सदर माहिती ही नोंदणीकृत डाकेने अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २५-०१-२००६ च्या पत्रान्वये संबंधित चौकशी अहवालाची सत्यप्रत अपीलार्थीस अंडर पोस्ट सर्टिफिकेने पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे तथापि ही प्रत अपीलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थीस अपेक्षित माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक १६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १३-०६-२००६ रोजी

सुनावणीचे आदेश पारीत केले. या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीने मागितलेली सर्व माहिती पुरविण्याचे सुचित केले. अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांचे कडे अपील केल्यानंतर व या अपीलाच्या सुनावणीच्या तारखेपुर्वी दिनांक २४-०३-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ही माहिती पाठविल्याचे कळविले आहे व सदर माहिती प्राप्त झाली नसल्यास अपीलार्थी यांनी त्याचे लागणारे शुल्क भरल्यास ही माहिती अपीलार्थीस पुरविण्याची दिनांक २४-०३-२००५ च्या पत्रान्वये तयारी दर्शविली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपीलार्थीने व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक १२-०५-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यावर शास्ती लावण्याची तसेच जन अपीलीय अधिकारी यांना प्रथम अपीलावर निर्णय देण्यासाठी आदेशित करण्यासाठी आयोगास सुचविले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती पुरविली आहे तर सदर माहिती अपीलार्थी यांना प्राप्त झालेली नाही. तव्दतच जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००६ रोजी सुनावणीच्या वेळेस फक्त संबंधितांची हजेरी घेण्यात आली होती परंतु अपीलार्थी यांचा युक्तीवाद झाला नाही व सुनावणी संपली. या सुनावणीच्या वेळी जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद हे जागेवर हजर नव्हते असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००६ रोजी सुनावणी घेतली व दिनांक १३-०६-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला. या निर्णयाची प्रत अपीलार्थी यांना अद्यापही मिळाली नाही

असे अपीलार्थी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत. अर्थात या सुनावणीमध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थी यांनी यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती देण्याचे सुचित केले आहे त्यामुळे अपीलार्थीने आयोगाकडे केलेल्या प्रथम अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी परत सुनावणी घेण्याच्या त्यांच्या विनंतीचा विचार करण्याचे आता कारण उरले नाही. अपीलार्थीने मागितलेली माहिती आज देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे असे जन माहिती अधिकारी आज सुनावणीमध्ये सांगत आहे. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (अहवाल व पुराव्याच्या प्रतीसह) अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य व सांक्षांकित करुन द्यावी.

वरील विवेचनासह अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (अहवाल व पुराव्याच्या प्रतीसह) हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य व सांक्षांकित करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष रतनसिंग महेर, व्दारा पी. एम. राजपूत,एन-७, सी. १-३७, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९१/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १६-०७-२००७.

१. श्री.व्यंकटेश ईलेक्ट्रीक कंपनी तर्फे .. अपिलार्थी.
मुखत्यारनामा आम तथा व्यवस्थापक,
श्री.व्दारकादास गोविंद प्रसाद बजाज
रा.राहुल निवास, जुना मोंढा,
मु.पो.ता. गंगाखेड,
जिल्हा-परभणी- ४३१५१४.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम)
जिल्हापरिषद, हिंगोली.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद, हिंगोली.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. व्दारकादास गोविंदप्रसाद बजाज, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हापरिषद, हिंगोली, श्री.पी.के.गुप्ता, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत. जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. सुंदरलाल सावजी अर्बन को.ऑ. सहकारी बॅक शाखा शिवाजीनगर, परभणी यांच्या वतीने सहाय्यक व्यवस्थापक, श्री.वामन धोंडीबा रणखांब हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचे दिनांक- ०६-०२-२००६ च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून २००४-२००५ या कालावधीतील त्यांच्या कंपनीच्या नावावर केल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात एकूण ९ मुद्यावर माहिती मागविली होती. या माहितीमध्ये अर्जदाराच्या कंपनीच्या नावाने सहा कामाच्या निवीदा कोणी दाखल केल्या व कोणती कामे केली याचा तपशील, या कामाच्या बीलाच्या रक्कमेचा चेक कोणास व किती

रक्कमेचा दिला त्याची संपूर्ण माहिती, ही कामे ज्या अधिका-याच्या देखरेखीखाली करण्यात आली त्याची माहिती, ज्या शाखा अभियंत्याने सदरील कामाचे मार्कआऊट कोणास दिले याची संपुर्ण माहिती, सहा कामे ज्या कंपन्यानी केली त्याची निवीदा नक्कल, या कामाचे चेक कोणी व कोणत्या अकांऊटमध्ये वठविले त्याचा तपशील, दिनांक- २३-०९-२००५ रोजी अर्जदाराने मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी अर्थ विभाग, जिल्हापरिषद हिंगोली यांना कुरीयरने पाठविलेल्या अर्जाची नक्कल, चेक स्विकारणा-या व्यक्तिचे नाव व अर्जदाराच्या कंपनीच्या नावाने ज्यांनी काम केले त्यांचा तपशील - या मुद्याचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक- ३५३/ २००६, दिनांक- २०-०३-२००६ अन्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये एकूण ६४२/- रुपये इतक्या रक्कमेचा भरणा, ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणून, भरण्याचे सूचीत केले. जनमाहिती अधिकारी यांच्या वरील पत्रावर जरी दिनांक- २०-०३-२००६ अशी तारीख दर्शविली असली तरी अपिलार्थीस ते पत्र दिनांक- जून, २००६ मध्ये १५ किंवा १६ तारखेला प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी हे पत्र दिनांक- २०-०३-२००६ रोजी दिले असल्याचे व पोष्टाने टाकले असल्याचा कोणताही ठोस पुरावा ते आज आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीने सदर रक्कम जिल्हापरिषदेच्या कोषागारामध्ये दिनांक- १०-०८-२००६ रोजी भरली. अपिलार्थीने ही रक्कम भरण्यापृष्ठयर्थ अपिलार्थीस देण्यात आलेल्या पोंचपावतीचा क्रमांक ४९७४३ व दिनांक १०-०८-२००६ असा आहे. अपिलार्थीने आवश्यक ती रक्कम भरल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पोष्टाने पाठविली व ती अपिलार्थीस दिनांक- १९-०८-२००६ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी

यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, संबंधीत कामांच्या निवीदाच्या झेरॉक्सप्रती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २९-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. जनअपिलीय अधिकारी यांनी या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्याच बरोबर आज सुनावणीसाठी जनअपिलीय अधिकारी यांना दुस-यांदा बोलावून देखील जनअपिलीय अधिकारी गैरहजर राहीले आहेत. या बाबीची येथे प्रकर्षाने नोंद घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. एकंदरीत या प्रकरणाचे गांभीर्य पहाता जनअपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाकडे दुस-यांदा सुनावणीस बोलाविल्या नंतरही गैरहजर राहणे, ही त्यांची कृती त्यांच्यातला राज्य माहिती आयोगाप्रती असलेला अनादर व बेजबाबदारपणा स्पष्ट करण्यास पुरेशी ठरते, असे राज्य माहिती आयोगाचे मत आहे. त्यांच्या या बेपर्वाइ वर्तनाची नोंद यथा योग्यरित्या सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी घ्यावी, असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारचा प्रतिसाद मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या कंपनीच्या नावावर जिल्हापरिषदेच्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी मिळून रुपये २,९५,६५०/- इतक्या रक्कमेचा अपहार केला आहे. प्रश्नाधीन सहा कामे ही अपिलार्थी यांनी केली नसून जिल्हापरिषदेच्या कर्मचा-यांनी व अधिका-यांनी त्यांच्या कंपनीच्या नावावर ही कामे झाल्याचे दाखवून बीले काढली व त्या

प्रित्यर्थ मिळालेले चेक सुंदरलाल सावजी को-ऑ.बँक, शाखा शिवाजीनगर, परभणी येथे जमा करुन नंतर त्या खात्यातून पूर्ण रक्कम त्यांनी काढून घेतली व अशा प्रकारे रक्कमेचा अपहार केला.

यावर जनमाहिती अधिकारी यांना स्पष्टीकरण विचारले असता, जनमाहिती अधिकारी व त्यांच्याबरोबर असलेले त्यांचे सहाय्यक यांनी हा प्रकार झाला. त्यावेळी ते कार्यालयात कार्यरत नसल्याचा आयोगापुढे ( सध्याचे जनमाहिती अधिकारी यांनी ) दावा केला. आम्ही त्यावेळी कार्यरत नव्हतो या खेरीज करुन जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीमध्ये काहीही सांगितले नाही. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती व अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त अ-१ या सहा निवीदेची झेरॉक्सप्रती पुरविल्या आहेत, असे दिसून येते. तथापि ही निविदा निश्चीती करतांना इतर कोणत्या कंत्राटदाराने निवीदा दाखल केल्या त्या निवीदाच्या प्रती अपिलार्थीस मिळाल्या नाहीत. त्याचबरोबर ही कामे केल्यानंतर एकूण किती बील झाले व किती रक्कमेचा चेक काढला, तो कोणास दिला व तो कोठे वठविला, या संदर्भात कोणतीही माहिती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. यावर जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे विचारले असता, जनमाहिती अधिकारी यांनी आता ही माहिती ते अपिलार्थीस दोन तीन दिवसात देण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित चेक ज्या बँकेत वटवले त्या बँक खात्याचा माहिती संदर्भात संबंधित बँकच्या व्यवस्थापकाचे या माहिती संदर्भात म्हणणे ऐकून घेण्यासाठी विचारले असता, सुंदरलाल सावजी नागरी सहकारी बँकेचे सहव्यवस्थापक यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ हा सहकार बँकेस लागू नसल्याचे आयोगापुढे सांगितले. त्या पृष्ठयर्थ त्यांनी सहकार आयुक्त यांचे परिपत्रक दाखविले. सहकारी आयुक्तांच्या या परिपत्रकावर आयोगाने वेळोवेळी भाष्य केले असून आयोग माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकाना लागू होतो या

मतावर ठाम असून अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती बँकेच्या व्यवस्थापकाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या आधीन राहून अपिलार्थीस त्यांनी देणे अनिवार्य आहे. याचा पुनरोच्चार आयोग येथे करित आहे.

या प्रकरणी अपिलार्थीचे नावाने दुस-या कोणी तरी व्यक्तींनी कामे करुन या कामांचे चेक परभणी येथील सुंदरलाल सावजी को.ऑ.बॅक, शिवाजीनगर शाखेत जमा करुन, पैसे उचलल्याच्या अपिलार्थी यांच्या आरोपात तथ्यांश असल्याचे नाकारता येत नाही. या प्रकरणात अपिलार्थीने जिल्हापरिषदेच्या अधिका-याकडे ब-याचवेळा पत्रव्यवहारही केलेला दिसतो. त्याचबरोबर या प्रकरणा संदर्भात वर्तमानपत्रातूनही बातम्या छापून आल्याचे दिसून येत आहे. तव्द्तच अपिलार्थीने त्यांचे गा-हाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, हिंगोली, जिल्हा पोलीस अधिक्षक, हिंगोली, पोलीस- स्टेशन गंगाखेड येथेही या प्रकरणी ब-याचवेळा अर्ज करुनही या संदर्भात अद्यापपावेतो अंतिम कार्यवाही पूर्ण झालेली दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी आयोगास दाखविलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी जिल्हापरिषदेचे संबंधित विभागाचे कर्मचारी / अधिकारी यांनी या ना त्या प्रकारे अपिलार्थीस माहिती मिळविण्याच्या त्यांचा हक्क बजावण्यामध्ये अडथळा आणला असल्याचे आयोगास जाणवते. आयोगास सादर करण्यात आलेल्या निवीदाच्या झेरॉक्सप्रतीमध्ये कंत्राटदार म्हणून ज्या व्यक्तींची स्वाक्षरी आहे, ती स्वाक्षरी व अपिलार्थी यांची स्वाक्षरी यामध्ये सक्रुतदर्शनी फरक दिसून येतो. त्यामूळे अपिलार्थीने केलेल्या आरोपास पृष्टी मिळण्यास मदत होते, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस न देण्यामध्ये कोणतेही समर्थनीय कारण अस्तित्वात असणे शक्य नाही व त्याचबरोबर अपिलार्थीस योग्य तो न्याय मिळण्याच्या दृष्टीने ,या प्रकरणातील कागदपत्रे पाहिली असता, या प्रकरणी वरिष्ठ अधिका-यांनी लक्ष घातल्याशिवाय या प्रकरणाचा छडा लागेल, असे दिसून येत नाही. तेंव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की,

१. सर्व प्रथम जिल्हापोलीस अधिक्षक, हिंगोली यांनी या प्रकरणी आपला तपास दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन या तपासामध्ये ज्या व्यक्ती दोषी असतील त्यांच्या विरुध्द प्रचलित नियमानूसार योग्यती कारवाई करावी.

२. अपिलार्थीस अद्यापही जी माहिती पुरविण्यात आली नाही ती संपूर्ण माहिती स्वाक्षांकित करुन जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थी यांनी या प्रकरणात सुंदरलाल सावजी अर्बन को- ऑ- बॅक शाखा शिवाजीनगर, परभणी हया बँकेकडे अर्ज केल्यास त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती, बँक व्यवस्थपनाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या आधीन राहून, त्यांचेकडे अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून, सात दिवसाच्या आत द्यावी.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट व उशीरा माहिती पुरविली त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे सिध्द होत असल्याने या प्रकरणी सर्व संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदी अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने विभागीय चौकशी प्रस्तावित करावी / करावी. संबंधीत प्राधिकरणाने ही चौकशी तीन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अहवाल आयोगास तद्नंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हापोलीस अधिक्षक, हिंगोली यांनी या प्रकरणी आपला तपास दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन या तपासामध्ये ज्या व्यक्ती दोषी असतील त्यांच्या विरुध्द प्रचलित नियमानूसार योग्यती कारवाई करावी / प्रस्तावित करावी.

३. अपिलार्थीस अद्यापही जी माहिती पुरविण्यात आली नाही ती संपूर्ण माहिती स्वाक्षांकित करुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत पुरवावी.

४. अपिलार्थी यांनी या प्रकरणात सुंदरलाल सावजी अर्बन को- ऑ- बॅक शाखा शिवाजीनगर, परभणी हया बँकेकडे अर्ज केल्यास त्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती, बँक व्यवस्थपनाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या आधीन राहून, त्यांचेकडे अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून, सात दिवसाच्या आत द्यावी.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविली व अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे सिध्द होत असल्याने या प्रकरणाशी सर्व संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ व इतर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने विभागीय चौकशी अथवा इतर कार्यवाही प्रस्तावित करावी / करावी. संबंधीत प्राधिकरणाने ही चौकशी तीन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अहवाल आयोगास तद्नंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- १६-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.व्यंकटेश ईलेक्ट्रीक कंपनी तर्फे मुखत्यारनामा आम तथा व्यवस्थापक,
श्री.व्दारकादास गोविंदप्रसाद बजाज, जुना मोंढा, गंगाखेड, जिल्हा-परभणी.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभिर्येता (बांधकाम) जिल्हापरिषद, हिंगोली, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,हिंगोली, यांना अर्जदाराच्या शपथपत्राच्या झेरॉक्सप्रतीसह योग्य त्या कारवाईस्तव देण्यात येते.

४ जिल्हा पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना वरील निर्णयाप्रमाणे कारवाई करण्यास्तव देण्यात येते.

५ सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कारवाइस्तव देण्यात येते.

६ सचिव, सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कारवाईस्तव देण्यात येते.

७ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३५९/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक १७-०७-२००७.

१. श्री.सदाशिव सटवा रायबोळे, .. अपिलार्थी.
व्दारा/- ॲड.जि.एस.रायबाळे,
सरस्वती कॉलनी, किनवट
(सिध्दार्थ कॉम्पलेक्स)ता.किनवट,
जिल्हा- नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग क्रमांक-१,भोकर,श्री. विठ्ठल यंशवत बिरादार, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, श्री. सु.अ.वाढेकर, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी, श्री. भांगे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- ३१-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचे सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक-१, किनवट यांच्याकडून त्यांच्या कार्यालया अंतर्गत प्रगतीत असलेले व पूर्ण झालेल्या कामांची टपालाव्दारे माहिती मागविली होती. त्याचबरोबर अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखाली असल्याचे प्रमाणपत्र या अर्जासोबत जोडल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागविलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

“१. उपजिल्हाधिकारी कार्यालय किनवट या शासकिय इमारतीच्या जुन्या व नविन टेंडरची अंदाजित किंमत. वरिष्ठ इमारतीचे कामाचे केलेले वीस तुकडे कामाची माहिती. गुतेदाराचे नावा गावासहित देणे.

२. शासकिय गोदामे, शासकिय इमारती, कार्यालय, विश्रामगृह दुरुस्ती केलेल्या कामाची माहिती कामाचे व गुतेदाराचे नावागांवासहित माहिती देणे. एमबी पुस्तीके प्रमाणे माहती देणे.

३. ५०,०००/- रुपयाची फुटकळ कामाची माहिती कामाचे नावागावासहित.

४. पॅक्च वर्कच्या केलेल्या कामाची माहिती कामाचे नावागावासहित देणे.

५. मौ.कोठारी (चिं.) पुलाच्या दुरुस्ती कामाची इस्टीमेटप्रमाणे माहिती.

६. आय.टि.आय. कॉलेजच्या सिमेंट नाली व ग्रॉउन्डवर खर्च केलेल्या कामाची माहिती इस्टीमेट प्रमाणे देणे व एम.बी. प्रमाणे देणे.

७. गोंकूदा विश्रामगृहाच्या दूरुस्ती प्रमाणे कामासाठी सन २००४ ते २००६ या कालावधीत कोणत्या कामावर किती खर्च केला ती सविस्तर माहिती.

८. सध्या प्रगतीपथावर चालू असलेल्या सर्व कामाची माहिती कामाचे नावांगावासहित कामाचे अंदाजपत्रकिय किंमतीनूसार सविस्तर माहिती देणे.”

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये माहिती अधिकारी हे कार्यकारी अभियंता असून संबंधित अधिक्षक अभियंता हे जनअपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने त्यांचा दिनांक-३१-१०-२००६ रोजीचा जो अर्ज केला आहे तो सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे केला आहे. वास्तविकतः सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी हा अर्ज संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांना हा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार गरजेचे होते. तथापि त्यांनी अशी कोणतीहि

कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून आले नाही. याचे कारण विचारले असता, त्यांना हया कलमाची माहिती नव्हती असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या मागणी पित्यर्थ केलेल्या अर्जाची दखल सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी योग्य प्रकारे घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या अर्जाची दखल न घेण्याचे कारण त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती मुद्दा क्रमांक-६ वगळता या ना त्या स्वरुपात वेगवेगळया वेळी यापूर्वीच दिलेली आहे. त्यामूळे अपिलार्थीस ही माहिती परत देण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही व परिणामी ही माहिती अपिलार्थीस विहीत मदतीत पुरविली गेली नसल्याचे ते कबुल करीत आहेत. एवढेच नव्हे तर अपिलार्थीचा अर्ज देखील त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे न पाठविता त्यांच्याकडे तो तसाच ठेवून दिला असल्याचे दिसून येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याच प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल दिनांक- ०५-१२-२००६ रोजी केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलामध्ये त्यांनी, त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे जनअपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १६-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडून

प्राप्त होवू शकेल असे कळविले व  जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नियमानूसार उपलब्ध करुन देण्याचे याच पत्रामध्ये सूचीत केले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांचे हे दिनांक- १६-०१-२००७ रोजीचे पत्र जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २४-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगाच्या निदर्शनास आणले. तद्‌नंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती संबंधित उपविभागाकडून घेवून अपिलार्थीस दिनांक- २६-०२-२००७ रोजी पोष्टाने पाठविल्याचे सांगितले. सदर माहितीच्या पृष्ठांकित पत्राची प्रत अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध प्राप्त झाल्याचे अधिक्षक अभियंता यांनी सुनावणीमध्ये सांगितले. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी फक्त अपिलार्थीस एक पत्र पाठविले किंवा संपूर्ण माहिती पाठविली हे कळण्यास आता मार्ग नाही. कारण या प्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी हे आयोगास कोणताही ठोस पुरावा सादर करु शकले नाही. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी फक्त एकाच मुद्यावर माहिती दिल्याचे आयोगास सांगितले. तथापि तद्‌नंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यावर त्यांनी तद्‌नंतर दिनांक-१५-०६-०७ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास सांगितले. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे मिळालेल्या प्रतिसादामूळे  अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- १४-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सहाय्यक माहिती अधिकारी व जनमाहिती अधिकारी, जनअपिलीय अधिकारी या तिघाही अधिका-याकडून हे प्रकरण अत्यंत निष्काळजीपणे व बेपर्वाइपणे प्रकरण हाताळले गेले आहे. मूळात हा अर्ज सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पाच दिवसाच्या आत पाठवयास हवा होता परंतू त्यांनी ही कृती अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतरही केली नाही. यावरुन त्यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या नियमाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर  या कृतीव्दारे त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, ज्याप्रकारे अपिलार्थीस  एक साधे पत्र लिहीले आहे  तो प्रकार म्हणजे  अपीलाची सुनावणी कशी असू नये याचा उत्तम नमूना आहे. याच प्रकारे संबंधित जनअपिलीय अधिकारी यांनी इतरही प्रकरणात अशा प्रकारची चूकीची पुनरावत्ती केल्याचे आयोगास दिसून आले आहे. यामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जाकडे पहाण्याचा त्यांचा उदासिन दृष्टीकोन स्पष्ट होतो. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जनअपिलीय अधिकारी यांचा निर्णय कळविल्या नंतरही  प्रथम दिनांक- २६-०२-२००७ रोजी काही मुद्दे  व तद्नंतर दिनांक- १५-०६-२००७ रोजी उर्वरीत माहिती देणे, ही त्यांची कती देखिल त्यांच्यातील या प्रकरणासंदर्भातील उदासिनता स्पष्ट  करते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पहाणी करता अपिलार्थीने मागणी केलेल्या  माहितीचे स्वरुप व व्याप्ति सर्वसाधारण व मोठे असले तरी त्यातील काही मुद्यावर, ज्या मुद्यांवर अपिलार्थीने विशीष्ट कामा संदर्भात माहितीची मागणी केली आहे ती विहीत मदतीत पुरविण्यास कोणतीही अडचण नव्हती. तथापि माहितीच्या अधिकारामध्ये प्राप्त

झालेल्या अर्जाकडे मूळात उदासिन दृष्टीकोन ठेवून त्यावर काहीही कार्यवाही न करणे, ही कृती जनमाहिती अधिकारी यांच्यातील गलथानपणा व बेपर्वाइचे दर्शन घडविते. अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज दिनांक- ३१-१०-२००६ या तारखेचा आहे तर अपिलार्थीस अंतिमतः माहिती मिळाल्याचा दिनांक- १४-०२-२००७ हा आहे. म्हणजेच अपिलार्थीस ही माहिती मिळण्यास विहीत कालावधी पेक्षा एकूण ८६ दिवस इतका उशिर झाला आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती इतर वेगवेगळया अर्जा संदर्भात दिली गेली असली तरी ज्या एका विशीष्ट प्रकरणी अपिलार्थीने अर्ज केला तर त्या विशिष्ट प्रकरणी अपिलार्थीस ती माहिती देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अनिर्वाय आहे. याची जाणीव जनमाहिती अधिकारी यांना करुन देण्यात येत आहे. सहायक माहिती अधिकारी , जनमाहिती अधिकारी ते जनअपिलीय अधिकारी हया कोणासही माहिती अधिकार अधिनियम २००५ चे ज्ञान नसल्याचे व ते ज्ञान प्राप्त करुन घेण्याची त्यांची इच्छा नसल्याचे या प्रकरणामध्ये स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या क्षेत्रीय अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ते किमान ज्ञान अद्यापही प्राप्त झाले नसल्याचे या प्रकरणावरुन दिसून येते. करिता सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांना असे सूचित करण्यांत येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचा-यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ते प्रशिक्षण देण्यासाठी या विषयावर वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे सर्वसाधारण (general ) स्वरुप सर्वसाधारण अशा प्रकारचे आहे. हे पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी जरी माहिती देण्याचे मुद्दामहून किंवा दुष्टहेतूने टाळली नसल्याचे सिध्द होत असले तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास उशिर केला, हे सिध्द होते. जनमाहिती अधिकारी व सहायक जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी उशिर केल्याबद्दल त्यांचेवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

यांनी यथायोग्यरित्या प्रशासकीय कार्यवाही करावी व आयोगास  अंतिम अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत पाठवावा. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील  अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी व सहायक जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी उशिर केल्याबद्दल त्यांचेवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यथायोग्यरित्या प्रशासकिय कार्यवाही करावी व आयोगास  अंतिम अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत पाठवावा.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांना असे सूचित करण्यांत येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचा-यास प्रशिक्षण देण्यासाठी या विषयावर कार्यशाळा / शिबीरे  वेळोवेळी आयोजित करावीत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- १७-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.सदाशिव सटवा रायबोळे, सरस्वती कॉलनी, किनवट, जिल्हा- नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, यांना अर्जदाराच्या शपथपत्राच्या झेरॉक्सप्रतीसह योग्य त्या कारवाईस्तव देण्यात येते.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कारवाईस्तव देण्यात येते.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३६०

निर्णय दिनांक १७-०७-२००७

श्री. सदाशिव सटवा रायबोळे, : अपीलार्थी

व्दारा ॲड जि. एस. रायबोळे,

सरस्वती कॉलनी, (सिध्दार्थ कॉम्प्लेक्स)

किनवट, तालुका किनवट जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग, भोकर, जिल्हा नांदेड

२ सहाय्यक जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक

बांधकाम उपविभाग, माहूर, तालुका माहूर

जिल्हा नांदेड

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम

मंडळ नांदेड जिल्हा नांदेड

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे, किनवट हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड श्री. विठ्ठल यशवंत बिरादार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर, तालुका माहूर जिल्हा नांदेड श्री. सुर्यकांत रघुनाथराव बिरादार व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड जिल्हा नांदेड श्री. सुनिल आण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००६ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती.

१. "शासकीय गोदामे, शासकीय इमारती, कार्यालये, विश्रामगृह दुरुस्ती केलेली माहिती कामाचे व गुत्तेदाराचे नावागावासहीत माहिती.

२. ५०,००० रुपयांची फुटकळ कामाची माहिती देणे,

३. कार्यालयीन महिनेवारी खर्च केलेल्या वर्क्सची माहिती देणे, खर्च केलेल्या कामाची नावागावासहित माहिती देणे, वावचर सहीत माहिती देणे,

४. प्रगतीपथावर चालू असलेल्या सर्व कामांची माहिती कामाचे नावागावासहित कामाचे अंदाजपत्रकीय किंमतीनुसार सर्व कामाची माहिती देणे, एम. बी. पुस्तकानुसार माहिती देणे,

५. पॅचींग वर्कच्या कामाची माहिती कामाचे नावागावासहित देणे,

६. दिनांक १२-०७-२००६ रोजी दिलेल्या माहिती अर्जात मागितलेली माहिती व या अर्जात मागितलेली माहिती तात्काळ देणे."

सदर माहिती अपीलार्थीने शिघ्र पोस्टाने मागितली असून या अर्जासोबत अपीलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील असल्याबद्दलचे प्रमाणपत्र जोडले आहे.

अपीलार्थीने हा अर्ज माहिती अधिका-याऐवजी सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे केला आहे. सहाय्यक माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या या अर्जावर कोणतीही कारवाई न करता तो अर्ज विना कारवाई त्यांच्या कार्यालयात ठेऊन घेतला. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक ०८-१२-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीस दिनांक १६-०१-२००७ रोजी एक पत्र देऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केल्याचे व अपीलार्थीस हवी असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिका-यांकडून प्राप्त होईल असे कळविले. जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीच्या अपीलाची अशी विल्हेवाट लावणे हे गैर आहे. जन अपीलीय अधिकारी यांची ही कृती त्यांचा माहिती अधिकार कायद्याविषयी अनादर व त्यांच्या मधील बेपर्वाई स्पष्ट करते. त्यांच्या या वर्तनाची नोंद सचिव सार्वजनिक

बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०१-२००७ च्या अपीलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्येच त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. त्यास अनुसरुन अपीलार्थीस जन माहिती अधिका-याकडून दिनांक १६-०३-२००७ रोजी माहिती देण्यात आली. ही माहिती अपीलार्थीस मिळाल्याची पोहोच पावती जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केली आहे. तथापि अपीलार्थीच्या या पत्रावरील सही व मूळ अर्जावरील सही त्याच्यामध्ये तफावत दिसून येत आहे त्यामुळे अपिलार्थीस खरोखरी माहिती प्राप्त झाली किंवा कसे कळण्यास मार्ग नाही.

अपीलार्थीने त्यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १६-०१-२००७ रोजी पाठविलेल्या जन अपीलीय अधिकारी यांच्याकडील आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाच्या माहितीची अंदाजे एक महिना वाट पाहून माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक १४-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे दिसून आले की, सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपीलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो त्यांनी जन माहिती अधिका-याकडे ५ दिवसाच्या आत पाठवावयास हवा होता व त्याची प्रत अपीलार्थीस द्यावयास हवी होती तथापि त्यांनी अपीलार्थीच्या या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता सदर अर्ज स्वतःकडे बिना कारवाई ठेऊन घेतला. जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेली मूळ माहिती जन माहिती अधिका-याकडून घेण्यासाठी दिनांक १६-०१-२००७ चे पत्र अपीलार्थीस लिहिले व एक प्रत जन माहिती अधिका-यास रवाना केली. त्यावरुन पहिल्यांदा जन माहिती अधिका-यास आपल्याला ही माहिती द्यावयास आहे याची कल्पना

आली.  तथापि ही कल्पना येऊनही जन माहिती अधिकारी यांनी पुढील विहित कालावधीत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही व विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतर दिनांक १६-०३-२००७ रोजी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे.

या प्रकरणातील अपीलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती न मिळण्यास प्रामुख्याने सहायक जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे दिसून येते व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी देखील आपले कर्तव्य वेळेत पार न पाडून त्यांच्यातील कार्यप्रणाली मध्ये असलेल्या कार्यक्षमतेचा अभाव सिध्द केला.  अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती ही विस्तृत व सर्वसाधारण स्वरुपाची असल्याचे दिसून येते.  अपीलार्थीने या प्रकरणी कोणत्याही एका विशिष्ट कामासंदर्भात माहिती मागितली नसून सदर उपविभागाकडे असलेल्या सर्व कामाच्या बाबीतील सर्व माहिती विचारल्याचे दिसून येते.  अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप, त्याची व्याप्ती सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्यास प्रतिसाद न देणे, जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेणे,व जन माहिती अधिकारी यांनी प्रथम सुनावणी संदर्भात जन अपीलीय अधिकारी यांचे कडून पत्र प्राप्त झाल्यानंतरही २ महिन्याने अपीलार्थीस माहिती देणे या सर्व गोष्टी पाहिल्या असता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांना एक तर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे ज्ञान नसावे किंवा ते पूर्णतः बेजबाबदार आहे हे दोनच विकल्प पुढील कार्यवाहीसाठी आयोगाकडे उरत आहेत.  आता अपीलार्थीस उशीराने का होईना परंतु माहिती प्राप्त झाली आहे. परंतु माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे पालन कोणत्याही क्षेत्रीय अधिका-याने आवश्यक त्या गांभीर्याने केलेले नाही हेही त्याच बरोबर सिध्द होत आहे.  आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करुन असे आदेशित करण्यात येते की, सचिव सार्वजनिक बांधकाम यांनी या प्रकरणात सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या

निष्काळजीपणा व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) प्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई पूर्ण करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा व त्याच बरोबर त्यांच्या अधिनस्त असलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय मुंबई यांनी या प्रकरणात सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या निष्काळजीपणा व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) प्रमाणे योग्य ती प्रशासकीय कारवाई पूर्ण करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय मुंबई यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, व्दारा ॲड जि. एस. रायबोळे, सरस्वती कॉलनी,

(सिध्दार्थ कॉम्प्लेक्स) किनवट, तालुका किनवट जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माहूर, तालुका माहूर जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रा तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड जिल्हा नांदेड

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३६२

निर्णय दिनांक १७-०७-२००७

श्री. रविंद्र शिवाजीराव केसकर, : अपीलार्थी

जिल्हाध्यक्ष, ए. आय. एस. एफ. उस्मानाबाद,

विजय चौक, जुनी गल्ली, दर्गा रोड,

उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. रविंद्र शिवाजीराव केसकर हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद डॉ. एस. एम. साळूंके (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी श्री. जी. बी. राठोड अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम जिल्हाधिकारी, अध्यक्ष बोगस डॉक्टर शोधन समिती, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ दिनांक २३ मार्च २००५ रोजी दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक पुण्यनगरी मधून जिल्हाधिकारी मा. एस. एस. देवणीकर यांनी ९ बोगस डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीसा बजावून कडक कारवाईचे आदेश दिले होते त्या कारवाईची इत्यांभूत माहिती मिळावी.”

अपीलार्थीने सदर माहिती दिनांक २३ मार्च २००५ ते ०५ डिसेंबर २००५ या कालावधीमधील शिघ्र टपालाव्दारे मागितली होती.

या अर्जामध्ये अपीलार्थीने जादा माहितीची मागणी केलेली दिसून येते.

> " निप्रेस मंडळ (कानेगाव), डी. एस. धोत्रीकर (कानेगाव), जे. एम. धोत्रे (नागूर), पी. एम. बिराजदार (माकणी), के. डी. पतंगे (लोहरा) इत्यादी डॉक्टरांची माहिती आवश्यक आहे."

अपीलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता तो जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे केला. त्यांनी तो अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविला. जन माहिती अधिकारी यांना सदर अर्ज जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक १९-१२-२००५ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपीलार्थीच्या सदर अर्जावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी संबंधित ८ कथित डॉक्टरांना व्यवसाय बंद करण्याबाबत नोटीसीव्दारे कळविण्यात आल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीवर समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक ०१-०२-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले आहे. यामध्ये त्यांनी संबंधित ९ डॉक्टरांच्या विरुध्द कोणतीही कारवाई झाली नसल्याचे व सदर डॉक्टर अद्यापही व्यवसाय चालू ठेऊन असल्याचे जन अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणून व आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तसेच जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणात कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही असे सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक १३-०४-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अर्जामध्ये त्यांना जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०२-२००६ रोजी दिलेली माहिती अपुरी व चुकीची असल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ९ डॉक्टरपैकी फक्त ८ डॉक्टरची माहिती दिली आहे. तर जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीने प्रथम माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे मागितली असल्याने त्यावर अपील सुनावणी करण्याचे अधिकार जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना नाही या कारणास्तव अपीलार्थीचे अपील अर्जाची सुनावणी न घेता त्यांचा अर्ज अपीलार्थीस परत पाठविला. अपीलार्थीने आयोगास सादर केलेल्या व्दितीय अपीलामधील विनंतीचा विचार केला असता असे दिसून येते की, अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ही विशिष्ट डॉक्टरांच्या संदर्भात आहे तर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील दिनांक ०२-०१-२००७ च्या पत्रान्वये दिलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची आहे त्यामध्ये अपीलार्थीस अपेक्षित असलेली डॉक्टरनिहाय माहिती नाही. महाराष्ट्र शासनाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत दिनांक ०५ फेब्रुवारी २००३ रोजी बोगस डॉक्टरावरील कारवाई करण्यासंबंधी विस्तृत आदेश पारीत केले आहेत. या आदेशामधील सुचनांचे गांर्भीयाने पालन केल्यास बोगस डॉक्टरांचा प्रश्न पुर्णतः मिटू शकेल असे वाटते. त्याच बरोबर राज्य शासनाने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३३ व ३८ यामध्ये सुधारणा केली असून अनाधिकृतपणे वैद्यकीय व्यवसाय करण्याच्या कृतीकरिता विहित केलेल्या शिक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे व हे सर्व गुन्हे दखलपात्र व बेजामीन करण्यात आले आहेत. अपीलार्थीस अपेक्षित असलेली कारवाई, म्हणजे जिल्हा आरोग्य

अधिका-याने या नियमांतर्गत केलेली कारवाई, ही आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित डॉक्टरांना त्यांचे दवाखाने बंद करण्यासंदर्भात केवळ नोटीस बजावल्याचे दिसून येते. या नोटीसा बजावल्यानंतरही या नोटीसांची पर्वा न करता सदर डॉक्टर अद्यापही सदर व्यवसाय करत असल्याचे अपीलार्थीस दिसून आले त्यामुळे अपीलार्थी यांनी प्रथम अपील जन अपीलीय अधिका-याकडे व त्यावर सुनावणी न झाल्याने व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे केले. अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून या प्रकरणी ठोस कारवाईची अपेक्षा असल्याचे त्यांनी मागणी केलेल्या माहितीवरुन दिसून येते. शासनाच्या दिनांक ०५ फेब्रुवारी २००३ च्या आदेशाचे अवलोकन करता या प्रकरणी जन माहिती अधिका-यास योग्य ती कारवाई करण्यास प्रत्याव्याय असू नये. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपीलार्थीस अपेक्षित असलेली डॉक्टरनिहाय संपूर्ण माहिती अपीलार्थी यांना विनामूल्य व हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत द्यावी. तसेच या डॉक्टरवर करण्यात येत असलेल्या कारवाईचा तपशील अपीलार्थीस वेळोवेळी पुरवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ जुलै २००७ — राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र शिवाजीराव केसकर, जिल्हाध्यक्ष, ए. आय. एस. एफ. उस्मानाबाद,

विजय चौक, जुनी गल्ली, दर्गा रोड, उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३६६

निर्णय दिनांक १७-०७-२००७

श्री. जनगांवे विजय मन्मथप्पा, : अपीलार्थी

इंदिरानगर, अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा)

जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, लातूर

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. जनगांवे विजय मन्मथप्पा, (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, लातूर श्री. सुधीर भातलवंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर श्री. प्रविण गेडाम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपीलार्थी यांनी या प्रकरणी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक १२-१२-२००६ च्या अर्जान्वये "श्री. दिगंबर आळंदकर (जे सध्या लातूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात वरिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत) हे वरिष्ठ सहाय्यक या पदावर रुजू होत असतांना त्यांनी दिलेल्या जन्मतारखेचा दाखल्याची व पदवी प्रमाणपत्राची सत्यप्रत ज्या लातूर जिल्हा परिषदेस सादर केल्या होत्या त्या प्रतीची माहिती" जन माहिती अधिका-यांकडून शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०८-०१-२००७ रोजी प्रथम उत्तर दिले. अपीलार्थीस दिलेल्या या उत्तरामध्ये अपीलार्थीने मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) नुसार अपीलार्थीस देता येणे शक्य नसल्याचे कळविले. अपीलार्थीस माहिती नाकारतांना ही माहिती प्राप्त झाल्यानंतर कोणतेही व्यापक हित साध्य होणार नाही या कारणास्तव ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००७ रोजी घेतली. या सुनावणी निकालामध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेली श्री. आळंदकर यांची जन्मतारीख व शिक्षणाबाबतची माहिती जेष्ठतासूची मध्ये नमूद केलेली असते व जेष्ठतासूची प्रसिध्द केलेली असते व ती सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणलेली असते व त्यावर कर्मचा-यांकडून उघड आक्षेप व हरकती मागविल्या जातात व या जेष्ठतासूचीव्दारे कर्मचा-यांची जन्मतारीख व शिक्षणाबाबतची माहिती उघडपणे सर्वत्र कळविली जात असल्यामुळे श्री. आळंदकर यांची माहिती अपीलार्थीस देण्यास काहीच हरकत नाही व जन माहिती अधिका-यास अपीलार्थीस श्री. आळंदकर वरिष्ठ सहाय्यक यांच्या संदर्भात मागितलेली माहिती देण्यास सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र दिनांक ०९-०२-२००७ रोजी सदर माहिती पुरविल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये श्री. आळंदकर यांची जन्मतारीख व शैक्षणिक अर्हता अपीलार्थीस कळविल्याचे दिसून येते.

अपीलार्थीस वेळेत माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक २८-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी श्री. आळंदकर यांची जन्मतारीख व पदवी प्रमाणपत्राच्या सत्यप्रती मागितल्या आहेत.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी त्यांना सदर माहिती एका न्यायालयीन प्रकरणामध्ये त्यांच्या बचावाकरिता हवी असल्याचे स्पष्ट केले. सदर माहिती मिळाल्यास

अपीलार्थीस त्यांची बाजू न्यायालयामध्ये अधिक प्रभावीपणे मांडता येईल, त्यांचा बचाव करणे त्यांना सुलभ होईल व याव्दारे जनहित साध्य होईल असे म्हणणे मांडले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ही सर्व माहिती उपलब्ध असून अपिलार्थीस ही माहिती देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता त्यांच्या निर्णयाशी राज्य माहिती आयोगास असहमती दर्शविण्याचे कारण दिसत नाही. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, अपीलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत सांक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत सांक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जनगांवे विजय मन्मथप्पा, इंदिरानगर, अहमदपूर, जिल्हा लातूर
२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा

परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ तक्रार/७१०/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १७-०७-२००७

१. शेख इब्राहिम बडेमियाँ, .. अपिलार्थी.
चेअरमन मजूर पेंटर्स ॲण्ड सॅनिटरी फिटर्सै
सहकारी संस्था, नवी आबादी, नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कार्यकारी अभिर्येता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.

३. मुख्य अभियंता,
सा.बां.प्रादेशिक विभाग,
बांधकाम भवन, अदालत रोड,
औरंगाबाद.

४. जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नांदेड.

५. विभागीय सहनिबंधक,

सहकारी संस्था, नांदेड.

## विवेचन

या प्रकरणी एक सुनावणी दिनांक- २५-०६-२००७ रोजी झाली असून आज दिनांक- १७-०७-२००७ रोजी घेण्यांत येणा-या व्दितीय सुनावणीसाठी अपिलार्थी श्री. शेख इब्राहीम बडेमियॉ तसेच जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड श्री. अविनाश त्रिंबकराव धोंडगे, जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, श्री.सु.अ.वाढेकर, व श्री.एस.एल.जाधव, मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, श्री.बी.एस.जाधव, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड, श्री.शेख एफ.ए. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड, हे हजर आहेत.

अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जावर दिनांक- २५-०६-२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मुख्यअभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड यांच्याकडील माहिती व त्यांच्या अधिनस्त सा.बां विभाग नांदेड येथील विभागाची माहिती या दोन्हीचा ताळमेळ घालून खुलासा करण्या संबंधी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांना आदेश दिले होते.

वरील आदेशा प्रमाणे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी उपलब्ध कागदपत्राची छाननी केली असता, त्यांना असे दिसून आले की, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील कामांची एकूण संख्या १५७ आहे. त्या १५७ कामांपैकी सार्वजनिक बांधकाम खात्या संबंधित ९२ कामे असून उर्वरित कामे इतर विभागाशी संबंधित आहेत. या ९२ कामांपैकी ४५ कामांचे करारनामे केली आहेत व ४७ करारनामे कार्यकारी अभियंता, यांनी अर्जदारास माहिती

पुरविल्यांनतर केलेली आहेत. तर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी पुरविलेल्या यादी प्रमाणे कामांची संख्या १०४ इतकी आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड  यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती व सार्वजनिक बांधकाम खात्यास दिलेली माहिती या मधील तफावती बाबत जिल्हा उपनिबंधक नांदेड यांना  विचारले असता, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये इतर विभागाची माहिती समावेश होती तर सार्वजनिक बांधकाम विभागास पुरविलेल्या यादीमध्ये फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांचा समावेश होता. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना एकूण कामांची माहिती विचारली असता त्यांनी फक्त करारनामे केलेल्या कामाची माहिती दिली. त्यामूळे अपिलार्थीस दिलेल्या माहितीत तफावत आढळल्याचा  निष्कर्ष मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी काढला आहे. अपिलार्थीस पुरविण्यात  आलेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याचे अपिलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामध्ये अशा प्रकारे तथ्यांश आढळत आहे. अपिलार्थीस विसंगतीपूर्ण माहिती दिल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्दची दोषरोपपत्रे मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी दिनांक- ११ जुलै, २००७ रोजी शासनास सादर केली आहे तर संबंधित वरिष्ठ लिपीक श्री. अे.एम.देशपांडे यांच्या संदर्भात अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड यांनी दिनांक- ०९ जुलै, २००७ रोजी आदेश पारीत करुन, त्याची पुढील वेतनवाढ एक  वर्षासाठी रोखून ठेवण्याची शिक्षा त्यांना दिली आहे. मुख्य अभियंता यांची वरील कृती  पहाता अपिलार्थीस विसंगतीपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांनी संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाही केली / प्रस्तावित केली असल्याचे दिसून येते.

या प्रकरणी आता अशा प्रकारे अपिलार्थीच्या विनंती नूसार अंतिम कार्यवाही झाली असल्यामूळे अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक- १७-०७-२००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी, श्री.शेख इब्राहिम बडेमियॉ, चेअरमन मजूर पेटर्स ॲण्ड सॅनिटरी फिटर्स सहकारी संस्था, नवी आबादी, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, अदालत रोड, औरंगाबाद- ४३१००५ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६ विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

७ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३७२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १८-०७-२००७.

| | | |
|---|---|---|
| १. श्री.सदाशिव सटवा रायबोळे,<br>व्दारा/- ॲड.जि.एस.रायबाळे,<br>सरस्वती कॉलनी, किनवट<br>(सिध्दार्थ कॉम्पलेक्स)ता.किनवट,<br>जिल्हा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, किनवट<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, . | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १८-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर ,श्री. विठ्ठल यंशवत बिरादार, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, श्री. सु.अ.वाढेकर, (येथून पुढे त्यांना

जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री. भा.रा.खिर्डीकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रकारची माहिती मागीतली होती.

"१. शासकिय गोदामे, शासकिय इमारती, कार्यालय, विश्रामगृह दुरुस्ती केलेल्या कामाची माहिती कामाचे व गुत्तेदाराचे नावागावा सहित सविस्तर माहिती देणे.

२. ५०,०००/- रुपयाची फुटकळ कामाची माहिती कामाचे नावासाठी.

३. पॅचेसवर्क केलेल्या कामाची माहिती कामाचे नावागांवासहित देणे.

४. सध्या प्रगतीपथावर असलेल्या सि.आर.एफ. कामावर आतापर्यत खर्च केलेली माहिती एम.बी.पुस्तीकेच्या छायाकिंत प्रतिसह माहिती देणे.

५. सध्या प्रगतीपथावर असलेल्या सर्व कामाची माहिती व त्या कामावर आजपयैत खर्च केलेली माहिती एम.बी. नुसार.

६. महिनेवारी खर्च केलेल्या वावचरची माहिती देणे. उदा. रस्ते दूरुस्ती, कार्यालय दुरुस्ती, विश्रामगृह दूरुस्ती, किरकोळ कामे दुरुस्ती ईत्यादी कामावर खर्च केलेल्या वावचरची माहिती.

अपिलार्थीने अपेक्षित माहितीचा कालावधी सन २००५ ते २००६ असा दर्शविला आहे.

सदर माहिती अपिलार्थीने पोष्टाने मागितली असून या अर्जासोबत अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील असल्या बद्दलच्या प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे. अपिलार्थीने मूळात हा अर्ज जनमाहिती अधिकारी यांना न करता तो अर्ज सहाय्यक माहिती अधिकारी यांच्याकडे केला आहे. सहाय्यक माहिती अधिकारी हे जनमाहिती अधिकारी नसल्यामूळे त्यांनी या प्रकरणात अपिलार्थीचा अर्ज मूळ प्रतीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे म्हणजेच कार्यकारी

अभियंता यांच्याकडे, त्यांना तो प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत, अधिनियमातील तरतूदीनूसार पाठविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी ही कृती केली नसल्याचे दिसून येते. तथापि सहायक माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरच ही माहिती अपिलार्थीस दिनांक- २८-११-२००६ रोजी पाठविली व ही माहिती अपिलार्थीस दिनांक ३०-११-२००६ रोजी प्राप्त झाली. सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी, त्यांना सहाय्यक माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूरी व चुकीची असल्याचे म्हटले आहे व याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीला सोबत त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिका-यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नूसार शास्ती लावण्याची मागणी केली आहे व सदर शास्तीमध्ये लावलेल्या रक्कमेची वसूली संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वसूली करुन शास्तीची रक्कम शासकिय तिजोरीत जमा केलेल्या पावतीची प्रत अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांना मागितलेली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १६-०१-२००७ च्या पत्रान्वये सदर माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात त्यांनी शासकीय माहिती अधिका-यास सूचीत केले असून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त होईल, असे कळविले व या पत्राची प्रत संबंधीत जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना दिली.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त होवूनही विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती न दिल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १४-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद मांडला की, अपिलार्थीने विचारलेली माहिती ही विस्तृतस्वरुपाची व सर्वसाधारण स्वरुपाची आहे. अपिलार्थीने सदर माहिती पोष्टाव्दारे मागितली आहे. जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सदर माहिती पोष्टाने पाठविण्या इतपत त्यावेळी निधी उपलब्ध (फेब्रूवारी २००६ च्या पहिल्या आठवडयात) नव्हता. त्यामूळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक- २२-०२-२००६ रोजी, त्यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयातून समक्ष येवून घेवून जावी, असे पत्र दिले. तथापि त्यादिवशी अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती घेवून जाण्याकरिता उपस्थित झाले नाहीत. तद्नंतर ही माहिती घेवून जाण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडे त्यांच्याकडील पत्र दिनांक- २७-०४-२००६, ३०-०५-२००६ व्दारे पाठपुरावा केला व अंतिमतः दिनांक- ०५-०७-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातील शिपाया मार्फत अपिलार्थीस ही माहिती पाठविण्यात आली.

अपिलार्थीस दिनांक- ०५-०७-२००७ रोजी ही माहिती मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पोंचपावती दिली ती आज आयोगा समोर सादर करण्यात आली. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून असा युक्तीवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक- ३०-११-२००६ रोजी अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी एका मुद्या संदर्भात माहिती वगळता उर्वरीत सर्व मुद्यावरील माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळअर्जात मागणी केलेला मुद्दा क्रमांक-६ च्या संदर्भात ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडून २००५-२००६ या वर्षभरात खर्च केलेल्या सर्व प्रती मागितलेल्या होत्या. या एकूण व्हाउचर्चस्च्या प्रती पैकी काही प्रत जनमााहिती अधिकारी यांच्या कार्यालयात होत्या तर काही प्रती सहाय्यक माहिती अधिकारी याच्या कार्यालयात होत्या, ती संपूर्ण व्हाउचर्स शोधून काढण्यामध्ये व त्याच्या झेरॉक्सप्रती

काढण्यामध्ये त्यांचा वेळ गेला व अंतिमतः या प्रती खासदूता मार्फत अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचे मार्फत दिनांक- ०५-०७-०७ रोजी पुरविण्यात आल्या.

अपिलार्थीने कोणत्या एका विशिष्ट कामा संदर्भात किंवा मोघम स्वरुपात माहिती न मागविता एकूण विस्तृतस्वरुपात माहिती मागविणे, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती घेवून जाण्यासाठी बोलाविल्यानंतरही अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अनुपस्थित राहणे व शेवटी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत अपिलार्थीस माहिती पुरविणे व त्याच बरोबर आज अपिलार्थीची सुनावणीस गैरहजेरी असणे, या सर्व बाबी अपिलार्थीच्या माहिती मागविण्या संदर्भातील हेतू विषयी शंका उपस्थित करतात. हयाच अपिलार्थीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे व उपविभागाचे तसेच इतर शासकीय कार्यालयांकडे अशाच प्रकारची मोठी व्याप्ती असलेली व सर्वसाधारण स्वरुपाची माहिती, माहिती अधिकार २००५ अन्वये माहिती मागविली आहे अपिलार्थीस आता आवश्यक असलेली माहिती मिळाली आहे. अपिलार्थीस माहिती देण्या करिता जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे हेतुतः टाळाटाळ केल्याचे आयोगास आढळून येत नाही. परंतु सहायक माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवयाचा होता, तथापि त्यांनी त्याप्रमाणे कृती केली नाही. याबद्दल त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. सचिव, (सार्वजनिक बांधकाम), यांना आदेशित करण्यात येते की, या संदर्भात त्यांनी आपल्या अधिनस्त सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या करिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांना असे सूचित करण्यांत येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचा-यास प्रशिक्षण देण्यासाठी या विषयावर कार्यशाळा / शिबीरे वेळोवेळी आयोजित करावीत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- १८-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.सदाशिव सटवा रायबोळे, सरस्वती कॉलनी, किनवट, जिल्हा- नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव,सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कारवाईस्तव देण्यात येते.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३७३

निर्णय दिनांक १८-०७-२००७

श्री. खालेद युनूस अन्सारी, : अपीलार्थी

दैनिक तहेलका टाईम्स, चावलवाला

कॉम्प्लेक्स, देगलूर नाका, नांदेड जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापक, मदिनातुल-उलूम माध्यमिक

शाळा, जगजीवनराम रोड, मदिना नगर,

देगलूर नाका, नांदेड जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा

परिषद, नांदेड जिल्हा नांदेड

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. खालेद युनूस अन्सारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल-उलूम माध्यमिक शाळा, जगजीवनराम रोड, मदिना नगर, देगलूर नाका, नांदेड जिल्हा नांदेड श्री. हाशमी सैय्यद आजम पि. सैय्यद खाजा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड जिल्हा नांदेड यांचे प्रतिनिधी अधीक्षक शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड जिल्हा नांदेड श्री. आर. बी. शिंदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, याच प्रकरणाची सुनावणी यापुर्वी दिनांक २६-०४-२००७ रोजी होऊन राज्य

माहिती आयोगाने निर्णय दिलेला आहे. या प्रकरणाची एकदा सुनावणी झाली असल्याने आता परत या प्रकरणाची सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे राज्य माहिती आयोग मान्य करीत आहे व हे अपील खारीज करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खालेद युनूस अन्सारी, दैनिक तहेलका टाईम्स, चावलवाला कॉम्प्लेक्स, देगलूर नाका, नांदेड जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल-उलूम माध्यमिक शाळा, जगजीवनराम रोड, मदिना नगर, देगलूर नाका, नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १८-०७-२००७.

१. श्री.अन्वरउल्लाखान मो. .. अपिलार्थी.
बरकतउल्लाखान
९-४-४५५,
कय्याम प्लॉटस, नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.
२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.

# विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १८-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मो.अन्वरउल्लाखान मो.बरकतउल्लाखान, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, श्री. एम.ए.मुजीब,(येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, श्री. सु.अ.वाढेकर, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २३-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात काम करणा-या क्षेत्रीय स्तरावर मंजूर असणा-या आस्थापना विषयक खालील माहिती विचारली होती. सदर माहितीचा कालावधी १९८९ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत म्हणजे सुमारे १५ वर्षाची मागितली होती.

> “ रस्ते मुकदम स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व मुकादम ही एकूण पदे व त्यांची कर्तव्ये काय आहेत ? ते कार्यालयात लिपीक व कनिष्ठ लिपीक म्हणून काम करण्यास पात्र आहेत काय ? रस्ते मुकदम अभियांत्रिकी सहाय्यक हे कनिष्ठ लिपीक व लिपीक म्हणून काम करीत आहेत, अशा सर्व कर्मचा-यांची नावे व त्यांना कोणत्या नियमान्वये ते क्षेत्रीय स्तरावर काम करण्याऐवजी कार्यालयीन काम करु शकतात.”
>
> अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे स्वरुप पहाता अपिलार्थीने ही माहिती जनमाहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २१ डिसेंबर, २००५ च्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबुल केले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील पत्राव्दारे पाठविलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार दिनांक- २७-०२-२००५ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. हे अपील करण्याचे कारण म्हणजे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थीने अपील अर्जात म्हटले आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २२-०३-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे अपिलार्थीच्या अपीला संदर्भात उत्तर दिले. त्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात, त्यांना काही शंका असल्यास बोलाविल्याचे दिसते. त्याचबरोबर अपिलार्थीने जी माहिती खोटी व जाणूनबुजून व दिशाभूल करणारी दिलेली असल्याचे म्हटले आहे ती माहिती बरोबर असल्याचे जनअपिलीय अधिकारी यांनी या पत्रात प्रतिपादन केले आहे. वास्तविकतः जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दोन्हीही बाजूच्या प्रतिनिधीस बोलावून घेवून त्यांचे म्हणणे समक्ष ऐकून घेवून त्यावर आपला निर्णय पारीत करणे सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये अपेक्षित आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसत नाही.

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडील या प्रकरणामध्ये संबंधित अधिक्षक अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेवून त्यांच्यामधील माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भातील अज्ञानाचे प्रदर्शन केले आहे. अपील सुनावणी कशी घेवू नये याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे. त्यांच्या या बेजबाबदारपणाची यथा

योग्यरित्या नोंद सचिव,सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय मुंबई यांनी घ्यावी.  असे त्यांना सुचीत करण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या माहितीची मुळमागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील पहाता, अपिलार्थीच्या मते त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती ही दिशाभूल करणारी व चुकीची आहे. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्या कार्यालयात, ज्या कर्मचा-यानी क्षेत्रीय स्तरावर काम करणे त्यांच्या पदा नुसार आवश्यक आहे ते कर्मचारी, लिपीकाचे काम करीत असल्याची एक प्रकारची प्रशासकीय अनियमतता त्यांनी उघडकीस आणली आहे. अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांनी ही प्रथमतः दिलेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची कशी आहे, हे विचारले असता अपिलार्थीने असे सांगितले की, अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी या संदर्भात त्यांच्याकडील दिनांक- १५-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना, अतिरीक्त माहिती म्हणून चार वरिष्ठ लिपीक व चार कनिष्ठ लिपीक यांची पदे मंजूर असल्याचे त्यांना कळविले आहे. ही माहिती,  जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- २१-१२-२००५ रोजी दिलेल्या माहिती पेक्षा वेगळी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात जनअपिलीय अधिकारी यांचा खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात संबंधीत कालावधीमध्ये पाच अभियांत्रिकी सहाय्यक/मार्गलिपीक हे लिपीक पदावर कार्यरत होते. कामाच्या बोजाच्या प्रमाणात कार्यालयीन स्तरावर काम करणारे कर्मचारी कमी पडल्याने कामाच्या वेळेत निपटारा होण्याच्या दृष्टीने तत्कालीन अधिक्षक अभियंता यांनी अशी तात्पुरती

प्रशासकीय व्यवस्था केली होती. तथापि आता सदर पाच स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यक व मार्गलिपीक यांना दिनांक-३१-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातून कार्यमूक्त करुन त्यांना परत क्षेत्रीय स्तरावर वर्ग करण्यात आले असल्यामूळे, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली कार्यवाही आता पूर्ण झाली आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारल्याचे दिसते. अपिलार्थीस सुनावणीच्या वेळेस जनमाहिती अधिकारी यांना माहिती विचारतांना प्रश्न न विचारता सरळपणे माहिती विचारण्या बाबतच्या सूचना दिल्या. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिलेले दिनांक- २१-१२-२००५ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता आयोगाच्या मते अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविल्याचे दिसते. अपिलार्थीने आज युक्तीवादामध्ये असे सांगितले की, कोणत्या नियमान्वये क्षेत्रीय अधिका-यांच्या नेमणूका कार्यालयीन कामासाठी करता येतात, ते नियम अथवा कायद्याची प्रत अपिलार्थीस हवी होती. त्या प्रतीचा समावेश या माहितीमध्ये नव्हता म्हणून ही माहिती अपूर्ण ठरते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचे स्वरुप पहाता त्यांना वेळोवेळी वेगवेगळया प्रकारच्या कामाची माहिती संकलीत करणे, आस्थापना विषयक बाबीचे व्यवस्थापन करणे इत्यादी प्रकारच्या अनेक बाबी अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयीन स्तरावर पार पाडल्या जातात. त्यामूळे ज्यावेळी कामाचा ताण वाढतो त्यावेळी क्षेत्रीयस्तरावरील अधिका-यांना एक तात्पुरती प्रशासकीय व्यवस्था कार्यालयीन स्तरावर बोलावून घेवून त्यांच्याकडून लिपीकाचे काम केले जाते. अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात अशाच प्रकारची तात्पुरती व्यवस्था केली गेली होती. क्षेत्रीय स्तरावरील कर्मचा-यांना कार्यालयामध्ये काम करावे लावणे या संदर्भात कोणते नियम अथवा आदेश अस्तित्वात नाहीत व असे आदेश अस्तित्वात नसल्याने

अपिलार्थीस ती माहिती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. असे अधिक्षक अभियंता यांनी आज सुनावणीमध्ये स्पष्ट केले.

अपिलार्थी यांचे अद्यापही सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड यांच्या कार्यालयीन व्यवस्थापनेबद्दल आक्षेप आहेत. सदर आक्षेप कार्यालयीन व्यवस्थापने संदर्भात असून त्याचा माहिती अधिकार अधिनियम २००५ शी दूरान्वयाने देखिल संबंध पोहोचत नाही तेंव्हा या आक्षेपाचे निवारणार्थ त्यांनी सचिव, सार्वजनिक बांधकाम मंत्रालय, मुंबई अथवा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंत्रायलय, मुंबई यांच्याकडे वेगळा संर्पक साधावा असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. आजमितीस अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील सर्व क्षेत्रीय कर्मचा-याना परत क्षेत्रीय स्तरावर बदलले असल्यामूळे अपिलार्थीचा मूळ प्रश्न मिटल्याचे दिसून येते.

वरील विवेचन व अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पहाता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- १८-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.अन्वरउल्लाखान मो. बरकतउल्लाखान ९-४-४५५, कय्याम प्लॉटस, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १८९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १९-०७-२००७.

१. श्री. भगवान भानुदास बागलाने, .. अपिलार्थी.
काकडहिरा, पो. पालवन, ता.जि.बीड

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा ..
उपायुक्त, सामान्य प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१९-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.भगवान भानुदास बागलाने, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड, श्री. धनंजय जावळीकर (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद, श्री. के.बी. गवळी, ( येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक-२३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये –

"सर्व्हे नं.३२, ३३ मध्ये बीड नगर परिषदेचे नांव कब्जेदार म्हणून आले आहे. या संबंधीत शासकीय आदेश व नगर परिषदेचा जमिन मागणीचा मूळ प्रस्ताव, लेआऊट मंजूरीचा नकाशा व ऑर्डरची मागणी केली होती."

सदर मागणी अपिलार्थीने टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये माहितीशी संबंधीत कालावधी नमूद केलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिका-यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गोळा करण्याचे काम चालू असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी पंधरा दिवसाचा जास्तीचा कालावधी लागेल, असे कळविले.

तदनंतर लागलीच पुढील आठवडयात दिनांक १५-०४-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या मागणीच्या अर्जास अनुसरून अपिलार्थीले मागितलेल्या माहितीच्या अर्जामध्ये फक्त सर्वेनंबर ३२ व ३३ असा उल्लेख केला आहे. हया अर्जामध्ये तरफ याचा उल्लेख केला नसल्यामुळे संबंधीत भूखंडाचे स्थान निश्चित करता येत नाही व त्यामुळे देता येणे शक्य होत नाही, असे कळविले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडील अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक २०-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये

त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे जनमाहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करून त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार शास्ती लावण्याची मागणी केली आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००६ रोजी सुनावणी घेवुन आपला निर्णय दिनांक १३-०६-२००६ रोजी पारीत केला आहे. जनअपिलीय अधिका-याने या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती विनामुल्य देण्याचे सूचीत केले व अपिलार्थीचे अपील मंजूर केले. जनअपिलीय अधिकारी यांनी आदेश देवूनही वेळेत माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असे सांगण्यात आले की, त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस त्यांचे दिनांक-०५-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये विनामुल्य माहिती पुरवली आहे.

या प्रकरणात अपिलार्थीस माहिती पुरविण्या संदर्भातील जनमाहिती अधिकारी यांचे वर्तन पहाता, त्यांनी या प्रकरणातील आपल्या बेजबाबदार वागणूकीचे दर्शन केले आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे ठरू नये, कारण त्यांनी प्रथमत अपिलार्थीस दिनांक ०७-०४-२००६ च्या पत्राने माहिती गोळा करणे चालू आहे, असे कळविले व दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या पत्राने तरफ उल्लेख नसल्याने माहिती देता येत नाही, असे कळविले. जनमाहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानूसार बीड नगरपरिषदेचे क्षेत्र वेगवेगळे असून सहा विभागात विभागले गेले आहे. प्रत्येक विभागामध्ये सर्वेनंबर ३२ व ३३ अस्तित्वात असल्याने त्यांनी अपिलार्थीस नेमकी कोणत्या गटातील ३२ व ३३ या सर्वेनबंरची माहिती पाहिजे आहे याचा त्यांना अर्थबोध न होवू शकल्यामुळे अपिलार्थीस दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्रामध्ये माहिती देता येणे शक्य नसल्याचे कळविले. अर्जदाराकडून सादर करण्यात आलेल्या अर्जामध्ये तरफ या विशिष्ठ

शब्दाचा उल्लेख केला नाही, या सबबीखाली अपिलार्थीस माहिती न पुरविणे, ही माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीशी विसंगत बाब आहे. शासकीय माहिती अधिकारी यांना जरी अर्जदाराने त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये आवश्यक तो तपशिल दर्शविला नाही, असे वाटले तरी शासकीय माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बोलावून घेवून तो तपशिल घेणे आवश्यक होते. या सबंधीत वेगळे पत्र देवून आवश्यक तो तपशिल प्राप्त करून घेता आला असता, परंतू, जन माहिती अधिकारी यांनी असे न करता केवळ एका शुल्लक तांत्रिक शब्दाच्या अभावामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, ही बाब आयोगाच्या दृष्टिने गंभीर आहे व जनमाहिती अधिकारी यांचे हे वर्तन बेजबाबदारपणाचे आहे, हा जनअपिलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष शिक्कामोर्तब ठरतो.

आज जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ०५-०८-२००६ रोजी विनामुल्य पुरविली आहे. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०५-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती प्राप्त झाली असून ही माहिती अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केलेल्या माहिती पेक्षा पूर्णतः भिन्न व वेगळी आहे. त्यांनी मूळ अर्जामध्ये खासरापत्र व पहाणीपत्रकाची मागणी न करता देखील त्यांना ती माहिती पुरविण्यात आली आहे. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी ज्या लेआऊटची प्रत अपिलार्थी यांना पाठविली आहे ती मंजूर ले आऊटची प्रत नसुन फक्त एका सही नसलेल्या भूखंडाच्या नकाशाची झेरॉक्स प्रत आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्राची पहाणी करता अपिलार्थी यांच्या म्हणण्यात आयोगाला तथ्यांश आढळून आले आहे.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे ढोबळ मानाने पुढील प्रमाणे चार भाग पाडता येतील.

१.	नगर परिषदेला कब्जेदार म्हणून घोषीत करण्यात आलेल्या संदर्भात शासन आदेशाची प्रत.

२.	नगर परिषदेने जमिन मालकीचा केलेला मूळ प्रस्ताव.

३.	लेआऊट मंजूरीचा नकाशा.

४.	लेआऊट मंजूरीचे आदेश.

सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेमध्ये या पैकी मुद्या क्रमांक १ व २ हे या संदर्भात कोणतीच माहिती बीड नगर परिषदेकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले. त्याचबरोबर मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात ले आऊटचा नकाशा म्हणून त्यांनी जी प्रत अपिलार्थीस दिली आहे, तेवढीच प्रत त्यांच्याकडे उपलब्ध आहे असे सांगितले. सर्वेनंबर ३२ व ३३ चा लेआऊट मंजूर झाल्याचा कोणताही पुरावा जनमाहिती अधिकारी यांच्याकडे नाही. सदर भूखंडाचा मंजूरीचा नकाशा उपलब्ध नसल्याने त्या मंजूरीचे आदेशही त्यांच्याकडे आजमितीस उपलब्ध नाहीत. थोडक्यात अपिलार्थीने कोणतीही माहिती त्यांच्याकडे निश्चितपणे व ठोस स्वरूपात उपलब्ध नाही. जर त्यांच्याकडे निश्चित स्वरूपात ही माहिती उपलब्ध नव्हती तर त्यांनी सुरूवातीस अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविणे भाग होते. तथापि त्यांनी असे केल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर दोन सर्वेनंबर त्यांच्या वैयक्तीक मालकीचे असून त्यांच्या संमती शिवाय किंवा कोणत्याही व्यवहारा शिवाय, बीड नगर परिषदेला त्यावर मालक म्हणुन आता दर्शविण्यात आले आहे. या भूखंडावर आपला मालकी हक्क सिध्द करण्याकरिता न्यायालयामध्ये त्यांना मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकून असे आदेशीत करण्यात येते की, जर जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील कोणती माहिती उपलब्ध आहे व कोणती उपलब्ध नाही ते त्यांनी अपिलार्थीस दोन दिवसांत स्पष्टपणे व मुद्येनिहाय कळवावे.

हे प्रकरण हाताळण्यात संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराने त्यांच्या अर्जात तरफ या शब्दाचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे स्थान निश्चीत करता येत नाही व त्यामुळे माहिती देता येत नाही असे म्हटले आहे त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या बेजबाबदारपणाचे प्रदर्शन केले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस स्पष्टपणे माहिती न देऊन व आपल्या कार्यप्रणालीमध्ये जो कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे त्या संदर्भात संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रमाणे यथायोग्य रित्या प्रशासकीय कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीवे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यांत येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या सर्व मुद्यांवर, मुद्येनिहाय माहिती विनामुल्य पुरवावी.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांच्यावर सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ अन्वये यथायोग्यरित्या प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक- १९-०७-२००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१. श्री.भगवान भानुदास बागलाने, काकडहिरा,पो.पालवान, तालूका जिल्हा-बीड.

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त ( सामान्य प्रशासन ) विभागीय आयुक्त कार्यालय,, औरंगाबाद.

४. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कारवाईस्तव देण्यांत येते.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९९

निर्णय दिनांक १९-०७-२००७

श्री. सुनिल श्रीराम शेडुते, : अपीलार्थी

व्दारा पुजा एम्पोरियम, बसस्टॅण्ड, बीड

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा)
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुनिल श्रीराम शेडुते बीड (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद, बीड श्री. शिवाजी शंकर सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड हे गैरहजर आहेत.

जन अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या अनुपस्थितीची राज्य माहिती आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. राज्य माहिती आयोगातर्फे व्दितीय अपीलावर निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे प्रथम अपील अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य असते तथापि सूचना देऊन सुध्दा संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड हे आज सुनावणीसाठी विना परवानगी गैरहजर राहिले आहेत. सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी संबंधित जन अपिलीय

अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना राज्य माहिती आयोगा च्या सुनावणीसाठी ज्या ज्या वेळी बोलावणे येईल त्या त्या वेळी त्यांना हजर राहण्याची सूचना देऊन आपला अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून १ महिन्याच्या आत द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांचे दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

> " मा. राज्यमंत्री ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजी सुनावणीच्या वेळेस मा. सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी दिनांक २१-०१-२००६ रोजी जिल्हा परिषदेस सादर केलेल्या चौकशी अहवाल (रिपोर्ट) समाविष्ट केला आहे काय, असल्यास सुनावणीच्या दरम्यान एकूण किती दोषारोपाबाबत चर्चा करण्यात आली आहे."

अपीलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः, शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००६ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रासोबत सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांच्या कडून दिनांक २१-०१-२००६ रोजी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी अपीलार्थीस दिनांक ३१-०३-२००६ रोजी दिली. तसेच त्यांनी या पत्रामध्ये अपीलार्थीस असे कळविले आहे की, दिनांक ०७-०३-२००६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी हे मा. राज्यमंत्री ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे दालनात स्वतः उपस्थित होते. या प्रकरणी झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त मा. राज्यमंत्री महोदयाचे कार्यालयाकडे आहे. त्या अनुषंगाने शासनाकडून काहीही सूचना नाही त्यामुळे प्रकरणात झालेल्या सुनावणीचे मुद्दे काय होते याची माहिती या कार्यालयाकडून देणे शक्य नाही व त्याच बरोबर जन माहिती

अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर सुनावणीचे इतिवृत्त मा. राज्यमंत्री महोदयांचे कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करावे असे त्यांनी शेवटी सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस चुकीची, अर्धवट, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती केली. सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००६ रोजी घेतली. या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना चुकीची, अर्धवट, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे अपीलार्थी हे सिध्द करु न शकल्यामुळे जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपीलीय अधिकारी याच्या या निर्णयावर सदर सुनावणी आदेश जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०५-२००६ रोजी निर्गमित केले.

जन अपीलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक ०६-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. या अपीला मध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची व त्यांना शास्ती लावण्याची विनंती केली.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी आयोगासमोर असा मुद्दा मांडला की त्यांच्यावर लादण्यात आलेल्या शिक्षेसंदर्भात त्यांनी राज्यमंत्री ग्रामविकास व जलसंधारण विभाग मुंबई यांच्याकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीप्रमाणे मा. राज्यमंत्री महोदय यांच्याकडे अपील केले होते. त्या अपीलाच्या

सुनावणीमध्ये मा. राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या वरील आरोपाच्या संदर्भात त्यांचे म्हणणे न ऐकता जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी मा. राज्यमंत्री महोदयाकडे मांडलेले मुद्दे फक्त लक्षात घेतले व मा. राज्यमंत्री महोदयांनी एकतर्फा निर्णय घेतला. तव्दतच मा. राज्यमंत्री महोदयांकडे झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीच्या आरोपावरील बडतर्फी बाबत चर्चा न होता दुस-याच मुद्दयावर चर्चा घडवून आणून अपीलार्थीस सेवेतून कमी करण्याची शिक्षा मा. राज्यमंत्री महोदयांनी कायम केली आहे.

अपीलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्यमंत्री महोदया बरोबर दिनांक ०७-०३-२००६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये किती मुद्दे, किती दोषारोपाबाबत चर्चा करण्यात आली अशी माहिती मागितली आहे. मुळातच अपीलार्थीने ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली व अशा बैठकीमध्ये सर्वसाधारणतः जे मुद्दे चर्चिले जातात त्याचे इतिवृत्त अंतीम झाल्यानंतर सदर मुद्दे चर्चिले गेले असे म्हणण्यात येते. या प्रकरणी दिनांक ०७-०३-२००६ रोजी मा. राज्यमंत्री महोदयांच्या बरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहिती अधिकारी यांना अद्याप प्राप्त झाले नाही त्यामुळे ते ही माहिती देऊ शकणार नाहीत हे उघड आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या कडील दिनांक ३१-०३-२००६ रोजीचे दिलेले उत्तर आयोगास योग्य वाटते. याच बरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य

कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

वरील तरतुदींचे अवलोकन करता अपीलार्थीने मागितलेली माहिती सदर बैठकीचे इतिवृत्त जन माहिती अधिका-यास प्राप्त झाल्या शिवाय ते ही माहिती देऊ शकणार नाही हे उघड आहे. त्याच बरोबर सदर बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झाले आहे काय असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. तसेच यापुढे जर हे इतिवृत्त जन माहिती अधिका-यास प्राप्त झाले तर त्याची प्रत अपीलार्थी यांना देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी युक्तीवाद मांडतांना असे स्पष्ट केले की, अपीलार्थी हे जिल्हा परिषद सेवेमध्ये कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत होते तथापि तदनंतर जिल्हा परिषद सेवेतून कमी केल्यानंतर अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कसल्याही प्रकारचे जनहित नसतांना वेगवेगळ्या मुद्यांवर वैयक्तीक स्वरुपाच्या माहितीची वारंवार मागणी करुन माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करुन प्रशासनाचा वेळ व श्रम अनाठायी खर्च करत आहे. अर्जदाराने आतापर्यंत माहितीच्या अधिकाराखाली या कार्यालयाकडे सन २००५-२००६ या वर्षात एकूण प्राप्त अर्ज ३७ असून त्यापैकी अर्जदाराचे १४ अर्ज आहेत त्याची टक्केवारी ३८ टक्के एवढी आहे तसेच सन २००६-२००७ या वर्षात एकूण प्राप्त अर्ज ७८ असून त्यामध्ये अर्जदाराचे ०७ अर्ज असल्याने त्याच्या अर्जाची टक्केवारी ९ एवढी आहे.

जन माहिती अधिकारी व अपीलार्थी यांचा वरील प्रकारचा युक्तीवाद ऐकून घेऊन असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कृतीमध्ये कोणत्याही प्रकारे माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा मुद्दाम चुकीची माहिती देणे असे प्रकार दिसून येत नाही. अपीलार्थीने मूळातच विचारलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील माहिती या संज्ञेमध्ये बसत नसल्यामुळे अपीलार्थीने केलेली मूळ मागणी हीच मूळात चुकिची असल्याचे दिसून येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. अपीलार्थी यांना त्यांचेवर अन्याय झाला आहे असे वाटत असल्यास अपीलार्थीने त्यांची बाजू मांडण्या साठी संबंधित योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करावा.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल श्रीराम शेडुते, व्दारा पुजा एम्पोरियम, बसस्टॅण्ड, बीड जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा)जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २७०/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १९-०७-२००७.

१. श्री.मनोज भरतसिंग परदेशी .. अपिलार्थी.
रा.परदेशीपुरा, पैठण
तालूका-पैठण, जिल्हा- औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,पैठण.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय कृषी अधिकारी,
औरंगाबाद.

३. विभागीय कृषी सहसंचालक,
औरंगाबाद.

# विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१९-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.मनोज भरतसिंग परदेशी, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, औरंगाबाद, श्री.के.बी.तरकसे, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) विभागीय कृषी सहसंचालक,डॉ.एच.डी.नांदवटे, हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी पैठण हे अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २९-१२-२००४ रोजी त्यांचे उपविभागातील फळबाग योजने अंतर्गत अनुदाना संबंधात माहिती विचारली होती. अपिलार्थीने केलेल्या माहिती मागविण्यासंदर्भात केलेल्या अर्जाचा दिनांक पहाता अपिलार्थीने हे अपील महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या अंतर्गत केलेले दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- १५-१०-२००५ रोजी संबंधीत माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि ही माहिती प्राप्त झाल्या नंतरही अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०५-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतूदी अन्वये व्दितीय अपील केलेले दिसते. अपिलार्थी यांनी मूळअर्ज महाराष्ट्र अधिकार अधिनियम २००२ च्या तरतुदी अन्वये केलेला आहे. अपिलार्थीने माहितीसाठी केलेला प्रथम अर्ज ज्या कायद्याखाली केला आहे तो कायदा आता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक- ०५ ऑक्टोंबर, २००५ रोजीच्या अध्यादेशाव्दारे निरसीत झाला असून

माहिती अधिकार अधिनियम २००२ हा दिनांक- १२ ऑक्टोंबर, २००५ पासून अंमलात आलेला आहे. अपिलार्थीने या कायद्याखाली राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज ज्या कायद्याखाली केला होता तो कायदाच आता निरसीत झाला असल्यामूळे अपिलार्थीने केलेल्या या अर्जावर राज्य माहिती आयोगाकडे सुनावणी घेण्याची अधिकारता राज्य माहिती आयोगाला नाही.

वरील विवेचनासह अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १९-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मनोज भरतसिंग परदेशी, राहणार- परदेशीपुरा, पैठण, जि.औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३९४

निर्णय दिनांक  १९-०७-२००७

श्री. कानिफ मारुती माने, : अपीलार्थी
हिंमतनगर, प्लाट नं. ५७, नगर-औरंगाबाद
रोड, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप पोलीस अधीक्षक (ग्रामीण),
पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर
जिल्हा अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. कानिफ मारुती माने, अहमदनगर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधीक्षक (ग्रामीण), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांचे प्रतिनिधी सहाय्यक पोलीस निरीक्षक, नगर तालुका पोलीस स्टेशन श्री. के. एस. सुर्यवंशी,

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.  जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी हे दोघे गैरहजर असून त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुर्यवंशी यांना हजर राहण्याकरिता प्राधिकृत केले आहे.

सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष सूचना देऊन देखील सहाय्यक पोलीस अधीक्षक व जिल्हा पोलीस अधीक्षक हे अहमदनगर येथे प्रथम दिनांक ३०-०६-२००७ च्या सुनावणीस हजर राहिले नाही व दुस-यांदा दिनांक १९-०७-२००७ रोजी त्यांना सुनावणीसाठी बोलविले असता त्यांनी स्वतः हजर न राहता जन माहिती अधिकारी यांचेकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. के. एस. सुर्यवंशी यांना सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी प्राधिकृत केले.  सहाय्यक पोलीस अधीक्षक व पोलीस अधीक्षक यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात असलेला अनादर त्यांनी त्यांच्या कृतीतून स्पष्ट केला आहे. त्यांच्या या वर्तनाची नोंद सचिव (गृह) यांनी घेऊन त्यांना येथून पुढे आयोगाच्या सुनावणी साठी ज्या ज्या वेळी बोलवणे येईल त्या त्या वेळी त्यांना व्यक्तिशः हजर राहण्याच्या सूचना द्याव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची सखेद नोंद राज्य माहिती आयोगाने घेतली आहे.

अपीलार्थी यांनी या प्रकरणी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

१. “ माझ्या व माझ्या शाहू कारखाना व कुटूंबीयांविषयी समस्त गावकरी मंडळी दशमीगव्हाण यांनी दिनांक ०५-०८-२००५ रोजी ०१ ते ४३ लोकांनी त्रास देण्याच्या दृष्टीकोनातून खोटा अर्ज दिला त्याबाबत

त्यातील काही लोकांनी दिनांक २०-०८-२००५ रोजी खोटी परस्थिती मा. पोलीस अधीक्षकांच्या आणून दिली.

२. ग्रामपंचायत दशमीगव्हाण यांनी दिनांक ०१-११-२००५ पोलीस कार्यालयास माझ्याविषयी २११ लोकांच्या सह्या करुन मला त्रास तर दिलाच व वरिष्ठ कार्यालयाच्या डोळ्यात धुळ फेकली वरील दोन्ही अर्जात फसवणूक करुन त्रास दिला हा गुन्हा होत नाही का, तरी नगर तालुका पोलीस स्टेशन कार्यवाही करण्यास असमर्थ का, माझ्यासाठी वेगळे नियम व जमावाने केलेला गुन्हा होत नाही का किंवा आपण वरील प्रकरणी कार्यवाही करणार नाही का ?"

अपीलार्थीने सदर माहितीचा कालावधी सन २००४ ते २००६ असा दर्शविला आहे.

अपीलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक २९-०५-२००६ रोजी पत्र लिहून ग्रामस्थाविरुध्द प्रतिबंधक कारवाई करणे त्यांना योग्य वाटत नाही अशा अर्थाचे उत्तर दिले.

सदर पत्र प्राप्त होण्यापुर्वीच अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक १९-०५-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी माहिती देत नाही असे अपीलाचे कारण दर्शविले आहे. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही.

जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपील दाखल झाल्यानंतर त्यांनी त्या अपीलाची कोणत्याही प्रकारची दखल न घेणे ही बाब माहिती अधिकार अधिनियम कायद्या दृष्टीने गंभीर आहे असे

आयोगास वाटते. जन अपीलीय अधिकारी यांच्या या बेपर्व वर्तनाची दखल सचिव गृह यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची कोणतीही दखल घेतली नाही. मात्र तदनंतर काही दिवसांनी म्हणजे दिनांक २९-०५-२००६ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक नगर पोलीस स्टेशन यांनी अपीलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०४-२००६ चे अर्जास अनुसरुन उत्तर दिले. या उत्तरामध्ये त्यांनी ग्रामस्थाविरुध्द प्रतिबंधक कारवाई करणे योग्य वाटत नाही असे म्हटले आहे.

जन अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून असा युक्तीवाद मांडला गेला की अपीलार्थी व त्यांचे भाऊ, भास्कर मारोती माने यांचे आपापसात शेती, विहिर व इतर तत्सम प्रश्नावरुन सतत वाद असून त्यांनी न्यायालयात प्रकरणे दाखल केली आहेत व या दोघांनीही एकमेकांविरुध्द नगर तालुका पोलीस स्टेशन येथे तक्रारी नोंदविल्या आहेत. या संदर्भात अपीलार्थीने या प्रश्नाधीन अर्जाव्दारे संबंधित गावक-यांच्या विरुध्द ते कारवाई का करत नाही अशी मागणी केली आहे तर अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, दशमगव्हाण येथील गावकरी त्यांना व त्यांच्या कुटूंबियांना कायम त्रास देत असतात व या संदर्भात त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडे (नगर तालुका) अर्ज केला होता त्यावर काही कारवाई होत नाही. सदर कारवाई का होत नाही याची कारणे त्यांना माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीच्या आधारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत.

अपीलार्थीच्या मूळ अर्जाचे तसेच राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपीलार्थीस यांनी त्रास देणारे गावकरी

विरुध्द का कारवाई होत नाही याची कारणे हवी आहेत. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या तरतुदीमध्ये – ज्यामध्ये माहिती या शब्दाची व्याप्ती स्पष्ट केली आहे - सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कृतीचे समर्थन अपीलार्थीस करणे किंवा कोणतीही कारणे अपीलार्थीस देणे अभिप्रेत नाही. अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या पत्राने उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये गावक-या विरुध्द कारवाई करणे संबंधित विभागास योग्य वाटत नाही असे म्हटले आहे. त्यांना गावक-यांविरुध्द कारवाई करणे का योग्य वाटत नाही याची कारणे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीस जन माहिती अधिका-याकडून मागता येणार नाही कारण कारवाई न करण्याचा निर्णय पोलीस खात्याचा हा स्वतंत्र व प्रशासकीय स्वरुपाचा आहे त्यामध्ये ढवळाढवळ करुन संबंधित पोलीस अधिका-यांना सूचना देणे राज्य माहिती आयोगास योग्य वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. प्रसंगवशात येथे असे नमूद करण्यात येते की, या प्रकरणी अपीलार्थीस योग्य तो प्रतिसाद ठराविक मुदतीत देण्यामध्ये संबंधित विभागाला अपयश आलेले आहे तेव्हा त्यांना सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याकडे दाखल झालेल्या अर्जावर विहित वेळेत योग्य ती कारवाई करावी.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कानिफ मारुती माने, हिंमतनगर, प्लाट नं. ५७, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधीक्षक (ग्रामीण), पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव गृह विभाग मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १७६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २०-०७- २००७.

१. श्री.प्रदिप मधुकरराव सराफ, .. अपिलार्थी.
परिमल शाळेजवळ, विवेकानंद पुरम, लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याध्यापक,
संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, लातूर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, लातूर.

## विवेचन

अपिलार्थी श्री. प्रदिप मधुकरराव सराफ यांनी आयोगा समोर दिनांक- २५-०७-२००६ रोजी मुंबई येथे व्दितीय अपील सादर केले होते. अपिलार्थी यांनी सदर अपील पुन्हा दिनांक- ०९-०२-२००७ रोजी नवीन अपील म्हणून औरंगाबाद येथील आयोगाच्या कार्यालयात सादर केले.

दिनांक- ०९-०२-२००७ रोजी सादर केलेल्या अपीलाची दिनांक- १९-०५-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात येवून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात आले आहे. अपिलार्थीने दिनांक- २५-०७-२००६ रोजी आयोगाच्या मुंबई कार्यालयात दाखल केलेले व्दितीय अपील हे या कार्यालयाकडे वर्ग झाल्यामूळे, त्या अपीलाची आज दि- २०-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात आली . सदर अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत.

याच प्रकरणाची सविस्तर सुनावणी अपील क्रमांक-२००७/रामाआ/अपील/सिआर/१६२ खाली दिनांक- १९-०५-२००७ रोजी घेवून यापूर्वीच आदेश पारीत केलेले आहेत व या सुनावणीमध्ये दिनांक- १९-०५-२००७ रोजी पारीत केलेले आदेश कायम करण्यात येत आहेत. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक २०-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रदिप मधुकरराव सराफ, परिमल शाळेजवळ, विवेकानंद पुरम, लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००

निर्णय दिनांक २०-०७-२००७

श्री. सुनिल श्रीराम शेडुते, : अपीलार्थी

व्दारा पुजा एम्पोरियम, बसस्टॅण्ड, बीड

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य

केंद्र, मोहा तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुनिल श्रीराम शेडुते बीड हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मोहा तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड श्री. एस. जी. देशपांडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड श्री. आर. एन. वाघमारे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०२-२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "थकीत वेतन मिळण्यासाठी आदेश मिळण्या बाबत" माहिती मागितली होती. अपीलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जामध्ये अपीलार्थीने वेगवेगळ्या कालावधीचा उल्लेख करुन या कालावधीतील वेतन

मिळण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून आदेशाची आपेक्षा व्यक्त केली आहे. अपीलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे न पाठविता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद बीड यांच्याकडे पाठविला होता. अपीलार्थी यांनी केलेला दिनांक १८-०२-२००६ रोजीचा अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद बीड यांनी जन माहिती अधिका-यास पोस्टाने दिनांक १०-०३-२००६ रोजी पाठविला व जन माहिती अधिका-यास तो अर्ज दिनांक १७-०३-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाचे अवलोकन करता अपीलार्थीस निश्चितपणे कोणत्या स्वरुपाची माहिती हवी आहे याचा जन माहिती अधिकारी यांना बोध न झाल्याने त्यांनी अपीलार्थीस दिनांक ०१-०४-२००६ रोजी अपीलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जाव्दारे केलेली विनंती, ही माहिती होऊ शकत नाही त्यामुळे अपीलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने कळविले. सदर पत्राची पोहोच पावती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक १०-०४-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे मूळ अर्ज ५ दिवसाहून अधिक ठेवल्यामुळे त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमा नुसार दंड ठोठावण्यात यावा अशी विनंती केली आहे. सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००६ रोजी घेऊन अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळले व त्याप्रमाणे अपीलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५ मे २००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

जन अपीलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक ०६-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे व जन माहिती अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद बीड यांनी या प्रकरणात त्यांच्या कडून कर्तव्य पालनात कसूर झाल्यामुळे संबंधिताच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीचा अर्ज, जन अपीलीय अधिकारी यांनी त्यावर सुनावणी घेऊन दिलेले त्यांचे आदेश याचे अवलोकन केले असता त्यांनी ते जिल्हा परिषद बीड येथे कार्यरत असतानाच्या काही कालावधीतील थकीत वेतनाची मागणी केली आहे. अपीलार्थी यांनी कोणत्याही प्रकारे एखाद्या विशिष्ट अशा माहितीची मागणी या अर्जामध्ये केलेली दिसून येत नाही तर अपीलार्थी त्यांचे वैयक्तीक गा-हाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या व्दारे सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये माहिती शब्दाची व्याख्या स्पष्ट केली आहे. सदर व्याख्या खालील प्रमाणे आहे.

“माहिती” याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम २ (च) चे अवलोकन केले असता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती म्हणजे नेमके काय याचा ऊहापोह केलेला दिसून येतो. या स्पष्टीकरणामध्ये अपीलार्थीने या अर्जाव्दारे केलेली विनंती कोणत्याही प्रकारे मोडत नसल्याने व कोणत्याही प्रकारे वैयक्तीक गा-हाण्याचा निपटारा करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये तरतूद नसल्याने अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे केलेल्या विनंती पूर्तीची मागणी ही, ‘‘माहिती’’ या सदरात मोडत नसल्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी केलेली कारवाई राज्य माहिती आयोगास योग्य वाटते. तथापि अपीलार्थीने निर्देशित केल्याप्रमाणे, त्यांनी प्रथमतः उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद बीड यांच्याकडे केलेला त्यांचा दिनांक १८-०२-२००६ रोजीचा अर्ज त्यांनी संबंधित जन माहिती अधिका-यास ५ दिवसाच्या आत पुढील कारवाईसाठी पाठवून त्याची एक प्रत अपीलार्थीस द्यावयास हवी होती तथापि त्यांनी अशा प्रकारे कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. याउलट त्यांनी सदर अर्ज आपल्याकडे २२ दिवस विना कारवाई ठेऊन दिला. अपीलार्थीचा मूळ अर्ज २२ दिवस विना कारवाई ठेऊन देणे हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद बीड यांचे वर्तन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींच्या पार्श्वभूमीवर निश्चितच आक्षेपार्ह आहे असे म्हणावे लागेल. त्यांनी यापुढे भविष्यात, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीसाठी प्राप्त होणा-या अर्जाचा वेळेत निपटारा करावा अशा सूचना त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २० जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल श्रीराम शेडुते, व्दारा पुजा एम्पोरियम, बसस्टॅण्ड, बीड जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मोहा तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २०१/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २०-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.श्रीराम किशनराव येडे,<br>धानोरा रोड, बीड, जिल्हा-बीड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>आगार व्यवस्थापक,<br>राज्य परिवहन बीड आगार<br>जिल्हा-बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>राज्य परिवहन बीड आगार,<br>जिल्हा-बीड. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. श्रीराम किशनराव येडे, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, बीड आगार, श्री.बी.जी. खळसोडे, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन बीड आगार, श्री.प्र.बा.जगताप, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१. शिस्त व अपील कार्यपध्दतीचे कलम १ ते ६८ सुधारीत प्रमाणीत प्रत

२. प्रवाशांना दिलेल्या दंडाच्या पावतीची प्रमाणीत प्रत.

३.  मार्गपत्रक संक्षेप क्रमांक २३९७१२, दिनांक- १५-०८-२००४ ची प्रमाणीतप्रत

४.  मार्गपत्रक क्रमांक ०४५२८६ दिनांक १५-८-२००४ ची प्रमाणीत प्रत

अपिलार्थीने सदर माहिती २००४-२००६ या सालाकरिता शिघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- ०४-०४-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस संबंधीत प्रकरण विभाग नियंत्रक बीड यांच्याकडे अपील कार्यवाहीसाठी प्रलंबीत असल्यामूळे अपिलार्थीने त्यांच्याकडे संपर्क साधण्या विषयी सूचीत केले आहे. सदर पत्राची प्रत विभाग नियंत्रक,बीड यांना सादर केली होती. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २० (१) व २० (२) नूसार कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००६, ३०-०५-२००६ व ३१-०५-२००६ व १५-०६-२००६ अशा चार वेळा सुनावणीच्या तारखा ठेवल्या होत्या. तथापि अपिलार्थी यांच्या वकीलाच्या विनंतीवरुन या सुनावण्या पुढे ढकलून अंतिम सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १७-०६-२००६ रोजी घेतली. या सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची अपिलार्थी यांची मागणी अमान्य करुन अपील निकाली काढले. त्या निकाल पत्रामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी झालेला विलंब हा हेतूपूरस्सर व कुळग्रह दुषीत हेतूने झालेला नसल्याचे अनुमान काढले आहे. अपिलार्थीने प्रथम अपील केलेला दिनांक- २९-०४-२००६ असा आहे तर अपीलाचा निर्णय जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २८-०६-

२००६ रोजी दिल्याचे दिसून येते व या दोन्हीही घटनाचा मध्यंतरीच्या काळात दिनांक- ०९-०५-२००६ रोजी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी जाणीवपूर्वक कसूर केल्याने, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) व २० (२) नुसार शास्ती लावण्याची व शिस्तभंग कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी, यांच्या तर्फे असा मुद्दा मांडण्यात आला की, अपिलार्थीस जरी दिनांक- ०९-०५-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली असली तरी ती अर्धवट स्वरुपाची अशी आहे. अपिलार्थीस मार्गपत्रक क्रमांक- ४५२८६, दिनांक- १५-०८-२००४ ची प्रमाणीतप्रत या माहितीचा यामध्ये समावेश नाही. म्हणजेच ही माहिती त्यांना अर्धवट मिळाली आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थी यांना, राज्य मार्ग परिवहन महामंडळाने त्यांना बडतर्फ केल्यामूळे अपिलार्थी यांचे जे प्रकरण न्यायालयात चालू असून त्या प्रकरणामध्ये आवश्यक आहे. केवळ या माहितीची ही प्रत त्यांच्या जीवनाची पुढील दिशा ठरवू शकते किंबहूना सदर माहिती ही त्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विरुध्द न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणाचा आत्मा आहे, असे त्यांनी पुढे प्रतिपादिन केले.

सदर कागदपत्र म्हणजे ज्यावेळी एस.टी.बसची तपासणी केली होती त्यावेळी एस.टी.बसमध्ये किती प्रवासी बसलेले होते, तिकीटे किती खपली होती, याची सविस्तर माहिती होय. अपिलार्थी हे साखरवाडी ते बीड या मार्गावर बसवर वाहक म्हणून कार्यरत

असतांना अचानक तपासणी मध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली रक्कम कमी सापडली व विनातिकीट प्रवास करणारे प्रवासी सापडले. त्यामूळे अपिलार्थीस बडतर्फ केले गेले. अपिलार्थीने या निर्णया विरुध्द न्यायालयामध्ये दावा दाखल केला असून त्यांची बाजू प्रभावीपण मांडण्यासाठी त्यांना या कागदपत्राची आवश्यकता असल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

याच प्रकरणात विभागीय नियंत्रक तथा जनअपिलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी या प्रकरणी शोध घेतला असता त्यांना सदर कागदपत्रे पावसात भिजून नष्ट झाल्याची माहिती दिनांक- १७-०६-२००७ रोजी (आयोगाकडील सुनावणीपूर्वी फक्त ३ दिवस आधी) आगार व्यवस्थापक बीड यांच्याकडून लेखी पत्राव्दारे मिळाली आहे, असे सांगितले. त्यामूळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी आज उपलब्ध नाही, हे सिध्द होत आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसली तरी अपिलार्थीस त्या प्रमाणे लेखी कळविण्यात यावे म्हणजे अपिलार्थीस त्यांचे म्हणणे न्यायालयामध्ये अधिक प्रभाविपणे मांडण्यासाठी सूकर होईल, असे वाटते.

या प्रकरणी अपिलार्थीने मूळअर्ज दिनांक- २३-०३-२००६ रोजी केला असता अपिलार्थीस काही माहिती अर्धवट स्वरुपात दिनांक- ०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीस ही माहिती विहित कालावधी पेक्षा १७ दिवस विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. या विलंबाचे कारण विचारले असता, प्रथमतः हे प्रकरण विभाग नियंत्रक, बीड यांच्याकडे ते या प्रकरणी सक्षम अधिकारी असल्यामूळे त्यांच्याकडे पाठविण्यात आले होते तथापि तद्नंतर तत्कालीन विभागीय नियंत्रकाने प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे हे प्रकरण दुस-या प्राधिकरणाकडे पाठविण्याची विनंती केली. प्रादेशिक

व्यवस्थापक,राजय परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांची विनंती मान्य करुन सदर प्रकरण विभागीय नियंत्रक, परभणी यांच्याकडे सोपाविले.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी दिनांक- ०९-०५-२००६ रोजी माहिती दिली आहे ती त्यांनी विभागीय नियंत्रक, परभणी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेवून नंतर ती अपिलार्थीस पुरविली असल्याचे त्यांनी सांगितले.

कागदपत्राचा अशा प्रकारच्या प्रवासामध्ये जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास उशिर झाल्याचे सिध्द होत आहे. यामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा माहिती लपविण्याचा कोणताही असद्‌हेतु होता किंवा त्यांनी ही माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली, असे सिध्द होत नाही. तथापि अपिलार्थीस माहिती अर्धवट मिळाली, हे मात्र सिध्द होत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने एकदा माहितीची मागणी केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांना ही माहिती तीस दिवसाच्या आत देण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांनी फारशा गांर्भीयाने पार पाडली नसल्याचे दिसून येते. या संदर्भात त्यांना अशी समज देण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात त्यांच्याकडे भविष्यात अर्ज प्राप्त झाल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीचे त्यांनी कटाक्षाने पालन करावे व अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात व त्याचबरोबर अपिलार्थी यांनी मागणी केलेली क्रमांक- ४५२८६ दिनांक- १५-०८-२००४ च्या मार्गपत्रका संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपिलार्थीचे अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या क्रमांक- ४५२८६ दिनांक- १५-०८-२००४ च्या मार्गपत्रकाच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक- २०-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.श्रीराम किसनराव येडे, संत नामदेव नगर (पूर्व) धानोरा रोड, बीड-४३१२२.

२ जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, बीड आगार, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन, बीड आगार, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०५

निर्णय दिनांक २०-०७-२००७

श्री. प्रल्हाद आबाजी कदम, : अपीलार्थी

कॅनरा बॅक कॉलनी, निलकमल हॉटेल मागे,

धानोरा रोड, बीड, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बॅक म. बीड, राजुरी वेस, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. प्रल्हाद आबाजी कदम बीड (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक म. बीड जिल्हा बीड यांचे वतीने त्यांचे वकील डी. जे. चौधरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड श्री. आप्पाराव लिंबाजी घोलकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजी अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेतील प्रशासकीय व आस्थापना बाबीविषयक एकूण ११ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१ “ सहकार आयुक्त व निबंधक सह सं. म. रा. पुणे यांचे पत्र क्र. ए. डी. एम/२/ए/सेक्शन ७४/(१) १९९६ दिनांक ६ ऑगस्ट १९९६ चे आदेशास संचालक मंडळाने दिनांक १७-०९-९६ रोजी मंजूर केलेल्या ठरावाची सत्यप्रत.

२ सन १९९७ वरील कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी.

३ १६-०३-१९९८ चे सभेत पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांची कार्यालयीन टिपणी, मा. कर्मचारी समितीने मंजुरी दिलेल्या ठरावाची सत्यप्रत.

४ औद्योगिक न्यायालय औरंगाबाद यांनी श्री. एस. आर. घायाळ व अरुण कुलकर्णी यांचे निकालपत्रावर ऑफिस नोट व विधिज्ञाचा सल्ला मा. हायकोर्टात अपील करावे किंवा नाही.

५ औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद यांनी श्री. पी. ए. कदम यांचे निकालपत्रावर ऑफिस नोट व विधि सल्लागारांची पत्रे या प्रकरणात मा. उच्च न्यायालयात अपील करावे का ? पदोन्नती द्यावी का ? केव्हा पासून द्यावी इत्यादी पत्रव्यवहार.

६ बॅकेने तयार केलेले पदोन्नतीचे नियम (Promotion Rules)

७ श्री. कदम यांचे पदोन्नती बाबत स्थापन केलेल्या कमेटीचे सर्व प्रोसेडिंग व दोन्ही बाजूने सादर केलेल्या पुराव्यांची कागदपत्रे तसेच पदोन्नती कमेटीने दिलेल्या निकालाची प्रत मा. न्यायालयाचे निकाल घोषित झालेल्या तारखेपासून पदोन्नती न देण्याची कायदेशीर कारणे.

८ श्री. कदम यांची पदोन्नतीचा विचार करण्यासंबंधी मा. सहकार आयुक्त व निबंधक पुणे दि. ०४ जुलै २००१ चे पत्र व मा. सह निबंधक सहकारी संस्था विभाग, लातूर यांचे दिनांक १४-०५-२००१ चे पत्र यासंबंधी बॅकेने दिलेले उत्तर.

९	श्री. घायाळ व कुलकर्णी यांना मा. औद्योगिक न्यायालयाचे निकालानंतर केव्हा पासून व कोणत्या तारखेस किती रक्कमा दिल्या त्या पत्राची नक्कल, ऑफिस नोट व विधीज्ञाचा सल्ला याच्या नक्कला.

१०	श्री. ए. एन. कुलकर्णी यांच्या बॅकेत प्रथम नियुक्ती आदेशाची प्रत (Appointment Order).

११	श्री. कदम यांनी दिलेले राजीनामापत्र आणि त्यावरील ऑफिस नोट व ठरावाची सत्यप्रत."

३.	अपीलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

४.	अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांच्याकडील दिनांक १०-०२-२००६ च्या पत्रान्वये असे कळविले की, संबंधित माहिती १०/११ वर्षापुर्वीची असून शोधकार्यास अवधी लागत आहे या कारणामुळे अपीलार्थीने मागितलेली माहिती पाठविण्यास त्यांना आणखी १५ दिवसांचा कालावधी लागेल. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी परत दिनांक २१-०२-२००६ रोजी अपीलार्थीस एक पत्र लिहून अपीलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागणारे शुल्क रुपये १०२ इतके बॅकेकडे जमा करण्यास कळविले. त्याच बरोबर अपीलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे निर्देशित केले. तदनंतर अपीलार्थीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेमध्ये १०२ रुपये इतक्या रकमेचा दिनांक ०३-०३-२००६ रोजी भरणा केला व दिनांक ०८-०३-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर माहिती पोस्टाने पाठविली. यामध्ये अपीलार्थीने दिनांक ०३-०३-२००६ रोजी रक्कम भरल्याची कल्पना जन माहिती अधिकारी यांना दिली होती असे अपीलार्थीचे म्हणणे आहे तर अपीलार्थीने रक्कम भरल्याची कल्पना जन माहिती अधिका-यास दिनांक ०८-०३-२००६ रोजी दिली असे जन माहिती अधिकारी यांच्या वकीलाचे म्हणणे आहे.

५.	जन माहिती अधिका-याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपील विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या कार्यालयास दिनांक १२-०४-२००६ रोजी प्राप्त झाले. विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर हे या प्रकरणी अपीलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांचेकडील दिनांक १८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांना पाठविले.

६.	जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या अपीलावर त्यांनी दिनांक ०२-०५-२००६, २३-०५-२००६, २९-०५-२००६ व ०२-०६-२००६ अशा चार सुनावण्या घेतल्या. जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचे आदेश दिनांक ०२-०६-२००६ रोजी पारीत केले व अपीलार्थीचे त्यांच्याकडे केलेले अपील फेटाळले.

७.	जन अपीलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा कडे दिनांक ०१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) मधील तरतुदी नुसार, माहिती विलंबाने मिळाल्यामुळे शास्ती लावण्यात यावी व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

८.	आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थीतर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. या संदर्भात त्यांनी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ कडे आयोगाचे लक्ष वेधले आहे. या मुद्यामध्ये त्यांनी

“१९९७ वरील कर्मचा-यांची” सेवा जेष्ठता यादी मागितली होती. १९९७ वरील म्हणजे नक्की त्यांना काय म्हणावयाचे आहे असे त्यांना विचारले असता १९९७ सालची सेवा जेष्ठता यादी असे उत्तर दिले. अपीलार्थीने १९९७ सालची सेवा जेष्ठता यादी मागितली असतांना बॅकेच्या जन माहिती अधिका-याने त्यांना २००१ ची सेवा जेष्ठता यादी दिली. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात कार्यालयीन टिपणी मागितली असता ती टिपणी अपीलार्थीस न देता अंतीमतः कर्मचारी समितीने मंजूरी दिलेल्या ठरावाची प्रत त्यांना दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ७ च्या बाबत अपीलार्थी यांना त्यांच्याकडून स्थापन केलेल्या समितीच्या दिनांक ०५-०२-२००६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त हवे होते तथापि त्यांना ते दिले नाही तसेच मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात घायाळ व कुलकर्णी यांना औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानंतर निश्चित किती रक्कम दिली याची मागणी करुनही त्यांना या दोन्ही कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी व कोणत्या तारखेपासून किती वेतन निश्चित केले आहे याची माहिती दिली परंतु निश्चित एकूण किती रकमा दिल्या त्याची माहिती दिली नाही.

९. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने अपीलार्थीस १९९७ रोजी अस्तित्वात असलेल्या कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी देण्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले.तर अपीलार्थीने त्यांच्या पदोन्नतीच्या बाबत अपीलार्थीस निश्चितपणे कोणत्या बैठकीचे इतिवृत्त हवे होते हे नमूद न केल्याने ते त्यांना देता आले नाही, असे जन माहिती अधिका-यातर्फे सांगण्यात आले. मुद्दा क्रमांक ९ च्या बाबत ऑफिस नोट टाकली नव्हती व विधीज्ञाचा सल्ला मागितला नसल्यामुळे हे दोन्ही अस्तित्वात नाही त्यामुळे ते अपीलार्थीस देणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे सांगितले. वरील दोन्ही बाजुंनी मांडलेले मुद्दे विचारात घेऊन असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्या पासून ७ दिवसाच्या आत (१) १९९७ रोजी प्रचलीत असलेली कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी द्यावी. (२) श्री. कदम यांच्या पदोन्नतीबाबत दिनांक ०५-०२-२००६ च्या

बैठकीचे इतिवृत्ताची प्रत अपीलार्थीस तत्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. तव्दतच श्री. घायाळ व श्री. कुलकर्णी यांना एकूण किती रक्कम दिली याची माहिती विनामूल्य अपीलार्थीस द्यावी.

१०. जी माहिती बॅकेकडे उपलब्ध नाही, त्या संदर्भात बॅकेने अपीलार्थीस सदर माहिती उपलब्ध नसल्याचे प्रथम उत्तर देत असतांना कळविले असते तर त्याचा निर्णय लवकर झाला असता व तसे कळविण्याची दक्षता घेतली नसल्यामुळे. क्ष्यांना व्दितीय अपील करावे लागले. यापुढे बॅक व्यवस्थापनाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार आलेल्या पत्रव्यवहारा संबंधात विशेषतः जागरुक राहावे व दक्षता बाळगावी अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे.

११. या सर्व प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्याबाबत कोणत्याही प्रकारची मुद्दाम होऊन टाळाटाळ केली नाही किंवा त्यांची ती माहिती न देण्यामध्ये कोठलाही असद्‌हेतू होता असे राज्य माहिती आयोगास आढळले नाही. अपीलार्थीस माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काही विसंगती दिसून आल्यास व त्या संदर्भात इतर प्रशासकीय निर्णय अपीलार्थीस आवश्यक असल्यास त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे वेगळे अपील करावे असे त्यांना सुचविण्यात येत आहे. याऊपरही अपीलार्थीस त्यांना प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात काही शंका असतील तर त्यांनी या प्रकरणात संदर्भित सर्व नस्त्या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्या अवलोकनार्थ मागवून घ्याव्यात.

१२. या प्रकरणी प्रथम सुनावणी दिनांक ०९-०७-२००७ रोजी घेण्यात आली होती त्यावेळी सर्व हजर असतांना जन माहिती अधिकारी, यांचेतर्फे मुदतवाढ मागण्यात आली त्यावेळी अपीलार्थी यांनी जाण्यायेण्याचा खर्च मिळावा अशी विनंती केली होती. हे अपील दिनांक ०६-०७-२००७ रोजीच युक्तीवाद झाले असते तर निकाली निघू शकले असते व त्यामुळे

अपीलार्थी यांना पुन्हा सुनावणीसाठी येण्याजाण्याचा खर्च करावा लागला नसता ही बाब लक्षात घेता असे आदेशित करण्यात येते की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने अपीलार्थी यांना दिनांक ०६-०७-२००७ रोजी जाण्यायेण्यासाठी लागलेला प्रवासखर्च रुपये १८२ /- अदा करावा.

१३. वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जावर काळजीपूर्वक कारवाई करावी.

३. अपीलार्थी यांना दिनांक ०६-०७-२००७ रोजी अपील सुनावणीस येण्याजाण्यासाठी लागलेला खर्च रुपये १८२ / बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक यांनी अपीलार्थीना अदा करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २० जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रल्हाद आबाजी कदम, कॅनरा बॅक कॉलनी, निलकमल हॉटेल मागे, धानोरा रोड, बीड, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक म. बीड, राजुरी वेस, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २१२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २०-०७-२००७.

१. श्रीकृष्ण एल.देशपांडे, .. अपिलार्थी.
सोनीमहल-३८,
महावीर हौसिंग सोसायटी, नांदेड

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
कंधार, जिल्हा- नांदेड.

२.	जनअपिलीय अधिकारी तथा		..
तालुका कृषी अधिकारी, कंधार
जिल्हा-नांदेड.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.श्रीकृष्ण एल.देशपांडे,(येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कंधार, श्री.व्ही.एन.मंगनाळे, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी,कंधार, श्री.ए.डी.बरडे, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०५-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून तालूका कृषी अधिकारी, कंधार यांच्या कार्यालयातंर्गत विविध योजनेच्या कामांच्या संदर्भात सर्वसाधारण स्वरुपाची माहिती मागविली होती.

सदर माहितीचा कालावधी अपिलार्थीने दिनांक- ०१-०४-२००५ ते दिनांक- ३१-०३-२००६ असा दर्शविला आहे. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहितीमध्ये - “ रोजगार हमी योजने अंतर्गत प्राप्त निधी रक्कम माहे, रोजगार हमी योजनेचे ज्या गावी काम करण्यात आले त्या गावाचे नांव, कामाचा प्रकार, कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च, कामावर करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम ज्या मस्टरव्दारे खर्च करण्यात आला त्या मस्टरचा क्रमांक व दिनांक, मस्टरचा कालावधी व मस्टरवरील एकूण मजूर संख्या, रोजगार

हमी योजने अंतर्गत काही रक्कमेतून कुशल कामासाठी मजूरा व्यतिरीक्त अन्य यंत्रणेकडून काम करुन घेण्यात आले असल्यास त्याचा वेगळा तपशील, कामासाठी धान्य योजने अंतर्गत सदर कार्यालयास प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भातील तपशीलवार माहिती विहित नमुन्यात कामासाठी धान्य योजने अंतर्गत प्राप्त निधी रक्कम, कामासाठी धान्य योजने अंतर्गत ज्या गावी काम करण्यात आले त्या गावाचे नाव, कामाचा प्रकार, कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च नगदी / धान्य रुपाने धान्याचा प्रकार आणि परिमाण, कामावर मजूरांना वितरीत केलेले एकूण धान्य व त्या धान्याचा प्रकार, वज आणि किंमतीसह, कामासाठी धान्य योजने अंतर्गत वाटण्यात आलेल्या एकूण कुपन्सची संख्यचा वजन परिमाणासह, कामासाठी धान्य योजने अंतर्गत धान्य ज्या दुकाना मार्फत देण्यात आले त्या दुकानाचा क्रमांक, दुकानाचे नाव व गावाचे नाव - या मुद्यांचा समावेश होता.”

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या पत्रास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्राव्दारे दिनांक- २१-०९-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क ७५/- रुपये इतक्या रक्कमेचा भरणा त्यांचे कार्यालयात करण्या संदर्भात सूचना दिल्या. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पोंहचले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १०-१०-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपील केले.

सदर अपील जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- १८-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या अपीलअर्जामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जा व्यतिरीक्त

दिनांक- १५-०९-२००६, २८-०९-२००६ व ०७-१०-२००६ रोजी दुरध्वनि व्दारे माहितीची मागणी केल्याचे म्हटले असून त्यांच्या या मागणीकडे माहिती अधिका-याने दुर्लक्ष करुन त्यांनी माहिती मिळण्यापासून वंचीत ठेवले व कायद्याचे उल्लंघन केले असल्याचे जनअपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आले आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी सदर अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आज सुनावणीमध्ये कबुल केले आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलअर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघानाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला अंतिम व निश्चीत स्वरुपाचा निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहित केलेल्या कालावधीमध्ये देणे अपेक्षित आहे. तथापि त्यांनी यापैकी कोणतीही कृती केली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये ७५ रुपये इतक्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्या विषयी सूचीत केले. तथापि अपिलार्थी यांनी सदर रक्कम जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरली नाही.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- २३-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांची मूळमाहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाइ करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे दिसून आले की, मुळात अपिलार्थी यांनी केलेले त्यांचे दिनांक- ०२-०८-२००६ रोजीच्या पत्रास जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक- २१-०९-२००६ रोजी म्हणजे विहित कालावधीपेक्षा वीस दिवस इतक्या विलंबाने दिलेला आहे. प्रथम प्रतिसाद विलंबाने देवूनही त्यामध्ये अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहितीची मागणी न देता ७५/- रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचीत केले आहे. तर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, त्यांचे कडील पत्र क्रमांक- १६५४, दिनांक- ०२-११-२००६ हे अपिलार्थीस उद्देशून लिहीलेले पत्र दिनांक २१-११-२००६ रोजी पोष्टात टाकले व अपिलार्थीस हे पत्र दिनांक- २३-११-२००६ रोजी प्राप्त झाले. या पत्रामध्ये देखील जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ७५/- रुपयाचा भरणा शासकिय तिजोरीत करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर जनअपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणीची कोणत्याही प्रकारची नोटीस अपिलार्थीस न काढता अपिलार्थीस दुरध्वनीव्दारे दिनांक- ०७-१२-२००६ रोजी सुनावणीसाठी समक्ष बोलाविले व त्या दिवशी त्यांना काही महत्वाचे काम असल्यामूळे ते कार्यालयात उपस्थित राहू शकले नाहीत. अशा आशयाचे पत्र त्यांनी आज आयोगासमोर सादर केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या माहिती अधिका-यांशी अपिलार्थी यांची चर्चा होवून त्या चर्चेमध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर रक्कमेचा भरणा प्रथम करण्या विषयी सूचीत केले असल्याचा उल्लेख केला आहे. राज्य माहिती आयोगाकडे जनअपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या त्यांच्या म्हणण्यावर त्यांनी आजतागायत अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात आवश्यक त्या रक्कमेचा भरणा न केल्यामूळे माहिती न पुरविल्याचे कबुल केले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीनूसार अपिलार्थी यांने मागितलेली माहिती कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत देणे जनमाहिती

अधिकारी यांनी देणे भाग आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस विहित केलेला कालावधी म्हणजे अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज केलेल्या दिनांकापासून पुढील तीस दिवसामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती पुरविण्याचा प्रयत्न झाल्याचा अथवा त्यांच्या पत्रांना सकारात्मक प्रतिसाद दिला गेला असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या प्रथम दखल घेतली तीच मुळीच विहित कालावधी पेक्षा २० दिवस इतक्या जास्त विलंबाने, सुनावणी आज आयोगासमोर उपस्थित असलेल्या जनमाहिती अधिका-यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्या संदर्भात काहीही कार्यवाही  का केली नाही असे विचारले असता, त्यांनी त्यांच्याकडे सदर पदाचा अतिरीक्त पदभार होता व याच कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामूळे ज्या शेतक-यांच्या शेत जमिनीचे  नुकसान झाले आहे, अशा शेतक-याच्या शेती जमिनीचा सर्वे करण्याचे त्यांनी काम केल्यामूळे ते ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देवू शकले नाही, असे सांगितले. सदर माहिती न देण्यामध्ये त्यांचा कोणताही असद्हेतू नव्हता किंवा त्यांनी माहिती देण्यास मुद्याम टाळाटाळ करण्याचा उद्देश नव्हता. असेही त्यांनी पुढे स्पष्ट केले.

या प्रकरणात दोन्हीही बाजूने केलेल्या कृतीचे पृथकरण केले असता, अपिलार्थीस या प्रकरणी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती सर्वसाधारण व  मोठया स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आपल्या मूळमाहितीच्या अर्जामध्ये कोणत्याही एका विशिष्ट कामाचा उल्लेख न करता सर्वसाधारण स्वरुपाची माहिती विचारली आहे. तर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणा केले नाही. ही एकच बाब नजरेसमोर ठेवल्याचे दिसून येते. वास्तविकतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये केलेल्या माहिती संदर्भातील आपला निर्णय अपिलार्थीस दिनांक- ०१-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जनमाहिती अधिकारी यांनी देणे भाग होते. तथापि त्यांनी असे न

करता माहिती देण्याची मदत संपवून गेल्यानंतरही वीस दिवस इतक्या विलंबाने अपिलार्थीस ७५/- रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे पत्र दिले. जनअपिलीय अधिकारी यांनी देखील याच पत्राचा आधार घेवून  अपिलार्थीची सुनावणी न घेता, त्यांच्याकडील दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस शुल्क भरण्याची विनंती केली. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडील केलेल्या या  दोन्हीही कृती पहाता त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५च्या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात किमान  आवश्यक ते ज्ञान नाही, असे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ घेतलेल्या अशा प्रकारच्या उदासिन भूमिकेबद्दल त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. याची नोंद त्यांच्या वरीष्ठानी यथायोग्यरित्या घ्यावी.

जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर अपिलार्थीने मूळअर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास सांगितले.

या प्रकरणी वरील प्रमाणे विवेंचन लक्षात घेता व दोन्हीही बाजूने आयोगासमोर मांडलेला युक्तीवाद लक्षात घेता, असे आदेशीत करण्यात येते की,

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जाव्दारे मागणी केलेली माहिती,  हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिसाच्या आत विनामुल्य देण्यात यावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिसाच्या आत विनामुल्य देण्यात यावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत त्यांना ताकीद देण्यात येत आहे. याची नोंद कृषि आयुक्त पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

औरंगाबाद  
दिनांक- २०-०७- २००७.

**(वि. बा. बोरगे)**  
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्रीकृष्ण एल.देशपांडे, सोनी महाल, ३८, महावीर हाऊसिंग सोसायटी, नांदेड.

२ कृषि आयुक्त, मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड, पुणे- ४११००१.

३ जनमाहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालूका कृषी अधिकारी कार्यालय, कंधार, जिल्हा-नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जनअपिलिय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कंधार, जिल्हा- नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १९७/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २१-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. निबांळकर उदयसिंह प्रकाशराव,<br>नगरपरिषद सदस्य, उस्मानाबाद.<br>मेन रोड, निंबाळकर गल्ली,<br>उस्मानाबाद-४१३५०१. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>अधिक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-२१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद,श्री.व्ही.बी.मदने, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी उस्मानाबाद, श्री.डी.आर.बनसोड, ( येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०४-०२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे देशीदारुच्या परवान्याविषयी खालील माहितीची मागणी केली होती.

"१. नगरपरिषद हद्दीत नगरपरिषदेच्या आवारात परवाना कक्ष (परमीटरुम) चालू करण्यासाठी शासन नियमाने लागणा-या आवश्यक कागदपत्राची यादी (नावे) व त्यासंबंधी असलेल्या शासन नियमाची सत्यप्रत (शासन नियमाने अटीने, शर्थीने किंवा निर्देशाप्रमाणे अत्यावश्यक असलेले कागदपत्र व नियमाची प्रत)

२. सौ.निर्मला दत्तात्रय सुर्यवंशी यांनी आपल्याकडे दाखल केलेली सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती.

३. निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद, यांनी लायसन्स देण्यासंबंधाने केलेल्या जागेचा पंचनामा त्यासंबंधाने इतर गाळाधारकाचे नाहरकत प्रमाणपत्राची सत्यप्रत."

अपिलार्थीने सदर माहिती २००४-२००५ व २००५-२००६ या कालावधीतील मागीतली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र दिनांक- १६-०२-२००६ अन्वये सर्व प्रथम प्रतिसाद दिला. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती पहाता त्यांनी अपिलार्थीस हॉटेल परवान्याच्या नियमाची प्रत व परवान्याच्या अर्जाची नियमाची प्रत दिल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेला मुद्दा क्रमांक-२ व ३ मधील माहितीचा समावेश नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली सदर माहिती अर्धवट असल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे

दिनांक- २९ मार्च, २००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) मधील तरतुदीनूसार शास्ती लावण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

सदर अपील जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- २९ मार्च, २००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या कागदपत्रानूसार दिसून येते. तथापि जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद यांच्याकडे सदर अपीलाची प्रत कार्यवाहीसाठी उपलब्ध होवू शकली नाही व हे अपील जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस येवू शकले नाही, असे जनअपिलीय अधिकारी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली अर्धवट माहिती व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून या अपीलावर सुनावणी न झाल्याने अपिलार्थीने व्यथीत होवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २७-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली नसल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २०(१) व २० (२) मधील तरतुदीनूसार शास्ती लावण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली नाही. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या प्रथम अर्जास विहीत कालावधीमध्ये प्रतिसाद दिला असलातरी त्यांनी अपिलार्थीस जी माहिती दिली आहे ती अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती नाही. त्याचबरोबर

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील करुनही अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची प्रत सुनावणीसाठी उपलब्ध न होवू शकल्यामूळे जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम सुनावणी घेतली नाही.

या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगास आज झालेल्या सुनावणीमध्ये असे सांगितले की, त्यांनी ही सुनावणी दिनांक- २६-०७-२००७ रोजी म्हणजेच आयोगाकडील आजची सुनावणी झाल्यापासून सहा दिवसाच्या आत घ्यावयाचे ठरविले आहे. तेंव्हा असे आदेशीत करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २६-०७-२००७ रोजी अपिलार्थी यांची प्रथम अपीलावर महाराष्ट्र अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहीत मुदतीमध्ये सुनावणी घेवून आपला निर्णय द्यावा. या निर्णयाने जर अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर अपिलार्थी हे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील. तव्दतच अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेले प्रथम अपील कार्यालयातून गहाळ होणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. या प्रकरणामध्ये जे कर्मचारी / अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नुसार योग्यती कार्यवाही जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी करावी, असेही पुढे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील निकाली काढण्यात येत आहे.

५. जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २६-०७-२००७ रोजी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेवून आपला निर्णय त्वरित द्यावा. हा निर्णय मान्य नसल्यास अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे पुढील ३० दिवसाचे आत व्दितीय अपिल करु शकतील.

६. या प्रकरणामध्ये अपिलार्थीस माहिती वेळेत न देण्या संदर्भात जे कर्मचारी / अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नुसार योग्यती कार्यवाही जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी करावी.

औरंगाबाद
दिनांक- २१-०७-२००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

७. श्री.निबांळकर उदयसिंह प्रकाशराव, मेनरोड, निंबाळकर गल्ली, उस्मानाबाद.
८. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
९. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना योग्य त्या कारवाइस्तव देण्यात येते.
१०. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
११. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३३१/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २१-०७-२००७.

१. श्री. सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, .. अपिलार्थी.
५/१/५५, उस्मानपूरा,
तारापान सेंटर जवळ, औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तलाठी सजा सातारा,
तालूका व जिल्हा-औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा ..
तहसीलदार औरंगाबाद.

## <u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-२१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सजा सातारा, तालूका औरंगाबाद, श्री.जाधव, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार औरंगाबाद, श्रीमती अर्पणा सोमानी, ( येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १४-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे विभागीय लोकशाहीदिन टोकन क्रमांक-२६३, दिनांक- १०-१०-२००५ ते दिनांक- १४-०२-२००६ पर्यंतच्या कालावधी या विषयावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

या प्रकरणी विभागीय आयुक्त औरंगाबाद हे जनमाहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या मार्फत तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडून तलाठी सजा सातारा तालूका व जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे चौकशीसाठी पाठविला होता. तद्नंतर अपिलार्थी यांना विभागीय आयुक्तांनी त्यांचेकडील दिनांक- १७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेला अर्ज तलाठी सजा सातारा यांच्याकडे अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी हस्तांतरीत केला होता व त्याची एक प्रत अपिलार्थीस सुध्दा देण्यात आली होती.

तलाठी सजा सातारा यांच्याकडे सदर अर्ज हा जनमाहिती अधिकारी या नात्याने पाठविला होता तथापि संबंधीत तलाठी सातारा यांनी कोणतीही कृती न करता सदर संचिका तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे पाठविली आहे. तहसीलदार औरंगाबाद यांनी तलाठी सातारा यांच्याकडून आलेल्या माहितीच्या आधारे अहवाल तयार केला व तो जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना सादर केला. तद्नंतर अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाबाबत काय घडामोडी झाल्या, याची तहसीलदार, औरंगाबाद यांना कल्पना नसल्याचे आज झालेल्या सुनावणीमध्ये आढळून आले आहे.

अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने नंतरच्या काळात दिनांक- १७-०३-२००६ रोजी तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपील केले. या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी हे अपील जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त न झाल्याने झाली नाही. हे जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये मान्य केले आहे. तथापि सदर अपील दिनांक- १७-०३-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केले

असल्याची पोंचपावती अपिलार्थी यांच्याकडे आहे. त्यांनी ती सुनावणीच्या वेळेस आयोगास दाखविली.

जनअपिलीय अधिकारी याच्याकडून काहीही निर्णय प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०९-०५-२००६ रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीच्या अर्जातील मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपीलावर कोणताही निर्णय आजातागायत दिला नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती व त्यातील गुंतागूंत पहाता या अपिलाच्या प्रथम अपीलावर सुनावणी होणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०३-२००६ रोजी त्यांनी केलेला प्रथम अपीलअर्ज प्रथम पाठवावा व जनअपिलीय अधिकारी यांनी हे आदेश पारीत झाल्यापासून आठ दिवसाच्या आत त्याची सुनावणी घेवून आपला निर्णय अपिलार्थीस कळवावा. जनअपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपीलार्थी यांना मान्य नसेल तर ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील. प्रसंगावशात या प्रकरणामध्ये जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सजा सातारा तालूका जिल्हा औरंगाबाद यांनी त्यांची माहिती देण्याची भूमिका, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार वठविलेली नाही. महसूल खात्यातील या शेवटच्या क्षेत्रीयस्तरावरील कर्मचा-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात प्रशिक्षण देणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. करिता विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी याची नोंद घेवून त्यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल विभागाच्या क्षेत्रीय पातवळीवरील सर्वात शेवटच्या क्षेत्रीयस्तरावरील कर्मचा-या करिता

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत, असे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक- १७-०३-२००६ च्या प्रथम अपीलावर हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत सुनावणी घेवून आपला निर्णय द्यावा.

३. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल विभागाच्या क्षेत्रीय पातवळीवरील सर्वात शेवटच्या क्षेत्रीयस्तरावरील कर्मचा-याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक- २१-०७-२००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१२. श्री.सरदार हरजितसिंग तिरतसिंग सहानी, ५/१/५५, उस्मानपूरा, तारापान सेंटर जवळ, औरंगाबाद.

१३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी सजा सातारा, तालूका व जिल्हा- औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

१४. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, यांना योग्य त्या कारवाइस्तव देण्यात येते.

१५. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना योग्य त्या कारवाइस्तव देण्यात येते.

१६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

१७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४१४

निर्णय दिनांक २३-०७-२००७

श्री. म. फारुक बाबू तगाले, : अपीलार्थी

बाबा रमजान गल्ली, किनवट,

तालुका किनवट

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,

जिल्हा नांदेड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. म. फारुक तगाले, किनवट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड श्री. डुकरे दिगंबर खंडुजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड हे आज सुनावणीस गैरहजर आहेत त्यांच्या गैरहजेरीची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ०४-०३-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे किनवट मंडळातील साखरेच्या कोट्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> “ किनवट सर्कलमधील एप्रिल २००५ ते मार्च २००६ पर्यत साखरेचा किती कोठा उपलब्ध झाला, सर्व रास्त भाव दुकानांस प्रत्येकी किती कोठा देण्यात आला, शिल्लक किती आहे, कोणास किती देण्यात आला, दुकानदाराचे नांव, वजन, भाव यांची सविस्तर माहिती देणे.”

३. सदर माहिती अपीलार्थीने एप्रिल २००५ ते मार्च २००६ या कालावधीमधील व व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपीलार्थीने या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जोडले होते.

४. अपीलार्थी यांच्या अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही असे आज राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी सांगत आहेत.

५. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०४-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

६. अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही फक्त अपील अर्जावर फक्त ‘‘माहिती देणे’’ असा अभिप्राय लिहिला. जन अपीलीय अधिकारी यांच्या या अभिप्रायानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन ठेवली परंतु अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्यामुळे त्यांनी ती माहिती अपिलार्थीस पुरविली नाही असे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहे.

७. वरील प्रकारे अपीलार्थीस माहिती मिळण्यासंदर्भात कोणत्याही स्तरावर योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्येही त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

८. आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांनी त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ उप कलम ५ मधील तरतुदीनुसार, अपीलार्थी हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे, मोफत देण्यास हरकत नव्हती. तथापि त्यांनी तशी कोणतीही कृती न करता जन अपिलीय अधिकारी यांच्या अपीलार्थीच्या अपील अर्जावर ‘‘माहिती देणे’’ या अभिप्रायानुसार माहिती तयार करुन जन माहिती अधिकारी यांनी ती

तशीच विनाकारवाई ठेऊन दिली.  जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीस एक प्रकारे नकारात्मक प्रतिसाद दिल्याचे यातून स्पष्ट होते.  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ पोटकलम ५ पाहता त्यातील तरतुदी स्पष्ट आहेत.  अपीलार्थी हे दारिद्र्य रेषेखालचे असल्यामुळे त्यांना अधिनियमातील विहीत केलेल्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी मोफत माहिती देणे हे यासंदर्भात जन माहिती अधिका-यास क्रमप्राप्त होते.  त्याच बरोबर जर जन अपीलीय अधिकारी यांनी वेळीच अपीलार्थीच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेतली असती तर त्यांनाही अपीलार्थीस ही माहिती विहीत मुदतीत प्राप्त झाली नसल्याचे आढळून आले असते व ते अपिलार्थीस वेळेत माहिती देण्यासंदर्भात योग्य उपाययोजना करु शकले असते व याव्दारे अपीलार्थीस आवश्यक माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत मिळू शकली असती.  जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी या दोन्ही अधिका-यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ शी त्यांना काहीही देणेघेणे नसल्याचे त्यांनी आपल्या या कृतीतून स्पष्ट केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यशैलीतील या कर्तव्यपरायणतेच्या अभावाची यथायोग्य नोंद जिल्हाधिकारी नांदेड यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.  जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेजबाबदारपणाबाबत त्यांचेवर महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) नुसार पुढील प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने त्याच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत त्यांना स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

९.   वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी, अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी दर्शविलेल्या बेपर्वाई व कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन त्याचा अहवाल राज्य माहिती आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. म. फारुक बाबू तगाले, बाबा रमजान गल्ली, किनवट, तालुका किनवट जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/४४०/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २३-०७-२००७.

१. श्री. अरविंद दत्तात्रयराव सुलाखे .. अपिलार्थी.
३२, स्मती अपार्टमेंट,
बन्सीलालनगर, औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक संचालक, नगर रचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा ..
आयुक्त,
महानगरपालिका,औरंगाबाद.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-२३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.अरविंद दत्तात्रयराव सुलाखे, ( येथून पुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद, श्री.र.द.जोशी, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद ( येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

१. या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे इटखेडा तालूका औरंगाबाद येथील अंतर्गत विकासा बाबत प्रगती व बांधकाम परवानगी विषयी धोरण व नियमावलीची मागणी केली होती.

२. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहिती मध्ये – गटनंबर ६४ व इतर इटखेडा तालूका- औरंगाबाद या जमिनीच्या अंतर्गत विकास करणा-या विकासकाने मुदतवाढीचा अर्ज दिला होता काय, मूळ आराखडयात सुधारणा करण्याबाबत अधिनियम किंवा शासकीय आदेशात तरतुदी आहेत काय, मुदतीत विकास न झाल्याने विकासाकावर काय कार्यवाही केली. अंतिम ले-आऊट मंजूरी शिवाय विकासकाने भूखंड विक्री केले आहेत. या बाबत म.न.पा.चा खुलासा काय, विकासाकाने रस्याच्या स्वयं विकासा अंतर्गत देखरेख शुल्कापोटी ५ टक्के रक्कम म.न.पा.कडे केव्हा भरली व विकासाच्या कामाची काय प्रगती झाली. त्याचबरोबर या कामाची पहाणी केव्हा झाली व त्यात काय दोष आढळून आलेत काय, नागरीकांनी या विकासकाकडून या विकत घेतलेल्या भूखंडावर बांधकाम परवानगी देण्याबाबत महानगरपालिकेचे किंवा शासकीय धोरण व आदेश याची प्रत बांधकाम नियमाची प्रत, दिनांक- २३-०५-२००३ ची परवानगी त्या पत्रासोबत अटी या परवानगी पत्रकांवर ज्या अधिका-यांची सही आहे. त्याचे पूर्ण नाव,हुद्दा, व ते आजतागायत महानगरपालिकेत कार्यरत आहेत का, ले-आऊट मंजूरीचे अधिकार कोणाकडे आहे त्याचे नाव, हुद्दा व ते कोणत्या तारखेपासून महानगरपालिकेत कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या कारभारात पारदर्शकता व दिंरगाई टाळण्यासाठी स्वयं विकास या कामासाठी सर्व संबंधीताची बैठक कधी झाली का व एक दुस-

यांच्या अडचणी सोडण्यासाठी काही चर्चा झाली का किंवा अशी बैठक घेण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे काय, महानगरपालिकेच्या पाहणीनूसार अंतर्गत विकास ले-आऊट केंव्हा मंजूर होण्याची शक्यता आहे, अंतर्गत विकास जलदगतीने होण्यासाठी महानगरपालिकेची काय कार्यवाही अपेक्षित आहे किंवा काय कार्यवाही होणार आहे,- या मुद्यांचा समावेश होता.

३. अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे स्वरुप पहाता अपिलार्थीने ब-याच मुद्यांची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. त्याचबरोबर त्यांनी महानगरपालिकेचे अभिप्राय व पुढील धोरणा विषयीच्या संबंधात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केल्याचे दिसून येते.

४. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी विचारलेली माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ चे कलम २ (त्र) अन्वये देय होत नाही, असे त्यांचेकडील पत्र दिनांक- २८-०८-२००६ ने कळवून अपिलार्थीस त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे त्यांनी कळविले. जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयाची छाननी करण्याचे व त्यांना माहिती देण्याच्या सूचना देण्याचे व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती न पुरविल्याबद्दल माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार दंडनीय कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. या अपीलाची दिनांक ०३-१०-२००६ रोजी सुनावणी घेवून जनअपिलीय अधिकारी यांनी आपला आदेश दिनांक- ०६-१०-२००६ रोजी पारीत केला आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या या दिलेल्या आदेशात जनमाहिती अधिकारी यांनी या प्रश्नाच्या निगडीत सर्व संचिका अपिलार्थीस पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्याच्या व अपिलार्थी यांना सर्व संचिकेचे निरीक्षण

करण्याच्या सूचना दिल्या या अपीलपत्राच्या निकालामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना पुढे दिल्या आहेत.

५. तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक- ०३-११-२००६ नूसार अपिलार्थी यांनी संबंधीत रेखांकनाची मूळ संचिका पडताळणीसाठी व आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्यासाठी दिनांक- १०-११-२००६ रोजी कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी कळविले. जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याच्या विनंती पत्रावर अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे दिनांक- ०८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिका-यास त्यांनी मूळअर्जा मध्ये नस्तीच्या पहाणीची विनंती केली नसल्याने संचिका पहाणे व नकला घेणे हा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे कळविले व त्याचबरोबर या पत्रामध्ये त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या बांधकाम परवानगीच्या नियमाची प्रतीसाठी योग्यती फीस भरुन प्राप्त करुन देण्यासाठी जनमाहिती अधिका-यास कळविले. यामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपीलामध्ये संबंधीत दिलेला निर्णय त्यांना मान्य नसल्याचे त्यांनी जनमाहिती अधिका-यास कळविला आहे.

६. जनअपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथीत झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिका-यांनी माहिती नाकारण्याचे कृत्य दुष्टहेतूने केले असल्यामूळे त्यांच्यावर दंडनिय कार्यवाही करण्याची, महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदीच्या अमंलबजावणीच्या संदर्भात प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्या बाबत नगरविकास सचिवांना सूचना देणे विषयी उपरोक्त विनंती आयोगास केली आहे.

७. आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये ज्या भूखंड मालकाकडे एक एकरहून जास्त क्षेत्र आहे त्या भूखंडाचा सर्व विकास भूखंड मालकाने त्यांच्या खर्चाने करावयाची योजना औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सध्या अंमलात येत आहे. या क्षेत्राच्या रस्ता, वीज, ड्रेनेज, विद्युत व पाणी पुरवठा इ.पायाभूत विकास कामाच्या अंमलबजावणी पोटी विकासकाने निरीक्षण शुल्क महानगरपालिकेकडे भरवयाचे असते. ही विकास कामे करण्यापूर्वी या कामांचे संकल्पचित्र महानगरपालिके कडून विकासकाने मंजूर करुन घ्यावयाचे असते. या कामाचे दैनंदिन व्यवस्थापन व निरीक्षण या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अभिप्रेत नाही, असे जनअपिलीय अधिकारी यांना सुनावणीत स्पष्ट केले. सदर विकास कामे पूर्ण झाल्यानंतर विकासक महानगरपालिकेस त्याप्रमाणे कळवितो व तद्नंतर महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी या विकास कामांची तपासणी करुन ही कामे महानगरपालिकेच्या मान्य मापदंडा प्रमाणे झाली आहेत किंवा कसे याची तपासणी करतात व तदनंतर या सुविधाचा ताबा महानगरपालिकेकडे पुढील कायमस्वरुपी देखभाल व दुरुस्ती करिता घेण्यात येतो. या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विकासक या क्षेत्रातील भूखंडाची विक्री, अंतिम मंजूर लेआऊट प्रमाणे करु शकतात. स्वयं विकास योजनेचे थोडक्यात स्वरुप या प्रमाणे आहे.

८. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, मूळ जमिनीच्या मालकाने अंतिम लेआऊट मंजूर झाल्याशिवाय त्यातील भूखंडाची विक्री केली आहे व विकास कामे अद्यापही पूर्ण केली नाहीत. तेंव्हा या योजनेमध्ये निश्चीत नियम कोणते आहेत व बांधकामास परवानगी देण्याकरिता काय नियम आहेत, महानगरपालिका व विकासक यांच्यातील करार शर्तीचा विकासकाने भंग केला असल्यास महानगरपालिकाने कोणती कार्यवाही केली, याची माहिती अपिलार्थीस आवश्यक आहे.

९.  अपिलार्थीने केलेल्या माहितीची मागणी ज्या कलमाखाली जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नाकारली ते कलम माहिती नाकारण्याचे कारण होवू शकत नाही, हा अपिलार्थी यांचा युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहीलेल्या पत्रामध्ये २ (त्र) या कलमाचा उल्लेख केला आहे. याच कलमातील तरतूदीनूसार जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, त्यांनी काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात तर काही माहितीमध्ये महानगरपालिकेचे अभिप्राय व धोरण विचारले आहे. ते जनमाहिती अधिका-याने अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नाही, असे अपिलार्थी यांना सुनावणीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या नियमावलीची पुस्तिका व या विषया संदर्भातील उपलब्ध असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना देणे क्रमप्राप्त आहे, असे आयोगाचे मत आहे. याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, सार्वजनिक स्वरुपाची कामाची कोणतीही माहिती महानगरपालिकेच्या कामात पारदर्शकता असण्याच्या दृष्टीने, कोणत्याही नागरिकाने मागितल्यास विहित कालावधीमध्ये त्याला ती पुरविली जाईल याची दक्षता जनमाहिती अधिकारी यांनी घ्यावी.

दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतला असता, असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे सध्या प्रचलित असलेल्या बांधकाम परवानगी नियमावलीच्या व स्वयं विकास योजने संदर्भात सर्व शासकीय आदेश व नियमावलीची पुस्तिका, परिपत्रके इ. अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत या विनामुल्य पुरवावी.

१०.  जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्यामध्ये कोणत्याही प्रकारे असद्‌हेतु आढळला नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाहीचे आदेश नाहीत. तथापि त्यांनी

यापूढे अशा प्रकारची माहिती त्यांना कोणत्याही नागरीकाकडून विचारली गेल्यास कशा प्रकारे सकारात्मक प्रतिसाद देता येईल, असे पहावे आयोगातर्फे त्यांना सूचीत करण्यात येत आहे.

११. अपिलार्थी यांनी केलेल्या विनंती प्रमाणे महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्याकडील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत. असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे सध्या प्रचलित असलेल्या बांधकाम परवानगी नियमावलीच्या व स्वयंविकास योजने संदर्भात सर्व शासकीय आदेश व नियमावलीची पुस्तिका अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३. महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांच्याकडील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक- २३-०७-२००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१. श्री.अरविंद दत्तात्रयराव सुलाखे, ३२, स्मती अपार्टमेंट, बन्सीलाल नगर, औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २०२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २४-०७- २००७.

१. श्री.दैवान नारायण मुंडे, .. अपिलार्थी.
मु.पो.चौंडी, तालूका-धारुर,जि.बीड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी

उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे
(स्थानिकस्तर) उपविभाग धारुर
जिल्हा-बीड.

२.	जनअपिलीय अधिकारी तथा ..
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग,
बीड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.दैवान नारायण मुंडे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) श्री.एच.एन.साखरे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग बीड, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक- १८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये २००१ ते २००६ हया कालावधीतील गावतलाव व पाझर तलाव या संबंधात खालील प्रकारच्या माहितीची मागणी केली होती.

‘‘सर्व गावतलाव पाझर तलावांचा सोपा सेटवर स्थळ दर्शक नकाशा, सर्व तलावांची भीतीची लांबी किती, सांडव्याची लांबी,रुंदी, साठवण क्षमता किती, द.ल.घ.फु. एकुण माती कामाचे परिमण घट मिटरमध्ये सांगावे, तसेच तलावांची कॉटेन, टुटूल वेल ड्रेनची कामे केली आहेत काय. तलावांचे पाणलोट क्षेत्र किती चौरस मैल आहे. पा.त.

गा.त. चे काम रो.ह.यो. किंवा  रा.ग्रा. यो. मधून पूर्ण केले. एखाद्या तलावामध्ये मा.नाला वल्डींग, वनीकरण जमीन एखादे शासकीय बांधकाम होते काय असल्यास त्याची आपल्या आंदाजपत्रकामध्ये किती किंमत दाखवलेली आहे व संबंधीत विभागाची त्या साठी परवानगी घेतली होती काय. ”

अपिलार्थीने वरील माहिति व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १७-०५-२००६ रोजी एका पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे अपिलार्थीने मागितलेल्या एकूण ६ वर्षाच्यावरील ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये १४,५००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या सूचना अपिलार्थीस दिल्या. तथापि तदनंतर अद्यापही सदर शुल्क अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीसाठी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरता अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक- २३-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिन  २५०/- रुपयाची शास्ती लावण्याची मागणी केली.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक- २६-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे जनमाहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती देण्यापोटी आवश्यक असणारे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन घ्यावे व अपिलार्थीस ही माहिती द्यावी, असे कळविले व या३ पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस अग्रेषीत  केली. जनअपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. अपील सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व

जनमाहिती अधिकारी  हया दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून आपला अंतिम निर्णय लेखीस्वरुपात देणे  अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी तसे न करता जनमाहिती अधिका-यास अपिलार्थी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरुन माहिती देण्याचे सुचविले व या पत्राची एक प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्याकडून झालेल्या चुकीची नोंद घेवून भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात, असे त्यांना आयोगातर्फे सूचीत करण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १३-०७-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवून माहिती देण्यास विलंब झाल्यापोटी जनमाहिती अधिका-यास दिनांक- १८-०५-२००६ पासून प्रतिदिनी २५०/- रुपये इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पहाता, ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची असून कोणत्याही एका विशीष्ट कामांची माहिती अपिलार्थीने  मागितल्याचे दिसून येत नाही. तव्द्तच अपिलार्थीने ही माहिती एकूण पाच वर्षाची मागितली आहे तर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये त्यांनी ब-याच ठिकाणी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असल्याचे दिसून येते. सर्वसाधारण स्वरुपाची व  विस्तृत व्याप्ती असलेली माहिती देण्यापोटी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडे भरावे लागणारे शुल्क रुपये १४,५००/- हे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेल्या दिनांकापर्यंतही भरले नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले.

सदर माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे शपथपत्रा व्दारे सादर केले आहे. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितल्याने जनमाहिती अधिकारी यांनी वेळोवेळी दुरध्वनीव्दारे तोंडी संपर्क साधल्याचे देखील त्यांनी या शपथपत्रामध्ये नमूद केले आहे. तथापि अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत, असे त्यांनी पुढे सांगितले.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ उपकलम १ व ३ (a) नुसार अपिलार्थीने कोणतीही माहितीची मागणी केल्यास ही माहिती देण्यापोटी त्यांना आवश्यक ते शुल्क जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा कोषागारात भरणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर सामान्य प्रशासन विभागाच्या ११ ऑक्टोंबर २००५ च्या अधिसूचने नुसार ( क्रमांक- RPI-२००५/ CR-३१५/०५/५) सदर फी प्रतिपृष्ठ २/-रुपये इतकी विहित करण्यात आली आहे. अपिलार्थीने मुळात त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक तें शुल्क भरले नसल्यामूळे, अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात न भरल्यामूळे त्यांना ही माहिती प्राप्त झाली नाही ते या प्रकरणी सिध्द होत असल्याने व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली सर्वसाधारण स्वरुपाची व माहितीच्या व्याप्तीचे स्वरुप पहाता, अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या माहिती मागण्यामागे निश्चीत कोणती भूमीका होती, या बद्दल शंका घेण्यास भरपूर वाव आहे असे आयोगाचे मत आहे. त्याचबरोबर आजच्या सुनावणीस देखील अपिलार्थी हे गैरहजर राहिले. यावरुन त्यांना ही माहिती खरोखरच आवश्यक होती किंवा कसे, याचा आयोगास सभ्रम पडला आहे.

वरील विवेंचन पहाता, अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळणे हे जास्त संयुक्तीक होईल, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २४-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.दैवान नारायण मुंडे, मु.पो.चौडी, ता.धारुर, जिल्हा- बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) उपविभाग धारुर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग, बीड, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २०६/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक २४-०७- २००७.

१. महंमद एकबाल पि.मो.युसूफ .. अपिलार्थी.
मुदखेडकर, मुख्यसंपादक, साप्ताहिक

सत्यवृत, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड,
नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा)
तहसील कार्यालय, हदगांव
तालूका-हदगाव, जि.नांदेड.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
तहसीलदार, हदगांव,
जिल्हा-नांदेड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. महमद एकबाल पि.मो.युसूफ (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत त्यांच्यावतीने श्री.मोहंमद वसीम सौदागर हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, हदगांव (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव (येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे दोघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये हदगांव तालूक्यातील एकूण स्वस्त धान्य दुकानदाराच्या नावांची यादी तसेच त्यांना शासनाकडून दारिद्रयरेषेखाली व रोजगार हमी योजने अंतर्गत शासनाकडून दिल्या गेलेल्या गहू

व तांदूळाच्या वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रति मिळण्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास शपथपत्रान्वये निदर्शनास आणून दिले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन, दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारच्या मिळालेल्या प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- २७-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, आयोगापुढे आज जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. तर अपिलार्थीच्या वतीने त्यांचे प्राधिकारपत्र घेवून श्री.मोहंमद वसीम सौदागर, हे उपस्थित आहेत. अपिलार्थीने शपथपत्राव्दारे त्यांना आजतागायत त्यांना माहिती मिळाली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

अपिलार्थीचा प्रथम अर्ज व प्रथम अपीलअर्ज संबंधिताकडे पोंचला आहे किंवा कसे हे कळण्यास काही मार्ग नाही. हा अपील अर्ज प्राप्त झाल्या प्रित्यर्थ अपिलार्थी यांच्याकडे असलेल्या पोंचपावतीची-प्रत त्यावेळच्या पुरामध्ये नष्ट झाल्याचे अपिलार्थी यांनी आज शपथपत्राव्दारे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांचे या प्रकरणात काय म्हणणे आहे, हे सांगण्यासाठी हे दोघेही अधिकारी आज आयोगासमोर उपस्थित झाले नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीची सखेद नोंद आयोगाने घेतली असून जिल्हाधिकारी, नांदेड यांना असे सूचीत करण्यात येते की, या प्रकरणी या दोन्हीही अधिका-यांकडून स्पष्टीकरण मागवून घ्यावे व तद्नंतर जिल्हाधिका-यांना आवश्यक वाटल्यास, संबंधिताविरुध्द यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने यांच्या मूळअर्जात मागणी केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थी यांच्या मूळअर्जात मागणी केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद                                                **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २४-०७-२००७                                   **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ महंमद एकबाल पि.मो.युसूफ, मुदखेडकर,
मुख्यसंपादक, साप्ताहिक सत्यवृत, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, हदगांव, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगांव, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना आवश्यक त्या कारवाइस्तव.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९

निर्णय दिनांक   २४-०७-२००७

श्री. महादेव गेना नरोटे,                : अपिलार्थी
संपादक दै. जनमत, प्लॉट क्र. ए-२३,
एम. आय. डी. सी. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
सेंट्रल बिल्डिंग, लातूर जिल्हा लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी महादेव गेना नरोटे उस्मानाबाद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद जिल्हा उस्मानाबाद श्री. बी. टी. लावंड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, लातूर जिल्हा लातूर हे गैरहजर आहेत. त्यांच्या गैरहजेरीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ मार्च २००४ ते ३०-११-२००५ या कालावधीमधील सहकारी बॅकेत सेवानिवृत्त कर्मचा-यांना नेमणूक देण्यासंदर्भात एकूण १३ प्रश्नाव्दारे माहिती विचारली आहे. ती माहिती धर्मराज गोविंदराव पाटील यांना, तुळजाभवानी अर्बन को ऑपरेटिव्ह बॅक उस्मानाबाद यांनी विशेष वसूली अधिकारी या पदावर दिलेल्या नेमणुकीसंदर्भातील आहे.

३. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

४. अपीलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम दिनांक २७-१२-२००५ रोजी प्रथम उत्तर दिले. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

५. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचेकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीचे अपील अर्जान्वये प्रथम अपील केले. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील सर्व १३ मुद्दयांवर माहिती मागविली आहे व त्याच बरोबर सदर माहिती दिशाभूल करणारी असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या या अपीलावर दिनांक २१-०२-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी अपील आदेश पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशान्वये अपीलार्थी यांचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अर्जातील मुद्यांची समर्पक व वस्तुनिष्ठ माहिती आठ दिवसाच्या आत देण्याचे आदेशीत केले आहे.

६. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊन देखील अपीलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २०-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीला मध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिका-याने त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णय होऊनही त्यांना माहिती मिळाली नसल्याने ते हे व्दितीय अपील करत आहेत असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

७. आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता अपीलार्थीने सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे. जन माहिती अधिका-याने त्यांच्या

दिनांक २७-१२-२००५ च्या पत्रामध्ये या प्रश्नांना सरळपणे उत्तरे न देता मोघम स्वरुपाची उत्तरे दिल्याचे आढळून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्येही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निकालपत्रात ही बाब मान्य करुन जन माहिती अधिका-यास अर्जातील मुद्यांची समर्पक व वस्तुनिष्ठ माहिती अपिलार्थीस आठ दिवसात देण्याचे सुचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक २१-०२-२००६ रोजी आदेश पारीत होऊनही अपीलार्थीस व्दितीय अपील करण्याची पाळी का आली हे विचारले असता अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे अपिलार्थीने सांगितले व यास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सहमती दर्शविली आहे. अपीलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे आठ दिवसात माहिती न देण्याची कारणे विचारली असता अपीलार्थीने विचारलेली माहिती संबंधीत बॅकेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपीलार्थीस देण्याकरिता संकलीत केली गेली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे पडले. त्यांनी अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती आता दिनांक २३-०७-२००७ रोजी (या सुनावणीच्या आदल्या दिवशी) रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असल्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले व सदर माहिती आयोगासमोर सादर केली. या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती सकृतदर्शनी सर्वसाधारणतः समर्पक असल्याचे दिसून येते.

८. आता जरी अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली असली तरी ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत कालावधीपेक्षा जास्त विलंबाने दिली आहे हे सहजपणे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये माहिती विहीत मुदतीत देणे हा या कायद्याचा मूळ गाभा असून या मूळ उद्दीष्टालाच जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे विलंबाने माहिती देण्याच्या त्यांच्या कृतीमुळे छेद दिला आहे. सदर माहिती त्यांनी बॅकेकडून वेळोवेळी पत्रव्यवहार करुन प्राप्त करुन घेतली असे त्यांचे म्हणणे जरी खरे

असले तरी त्यांनी ही माहिती वेळोवेळी गोळा करण्यासाठी थोडे अधिक परिश्रम घेतले असते तर त्यांना यापुर्वीच माहिती अपीलार्थीस देता येणे शक्य झाले असते. त्यांनी या प्रकरणी माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे व भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळून येथून पुढे सामान्य नागरिकांच्या माहिती अधिकार अधिनियमाखाली प्राप्त झालेल्या अर्जांना वेळेत सकारात्मक प्रतिसाद देण्याचे त्यांना सुचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या या ताकीदीची नोंद सहकार आयुक्त, सहकारी संस्था, यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर व अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे याची यथायोग्य नोंद सहकार आयुक्त, सहकारी संस्था, यांनी घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महादेव गेना नरोटे, संपादक दै. जनमत, प्लॉट क्र. ए-२३, एम. आय. डी. सी. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद

जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, सेंट्रल बिल्डिंग, लातूर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी. जे. रोड, पुणे – ४११ ००१

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३००

निर्णय दिनांक २४-०७-२००७

डॉ. सौ. उल्का रघुवीर भोसले, : अपिलार्थी

तिरुमला, खडकपुरा, अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा वैद्यकीय अधीक्षक,

उप जिल्हा रुग्णालय, परळी (वै.)

जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा शल्य चिकित्सक,

जिल्हा रुग्णालय, बीड

जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी डॉ. सौ. उल्का रघुवीर भोसले, अंबाजोगाई या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उप जिल्हा रुग्णालय, परळी (वै.) जिल्हा बीड श्री. अशोक गणपतराव गंगू (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड जिल्हा बीड श्री. बी. डी. पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे निलंबीत भत्ता अदा करण्याविषयी खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "शासकीय सुचनेनुसार निर्वाह भत्ता अदा करणेबाबत मुख्यालयात राहत असलेबाबत प्रमाणपत्राची आवश्यकता नसतांना आपण राजकीय व प्रशासकीय दबावाखाली निलंबीत अधिकारी श्री. आर. व्ही. भोसले यांचा निर्वाह भत्ता अदा करीत नाहीत. शासकीय सुचने नुसार आपण निर्वाह भत्ता केव्हा अदा करणार ?"

३. अपीलार्थीने सदर माहिती डिसेंबर २००५ या कालावधीतील मागितली असून ती त्यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

४.	अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०३-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीस जून २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीतील भत्ता श्री. भोसले यांना अदा केला असल्याचे अपीलार्थीच्या निदर्शनास आणले. तदनंतर डिसेंबर २००५ च्या निर्वाह भत्त्यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना सदर भत्ता श्री. भोसले हे मुख्यालयात हजर असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोवर परळी येथील त्यांच्या वरिष्ठांना सादर करत नाहीत तोवर त्यांना डिसेंबर २००५ पासून पुढे उदरनिर्वाह भत्ता अदा करु नये असे लिहिल्यावरुन सदरचा भत्ता श्री. भोसले यांना अदा करण्यात आला नसल्याचे कळविले.

५.	जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०१-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. या अपीलामध्ये कोणत्याही कर्मचा-यास उदरनिर्वाह भत्ता देत असतांना मुख्यालयात राहत असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता नसतांना केवळ राजकीय व प्रशासकीय दबावाखाली श्री. भोसले यांना निर्वाह भत्ता अदा करण्यात येत नसल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणले आहे. त्याबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचेही पुढे म्हटले आहे.

६.	अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अपीलाचे अवलोकन करता अपीलार्थी यांनी या अपीलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०३-२००६ रोजी सुनावणी घेतली व श्री. आर. व्ही. भोसले वैद्यकीय अधीक्षक, उप जिल्हा रुग्णालय, परळी (वै.) जिल्हा बीड यांच्या निर्वाह भत्ता संबंधी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे) नियम १९८१ च्या कलम

६८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यास जन माहिती अधिकारी यांना सुचित केले व अपीलार्थीचे अपील निकाली काढले.

७. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार दिनांक ०९-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

८. आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभुमी समजावून घेतली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की श्री. भोसले परळी येथील उप जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत असतांना त्यांना ते त्यापूर्वी मनमाड येथे कार्यरत असतांना त्यांच्या हातून घडलेल्या प्रमादाबद्दल दिनांक ०६-०५-२००४ रोजी निलंबीत करण्यात आले. त्यांना निलंबन कालावधीतील उदरनिर्वाह भत्ता अदा करण्याबाबतचे हे प्रकरण आहे. त्यांच्या निलंबनाच्या कालावधीमध्ये त्यांना डिसेंबर २००५ चा निर्वाह भत्ता काही प्रशासकीय कारणास्तव देण्यात आला नव्हता तथापि तो आता त्यांना देण्यात आलेला आहे त्यामुळे अपीलार्थीचा मूळ प्रश्न निकालात निघाला आहे.

९. अपीलार्थी यांच्या गा-ह्याण्याचे जरी निराकरण झाले असले तरी अपीलार्थी यांची मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) नुसार माहितीचा विषय होत नाही कारण अपीलार्थीने दिलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास डॉक्टर भोसले यांना उदरनिर्वाह भत्ता केव्हा अदा करणार असा प्रश्न विचारला आहे. निर्वाह भत्ता अदा करण्याची कारवाई त्या वेळेस भविष्यामध्ये होणार असल्याने त्यासंबंधीची काही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नसणे स्वाभाविक आहे. त्यामुळे अपीलार्थीच्या या अर्जावर अपीलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिका-याने देणे अभिप्रेत नाही तथापि एवढे असूनही आज रोजी आयोगासमोर

सादर केलेल्या कागदपत्रावरुन संबंधित जन माहिती अधिकारी व आरोग्य विभागातील इतर अधिका-यांनी आपली भुमिका अपिलार्थीस त्वरित उत्तराव्दारे वेळोवेळी स्पष्ट केल्याचे दिसून येते.

वरील पार्श्वभुमीवर अपीलार्थीने जन माहिती अधिका-याकडे मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे अपीलार्थी चे हे अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ डॉ. सौ. उल्का रघुवीर भोसले, तिरुमला, खडकपुरा, अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उप जिल्हा रुग्णालय, परळी (वै.) जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०७

निर्णय दिनांक   २४-०७-२००७

श्रीमती प. गं. कोदरकर, स्वातंत्र्य सैनिक, : अपिलार्थी
व्दारा श्री. अकोलकर,
३३ (अ), ‘रेणुका’ छत्रपतीनगर, गारखेडा
परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विभागीय वन अधिकारी (नि. व मु.)
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर औरंगाबाद या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नि. व मु.) औरंगाबाद श्री. पी. जी. राहूलकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद श्री. सर्वेशकुमार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

२.	या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ०९-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> “स्वतंत्र्य सैनिकांच्या अवलंबीतासाठी शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. त्यापैकी एक परिपत्रक दिनांक ०४-०३-९१ चे असून ते शासनाच्या साप्रवि चे पत्र क्रमांक संकीर्ण २००५/७४६/प्र.क्र. १५५/०५ स्वा.सै.-१, दिनांक ०६-१२-२००५ व्दारे मला प्राप्त झाले असता त्याची प्रत माझे पत्र क्रमांक ७५८ दिनांक १९-१२-२००५ अन्वये आपले कार्यालयात पुरविली आहे तथापि माझा पाल्य चि. ग. दे. अकोलकर यांनी दिनांक ०८-०६-२००५ रोजी आपल्या कार्यालयास लेखापाल पदा करिता अर्ज दिला तसेच आपली दैनिक “सकाळ” औरंगाबादच्या दिनांक २८-११-२००५ मधील लेखापाल पदासाठी आपल्या कार्यालयाने मागविलेल्या अर्जासंदर्भात परत विहीत नमुन्यात दिनांक ०७-१२-२००५ चे पत्र क्रमांक ७४२ व्दारे रजिस्टर्ड ए. डी. ने अर्ज पाठविला आहे तरी माझ्या पाल्याचा हा अर्ज शासनाच्या साप्रविचे या बाबतचे परिपत्रक दिनांक ०४-०३-९१ मधील कुठली तरतूद पूर्ण करु शकला नाही / तो कसा अपूर्ण आहे याबाबतची माहिती प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यास्तव आवश्यक आहे.”

३.	अपीलार्थीने ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

४.	अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १४-०३-२००६ रोजी उत्तर दिले. त्या उत्तरामध्ये त्यांनी अपीलार्थी यांनी यांच्याकडे केलेल्या अर्ज विहित नमुन्यात नसल्याचे अपीलार्थीच्या निदर्शनास आणून दिले व त्यांना लेखापाल या पदासाठी भरती करतांना कोणते निकष वापरले गेले याची माहिती दिली. अपीलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये जरी ०९-०२-२००६ अशी तारीख टाकलेली असली तरी सदर अर्ज जन

माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणी मध्ये सांगितले.

५. जन माहिती अधिकारी यांचे उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपीलीय अधिकारी यांना दिनांक २४-०३-२००६ रोजी प्राप्त झाले. सदर अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही तथापि त्यांनी या संदर्भात अपीलार्थी यांना त्यांचेकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या पत्राने या प्रकरणातील वस्तुस्थिती कळवून अपील निकाली काढले. जन अपीलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. त्यांनी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांना दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून या प्रकरणी आपला अंतीम निर्णय अपील सुनावणीमध्ये देणे अपेक्षित आहे. येथून पुढे भविष्यात अपील सुनावणीच्या संदर्भात निर्णय घेतांना त्यांना, अपीलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचीही बाजू ऐकून घेऊन तदनंतर आपला निर्णय लेखी आदेशाव्दारे तत्काळ कळविण्याची सूचना आयोगातर्फे देण्यात आली.

६. जन अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलामध्ये त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने दिनांक ०४-०३-९१ चे परिपत्रकाव्दारे देऊ केलेल्या सवलती अपिलीय अधिका-यांनी नाकारल्याचे म्हटले आहे.

७. आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभुमी उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून समजावून घेतली असता असे आढळून आले की,

अपीलार्थीचे पाल्य हे स्वातंत्र्य सैनिकाचे अवलंबीत या प्रवर्गात मोडतात व त्यांनी वन विभागाच्या लेखापाल या पदासाठी अर्ज केला होता. अपीलार्थीच्या पाल्याने अर्ज केलेल्या लेखापाल या पदाच्या फक्त दोन जागा रिक्त होत्या त्यापैकी एक महिलासाठी राखीव होती व एक पद खुले होते. अपीलार्थी हे खुल्या प्रवर्गात मोडतात. वन विभागाने या एका पदाच्या भरतीसाठी १० उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले होते. खुल्या प्रवर्गातील लेखापाल पदासाठी उमेदवारांस बोलाविलेल्या शेवटच्या उमेदवाराची शैक्षणिक टक्केवारी ८१-५७ इतकी होती तर अपीलार्थीच्या पाल्याची टक्केवारी ४२-०५ इतकी होती त्यामुळे अपीलार्थीच्या पाल्याला मुलाखतीस बोलाविता आले नाही असे त्यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे कडील अनुक्रमे १४-०३-२००६ व ०२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले.

८. दिनांक ०४-०३-९१ चे साप्रविच्या आदेशाचे अवलोकन करता त्यामध्ये परिच्छेद १ मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना नोकरी विषयक असलेल्या सवलती या परिच्छेदामध्ये उप कलम (ब) अन्वये, वर्ग-३ व वर्ग-४ पदाला नेमणुकीसाठी जर स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य अन्यथा पात्र असतील तर नियुक्ती अधिका-याने त्यांना संपकालीन कर्मचा-याच्या वर पसंतीक्रमाने नेमणूक द्यावयाची आहे असे म्हटले आहे.

९. वरील परिच्छेदाचे अवलोकन केले असता वन विभागाच्या अधिका-यांनी अपीलार्थीस कळविलेल्या पत्रामध्ये त्यांनी घेतलेली भुमिका बरोबर आहे असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी मुळात अपिलार्थीचे पाल्य अन्यथा पात्र नसल्याने त्यांना या पदी नेमणूक देण्याचा प्रश्नच मूळात उद्‌भवत नाही ह्या वन खात्याच्या संबंधीत अधिका-याने घेतलेल्या भूमिकेशी आयोग सहमत आहे. या भूमिकेचे समर्थन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिका-यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविलेल्या पत्रामध्ये केले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर व अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असल्याने अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती प. गं. कोदरकर, स्वातंत्र्य सैनिक, व्दारा श्री. अकोलकर, ३३ (अ), 'रेणुका' छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नि. व मु.) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २०३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २५-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.काझी रऊफोद्दीन पि.काझी हिसामोद्दीन,<br>ग्रामसेवक कॉलनी नगर रोड, जिल्हा-बीड | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी, बीड जिल्हा-बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य<br>वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद. | .. | |

## <u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.काझी रऊफोद्दीन पि. काझी हिसामोद्दीन, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी,बीड, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद, (येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

आजच्या सुनावणीत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद हे उपस्थित राहिले नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. वक्फ मंडळातील जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगातर्फे सुनावणीसाठी हजर राहण्याबद्दल ज्या-ज्यावेळी कळविले जाईल त्या-त्यावेळी जनमाहती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी हजर राहणे अनिवार्य

आहे. अशा सूचना सचिव (सा.प्र.वि.) यांनी लेखीस्वरुपात त्यांना द्याव्यात व ते सुनावणीस गैरहजर राहिल्याबद्दल त्यांच्यावर, आवश्यक असल्यास, यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. असे सचिव (सा.प्र.वि.) यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १२-०४-२००६ रोजी हजरत बालेपीर मस्जीद कमिटी बीड यांच्या कार्यप्रणाली संदर्भात एकूण ७ मुद्यावर माहिती विचारली आहे.

या मुद्यामध्ये- सदर कमिटी ही दिनांक- १९-११-२००२ ला बरखास्त होवूनहि आजपर्यंत कोणत्या आदेशा प्रमाणे कायम ठेवली आहे याचा खुलासा, कमिटी राहिलेली नाही असे पत्रक जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून का देण्यांत आले नाही याचा खुलासा, सन २००२ ते २००६ पर्यंत सदर कमिटी कोणत्या नियमाप्रमाणे रक्कम जमा करीत आहे. सदर कमिटीस वर्गणी जमा न करण्याचे आदेश का देण्यात आले नाही, अपिलार्थीने पाठविलेल्या दिनांक- २०-०३-२००६ रोजीच्या पत्रावर संबंधितावर काय करवाइ झाली याचा खुलासा व दुरुस्त पंचनाम्याची नक्कल, वक्फ ऑफीसरचे पत्र क्रमांक-१२८, दिनांक - २२-०३-२००६ ची मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ औरंगाबाद यांना पाठविलेल्या पत्राची प्रत, पत्रक क्रमांक १४५५, दिनांक-२५-०९-२००३ वर दिलेल्या अटीचे पालन बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्यावर अंमल करण्यात आला किंवा नाही याचा खुलासा व कमिटीने एकूण छापलेल्या १० पावतीबूका पैकी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती पावतीबूक जमा करण्यात आले व किती कोरे आहेत. त्या को-या पावती बुकावर आपल्या ऑफीसमधून शेरा मारुन कायम केले आहे का? व कमिटीला मान्यता मिळाली नाही व नुतनीकरण झाले नाही. तरी पावतीबुकावर रक्कम जमा केली जाते त्याबाबत आपण कमिटीस वर्गणी जमा न करण्याचे आदेश देण्यात आले किंवा नाही याचा खुलासा,- या मुद्यांचा समावेश होतो.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती व माहितीचा संबंधित कालावधी अपिलार्थीने पाच दिवस असा दर्शविला आहे. तथापि तो अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीशी कोणत्याही प्रकारे संबंधीत नसल्याने हा मुद्दा विचारात घेण्यात येत नाही.

अपिलार्थी यांच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १३-०४-२००६ रोजी उत्तर दिले. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक- ११-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, व जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिन २५०/- रुपये प्रमाणे शास्ती लावण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी या अपीलअर्जावर दिनांक- ०९-०६-२००६ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या दिवशी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणताही निर्णय दिला नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथीत होवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १८-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेवून अपील निकाली काढले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून देवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी एकूण सात मुद्यावर जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, मुळअर्जातील मुद्दा क्रमांक-५ ज्यामध्ये फक्त वक्फ बोर्डाचे पत्र क्रमांक- १५८, दिनांक- १८-०३-२००६ चे मुख्य कार्यकारी अधिकरी, वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना पाठविलेल्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती ते, वगळता. उर्वरीत सहा मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपात व जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा विचारणारे असे आहेत. एवढे असूनही जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक- १३-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सर्व माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट करण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहे.

> (च) ''माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधार सामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

त्याचबरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम २ (त्र) मध्ये माहितीचा अधिकार याची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे, ती खालील प्रमाणे –

(त्र) "माहितीचा अधिकार" याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये,-

(एक) एखादे काम, दस्तऐवजी, अभिलेख यांची पाहणी करणे;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;

(चार) डिस्केट, फ्लॉटपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रानिक प्रकारातील माहिती किंवा जेंव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिन्टआऊट) मार्फत माहिती मिळविणे' याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो ;

वरील कलम २ ( च ) व २ ( त्र ) मध्ये माहिती व माहिती अधिकार याची व्याप्ती पुरेशी स्पष्ट करण्यात आली आहे. अपिलार्थीने मुळात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती या कोणत्याही प्रकारात मोडत नाही. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे खुलासा मागणीचा अधिकार माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपिलार्थीस दिला गेला नाही. अपिलार्थी यांच्या मूळअर्जातील मुद्दा क्रमांक-५ अन्वये मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी लागलीच पुरविली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून अपिलार्थीचे अपील फेटाळणेच योग्य राहील, असे आयोगाचे मत झाले आहे.

अपिलार्थीने मागितलेली कथीत माहिती व माहितीचा अधिकार या व्याख्यात मोडत नसल्याने अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- २५-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.काझी रऊफोद्यीन पि.काझी हिसामोद्यीन, ग्रामसेवक कॉलनी नगर रोड,बीड, जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, (सा.प्र.वि.) मंत्रालय, मुंबई- ३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४१

निर्णय दिनांक २५-०७-२००७

श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपिलार्थी

संपादक, साप्तहिक, सत्यम् शिवम् सुंदरम्,

बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,

गंगाखेड तालुका गंगाखेड जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,

परभणी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वामन रंगनाथराव मोरे परभणी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गंगाखेड तालुका गंगाखेड जिल्हा परभणी श्री. ए. आर. गीरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, परभणी श्री. आर. पी. सुरवसे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०४-२००६ च्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ७ मुद्यावर माहिती मागविली होती. अपीलार्थीने जन माहिती अधिका-याकडे या ७ मुद्यावर प्रश्नार्थक स्वरुपात माहितीची विचारणा केली होती. विचारलेल्या माहितीमध्ये - कर्ज वसुली, विविध कार्यकारी सेवा

सहकारी संस्थेने नेमलेल्या वसूली अधिकारी यांच्या नेमणुकी व त्यांना दिलेल्या अधिकारा संदर्भात व एक सहकार अधिकारी श्रेणी-२ यांच्याविरुध्द अपीलार्थी त्यांनी पूर्वी केलेल्या तक्रारी अर्जाबाबत केलेल्या कारवाईच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपीलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत डाकेने अपेक्षिली असून माहितीचा कालावधी २९-०६-२००५ ते आजचा अर्ज दिलेल्या तारखेपर्यत असा दर्शविलेला आहे.

अपीलार्थीने केलेल्या या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रथम माहिती दिली तथापि सदर पत्र अपीलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपीलार्थीचे म्हणणे असल्याचे, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे दिनांक २२-०६-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपीलावरुन दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपीलार्थी यांनी त्यांना अपील करण्याचे कारण, अपिल करेपर्यत यांना सदर माहिती मिळाली नसल्याचे अपील अर्जात नमूद केले आहे. अपीलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०३-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक ०४-०७-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला. या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वेळेत माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन अपीलार्थीचे अपील फेटाळले व या सुनावणी आदेशाबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम पुरविलेल्या माहितीच्या प्रती (चौकशी अहवालासह) अपीलार्थीस परत एकदा दिल्या असल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार दिनांक १७-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने माहिती पाठविली आहे हे धांदात खोटे असल्याचे म्हटले आहे

व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली आहे या विधानावर विश्वास कसा ठेवला, विश्वास ठेवतांना जन माहिती अधिकारी यांनी कोणते मुद्दे गृहीत धरले ही अपील करण्याची कारणे दर्शविली आहेत. राज्य माहिती आयोगा कडे केलेला व्दितीय अपील अर्ज पाहता अपीलार्थीस नेमकी कोणती माहिती अद्यापही हवी आहे याचा अर्थबोध होत नाही.

आज झालेल्या युक्तीवादात अपीलार्थी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने केलेल्या दिनांक ०१-०४-२००६ च्या अर्जावर अपीलार्थीस दिनांक १२-०४-२००६ रोजी दिलेल्या माहितीची प्रत आयोगास सादर केली. सदर माहितीचे अवलोकन करता अपीलार्थीने जरी प्रश्नात्मक स्वरुपात माहिती विचारली असली तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस योग्य तो खुलासा करुन माहिती पुरविली आहे असे दिसून येते. अपीलार्थीने मुळात ज्या प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे अशा प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे देणे जरी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अभिप्रेत नसले तरी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती मिळावी ह्या उद्देशाने त्यांनी अपीलार्थीच्या सर्व प्रश्नार्थक स्वरुपाची योग्य ती उत्तरे दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी गैरहजर राहिले व जन अपिलीय अधिकारी यांनीही अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२-०४-२००६ च्या पत्राची प्रत त्यांच्या अपील निर्णयासोबत दिली आहे हे पाहता व अपीलार्थीची आज आयोगासमोर असलेली अनुपस्थिती पाहता अपीलार्थीस ही माहिती मिळाली असल्याने त्यांना आता या प्रकरणी पुरेसे स्वारस्य नसावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या निर्णयात आता बदल करण्याचे कोणतेही कारण, आयोगास अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन

अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपीलार्थीस माहिती दिल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील आवक जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती आयोगास सादर केल्या. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचे पत्र क्रमांक ३८० दिनांक १२-०४-२००६ रोजी अपिलार्थीस पाठविल्याचे सिध्द होते त्यामुळे अपीलार्थीस माहिती मिळाली हे सिध्द होते त्याचबरोबर सदर पत्रातील मजकुराचे अवलोकन करता अपीलार्थीस आवश्यक ती माहिती योग्य व समर्पक स्वरुपात मिळाल्याचे सिध्द होत आहे. या पार्श्वभुमीवर अपीलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २५ जुलै २००७

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे, संपादक, साप्तहिक, सत्यम् शिवम् सुंदरम्, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गंगाखेड तालुका गंगाखेड जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०५

निर्णय दिनांक २५-०७-२००७

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपिलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
उपविभागीय कार्यालय, तेलगाव
तालुका वडवणी जिल्हा बीड

२ कनिष्ठ अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
वडवणी, तालुका वडवणी
जिल्हा बीड

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
विभागीय कार्यालय, अंबाजोगाई
तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी प्रेमचंद गुलाबचंद नहार, बीड हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभागीय कार्यालय, तेलगाव, तालुका वडवणी जिल्हा बीड श्री. किशोर यादवराव देशपांडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड हे गैरहजर आहेत. त्यांच्या गैरहजेरीची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी, सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये कनिष्ठ अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कार्यालय वडवणी यांच्याकडे शेतकरी सहकारी तेलबिया प्रक्रिया संस्था म. वडगाव या संस्थेच्या संदर्भात सन १९९८ ते ०४-१२-२००६ पर्यत खालील ७ मुद्यांची माहिती मागितली होती :

१. “ या संस्थेला प्रथम विद्युत पुरवठा कधी दिला, याची माहिती संस्थेने विद्युत पुरवठ्याची मागणी केलेल्या अर्ज व ठरावाच्या प्रतीसह द्यावी.

२. विद्युत पुरवठ्याबाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या पाहणी अहवालाची प्रत द्यावी.

३. या संस्थेस प्रथमतः दिलेले विद्युत कनेक्शन आज चालू आहे किंवा कसे या बद्दलची माहिती द्यावी. जर आपणामार्फत सदरील संस्थेचा विद्युत पुरवठा खंडीत करुन पुन्हा वीज पुरवठा दिलेला असेल तर वीज पुरवठा मागणीसाठी पुन्हा

केलेल्या अर्जाची आपल्या कार्यालयाच्या टिपणीसह व पाहणी अहवालासह प्रत द्यावी.

४. संस्थेस प्रत्येक वर्षासाठी किती रुपयांचा वीज पुरवठा केला व संस्थेने प्रत्येक वर्षी किती वीज बील भरले याची माहिती द्यावी. हे वीज बील कोणकोणत्या तारखेला भरले याची माहिती वर्षनिहाय द्यावी.

५. संस्थेकडे आज रोजी किती थकबाकी आहे व ती वसूल करण्यासाठी आपण काय कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीच्या आदेशाच्या प्रती द्याव्यात. म्हणजेच वसूलीसाठी प्रथम पासून आजपर्यत बिलाव्यतिरिक्त कोणकोणता पत्रव्यवहार केला त्याच्या प्रती द्याव्यात.

६. विद्युत पुरवठा खंडीत करुन तो त्याच जागी पुन्हा नव्याने अर्ज घेवून जोडून दिलेला असेल तर असे करताना घेतलेले नाहरकत प्रमाणपत्र, पाहणी अहवाल व सदरील संचिकेवरील आपल्या कार्यालयाची टिपणी इत्यादीची प्रत द्यावी.

७. थकबाकी असताना वरील प्रमाणे विद्युत पुरवठा जर जोडून पुन्हा नव्याने बील पुरवठा असेल तर त्यासाठी कोणते नियम/शासनादेश आहेत, त्याची प्रत द्यावी.”

सदर माहिती अपीलार्थीने शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर कनिष्ठ अभियंता यांनी ते माहिती अधिकारी नसल्याने त्यांच्याकडील पत्र दिनांक ११-१२-२००६ अन्वये अपीलार्थीचा अर्ज त्यांनी परत करुन त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचा तपशील पुरविला. तदनंतर अपीलार्थीने संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००६ रोजी याच ७ मुद्यावर माहिती मिळण्यासाठी अर्ज केला. अपीलार्थीच्या या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २०-०१-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी

पुरविलेल्या  माहितीवरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिल्याचे आढळून येते.  त्याच बरोबर जी कागदपत्रे उपलब्ध नाहीत त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थीस देता येत नाही असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीवर अपीलार्थीचे समाधान न झाल्याने अपीलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले.  या अपील अर्जाची पाहणी करता असे आढळून येते की, या अपील अर्जावर अपीलार्थीने दिनांक १८-१२-२००६ अशी तारीख प्रथमतः टंकलिखित केली होती तदनंतर ही तारीख खोडून स्वहस्ते दिनांक ०३-०१-२००७ अशी तारीख लिहिलेली दिसून येते.  या खाडाखोडी प्रित्यर्थ कोणाचीही स्वाक्षरी नसल्याने ही खाडाखोड नेमकी कोणी केली हे कळण्यास मार्ग नाही.  याचा अर्थ अपीलार्थीस प्रथम माहिती मिळण्यापुर्वीच अपीलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्याची तयारी केली होती हे सिध्द होते.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळण्यापुर्वीच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे करावयाचे अपील तयार करुन ठेवणे ही अपीलार्थीची कृती अपीलार्थी च्या विश्वासर्हतेला छेद देणारी आहे यात शंका नाही.  अपीलार्थीच्या सदर सुनावणी अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २५-०१-२००७ रोजी आपला निर्णय पारीत केला.  सदर निर्णया मध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे त्यांच्याकडे केलेले अपील फेटाळून लावले.  या सुनावणीचे वेळेस स्वतः अपीलार्थी किंवा अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचे प्रतिनिधी कोणीही हजर नव्हते हा मुद्दा या विवेचनामध्ये नोंद घेण्याजोगा आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिल फेटाळण्याच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(३) अन्वये दिनांक १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपीलार्थीने जन माहिती अधिका-यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची व जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस माहिती विनामूल्य देण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी हे गैरहजर आहेत. अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली सर्व सातही मुद्यावरील उपलब्ध माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा मुद्दा क्रमांक १, अंशतः मुद्दा क्रमांक २, मुद्दा क्रमांक ४ व अंशतः मुद्दा क्रमांक ५ मध्ये अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना मिळाली आहे. या माहितीमध्ये ज्या मुद्दयावर अंशतः माहिती पुरविली गेली आहे, त्या मुद्यावरील उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नसल्याने, त्यांनी ती दिली नाही असे त्यांचे म्हणणे त्यांनी शपथपत्रावर सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांच्याकडे असलेल्या माहितीची उपलब्धतता पाहता, अपीलार्थीस त्यांनी दिलेली माहिती आयोगास योग्य वाटते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात मुद्दाम टाळाटाळ केल्याचे निदर्शनास येत नाही. अपीलार्थीने या अर्जामध्ये संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी त्यांच्या अर्जाचा विचार न करता तो तसाच अपीलार्थीस परत पाठविला असे अर्थाचे विधान केले आहे. अपीलार्थीच्या मते सदर कनिष्ठ अभियंता यांनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ५ दिवसाच्या आत संबंधित सहाय्यक अभियंता, जे या प्रकरणात माहिती अधिकारी आहेत, त्यांच्याकडे पाठवावयास हवा होता तथापि त्यांनी तसे न करता केवळ दिरंगाई करण्याकरिता तो अपिलार्थीस परत पाठवला व कनिष्ठ अभियंता यांनी ही दिरंगाई केवळ माहिती न देण्याकरिता केली होती असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. कनिष्ठ अभियंत्याने संबंधित जन माहिती अधिकारीकडे ५ दिवसाच्या आत हा अर्ज

पाठवावयाचा होता हे अपीलार्थीचे म्हणणे जरी खरे असले तरी त्यांनी ही कृती जाणुनबुजून आणि माहिती न देण्याच्या उद्देशाने केल्याचे आयोगास आढळून येत नाही, कारण कनिष्ठ अभियंता यांनी अपीलार्थीचा यांचा मूळ अर्ज परत करतांना अपीलार्थीने कोणत्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज करावा याचे पुरेसे मार्गदर्शन या त्यांच्या पत्रात केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दयावरील, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपीलार्थीस पुरविली आहे, ती माहिती पुरविण्यामध्ये जर काही माहिती द्यावयाची राहून गेली असेल तर ती आता त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ते देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. माहिती जुनी असल्यामुळे, रेकॉर्ड नष्ट झाल्यामुळे ते माहिती देऊ शकत नाहीत असेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कंपनीच्या कामाचे संगणकीकरण अलीकडच्या काळात झाले असल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही, व माहिती उपलब्ध नसल्यामुळे काही माहिती अपीलार्थीस ते देऊ शकत नाहीत हा त्यांचा युक्तीवाद आयोगातर्फे मान्य करण्यात येत आहे व या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड,

बीड

२ कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४०८

निर्णय दिनांक २५-०७-२००७

श्री. अजय शेषराव वाघ, : अपिलार्थी

व्दारा होळकर, ३६, “विभूती” श्रीकृष्णनगर,

दरगा रोड, सहकारनगर बाजूला, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण उप
संचालक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उप संचालक, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अजय शेषराव वाघ, औरंगाबाद (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उप संचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय, औरंगाबाद श्री. एस. आर. चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, औरंगाबाद श्री. एम. आर. देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

२. या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक ३०-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये "खाजगी अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकाच्या नियुक्त्या संदर्भात, सन २००० ते २००५ अखेरपर्यतची माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. सदर माहिती मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई, आदर्श शिक्षण संस्था नवगाव राजुरी, जिल्हा बीड, नवगण शिक्षण संस्था, बीड, जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गडी जिल्हा बीड" या शिक्षण संस्थेशी सदर माहिती निगडीत होती. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये वर्षनिहाय, विषयवार, शिक्षण सेवकांच्या नियुक्तीच्या फोटो प्रती, नियुक्तीच्या पुर्वपरवानगीच्या फोटो प्रती व शिक्षण उप संचालक कार्यालय यांनी मान्यता दिलेल्या पत्राची छायांकित प्रती यांचा समावेश होता.

३.  सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

४.  या माहिती अर्जासोबत अपीलार्थीने एक १० कलमी प्रपत्र जोडले असून या प्रपत्रा मध्ये त्यांनी सदर माहिती अपेक्षिली आहे.

५.  सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य / मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी म्हणून असतांना आपण संबंधित महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे त्यांचे पत्र दिनांक १७-०१-२००६ अन्वये सुचित करुन अपीलार्थीचा अर्ज निकाली काढला.  याच विषयावर अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या वेगळ्या अर्जावर (दिनांक १५-१२-२००५) त्यांचेकडील दिनांक २७-१२-२००५ च्या पत्रान्वये उत्तर दिले होते व या उत्तराचा संदर्भ त्यांनी अपीलार्थीस हे पत्र पाठवितांना दिला आहे. अपीलार्थीने जन माहिती अधिका-याकडे पुर्वी दिनांक १५-१२-२००५ रोजी अशाच प्रकारची माहिती मागितली होती व त्याचे उत्तर देतांना जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक २७ डिसेंबर २००५ रोजी असे कळविले होते की, त्यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयास उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळ या बाबींचा विचार करता विहीत मुदतीत देणे शक्य नाही.  या पत्रातही जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस संबंधित कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक महाविद्यालयाच्या माहिती अधिका-याकडून माहिती घेण्याचे सूचित केले होते.

६.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०१-२००६ रोजी दिल्या गेलेल्या उत्तरावर अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपीलीय अधिका-याकडे दिनांक २७-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले व त्यामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.  या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांनी अपीलार्थीस त्यांच्या दिनांक २०-०२-

२००६ पत्रान्वये एक पत्र लिहून अपील निकाली काढल्याचे कळविले व परत एकदा अपीलार्थीस संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले.

७. जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अपीलावर दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून जन अपीलीय अधिका-याने अपील निकाली काढण्यापुर्वी सुनावणी घेतली नसल्याचे, अपीलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असूनही ती माहिती देण्याचे जाणुनबुजून टाळले या बाबी आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

८. आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती एकंदर ६२ एकूण उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाच्या संबंधी असून अपीलार्थीने केलेली मागणी ही विषयवार असल्याचे स्पष्ट केले. या ६२ शाळामधील प्रत्येक विषयाच्या शिक्षकाची माहिती अपीलार्थीस संस्थानिहाय व विषयनिहाय वेगवेगळी अपेक्षित आहे. अपीलार्थीने ही माहिती ५ वर्षाची विचारली आहे. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे अपीलार्थीस ही माहिती एकत्र देण्यास त्यांना वेळ लागेल असे त्यांनी प्रतिपादन केले. त्याच बरोबर याच विषयावर व अशीच माहिती श्री. नितीन शरदराव व्यास या अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी कडे केली होती. आज रोजी जरी या सर्व संस्थांच्या विविध शाखाच्या संदर्भातील एकगठ्ठा माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार नसली तरी ती विखुरलेल्या स्वरुपात वेगवेगळ्या नस्त्यामध्ये त्याच्या कार्यालयात उपलब्ध आहे असे त्यांनी कबूल केले व माहितीचे स्वरुप व व्याप्ति पाहता जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस ही माहिती देण्यासाठी

मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ व साधनसामुग्रीचा वापर करावा लागेल हा युक्तीवाद राज्य माहिती आयोग मान्य करीत आहे व त्याच बरोबर अपीलार्थीने मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम ०५ मधील तरतुदीनुसार अपीलार्थी माहिती मिळणे हा त्यांचा हक्क आहे असेही येथे नमूद करित आहे.

९. वरील दोन्ही बाबींचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने अपीलार्थीस आयोगातर्फे असे सुचविण्यात आले की त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन, त्यांनी विचारलेली माहिती ज्या नस्त्यामध्ये समाविष्ठ आहे अशा सर्व नस्त्यांची तपासणी करुन त्यांना आवश्यक असेल ती माहिती या नस्त्यामधून त्यांनी उपलब्ध करुन घ्यावी, यास जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी पुढे तयारी दर्शविली आहे.

१०. वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर असे आदेशीत करण्यात येते की, अपीलार्थी यांनी प्रथम जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यासंदर्भात या विषयाशी सर्व संबंधित नस्त्या त्यांना उपलब्ध करुन देण्याची लेखी विनंती करावी व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी प्राधान्याने अपीलार्थीस, या अर्जाची उशिरात उशीर आठ दिवसात दखल घेऊन, अपीलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहिती संदर्भातील त्यांच्याकडील सर्व नस्त्या तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात. या प्रकरणी अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतः सहकार्य करावे व त्यांच्या हाता खालील संबंधित कर्मचा-यांनाही अपिलार्थीस सहकार्य करण्याच्या सूचना द्याव्यात जेणेकरुन अपीलार्थीस हवी असलेली माहिती त्यांना सहजपणे उपलब्ध होऊ शकेल.

११. प्रसंगवशात राज्य माहिती आयोगाला असे आढळून आले की, शिक्षण विभागाकडे अनेक नागरिकांकडून अशाच प्रकारची माहिती वेळोवेळी विचारण्यात येत असते. सदर माहिती बहुतांश वेळा शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी वेळेत पुरवू शकत नाही तेव्हा सचिव (शिक्षण) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखाली सर्व शिक्षण

संस्थाकडे अथवा राज्य शासनाच्या अधिका-याकडे नागरिकांकडून वेळोवेळी विचारली जाणारी माहिती संगणकाच्या मदतीने वेळीच संग्रहीत करुन ठेवावी जेणेकरुन मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा अभाव ह्या सबबी दर्शवून जन माहिती अधिकारी शक्यतो सामान्य नागरिकांना माहिती नाकारण्याचे टाळू शकतील व माहिती अधिकार अधिनियम २००५ अधिक प्रभावी होऊन त्याचा सरकारी यंत्रणेत पारदर्शकता आणण्याचा मूळ उद्देश सफल होण्यास मदत होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर व अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजय शेषराव वाघ, व्दारा होळकर, ३६, “विभूती” श्रीकृष्णनगर, दरगा रोड, सहकारनगर बाजूला, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण उप संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शिक्षण) मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/रामाआ/अपील/सिआर/४०९
निर्णय दिनांक- २५-०७- २००७.

१. साठे राजाभाऊ बाबासाहेब, .. अपिलार्थी.
मु.पो.वडगाव (दा)
तालूका-परळीवैजनाथ
जिल्हा-बीड-४३१५१५

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
स्वामी रामानंद तिर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
संचालक,
स्वामी रामानंद तिर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी साठे राजाभाऊ बाबासाहेब,(येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत तर जनमाहिती अधिकारी तथा स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,(येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपीलीय अधिकारी तथा संचालक, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) यांच्यावतीने त्यांची बाजू मांडण्यासाठी ॲड.दिलीप जे चौधरी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- १३-१०-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विविध महाविद्यालयामध्ये संस्था चालकानी प्राध्यापकपदी नेमलेले उमेदवार निवड प्रक्रिया संदर्भात एकूण ६ मुद्यांवर खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

१. आपल्या विद्यापीठाअंतर्गत विविध वरिष्ठ महाविद्यालयामध्यये संस्था चालकांनी प्राध्यापकांच्या नियुक्ती करतांना नेट/सेट चे उमेदवार मिळणेसाठी काय काय प्रयत्न केले याची तपासणी/पडताळणी आपले कार्यालय करते काय, असल्यास कोणकोणत्या नियमांचे पालन संस्थांनी करणे बंधनकारक आहे त्याचा तपशिल आणि आपले कार्यालय त्यांचे पालन करीत असेल बाबत स्वयंस्पष्ट खूलासा.

२. मराठवाडयात अनेक नेट/सेट बेकार उपलब्ध असतांना संस्था चालकांनी अपात्र उमेदवारांच्या नियुक्ती कां केल्या व पात्रताधारक उमेदवार मिळणेसाठी त्यांनी नियमानुसार लिखील स्वरूपात प्रत्यक्षात प्रयत्न केले होते याची खात्री आपल्या कार्यालयास कोणत्या पुराव्यामुळे झाली व त्याची सत्यता पडताळणी आपल्या कार्यालयाने कशी व कोणत्या आधारे केली याचा तपशिल द्यावा.

३. दैनिक लोकमत मध्ये दि. ११-१०-०६ च्या पान नं. ७ मराठवाडा विशेष पानावर "३०० प्राध्यापकांवर बेकारीची कु-हाड " ही बातमी लातुर येथुन छापून आलेली आहे व त्यात नमुदप्रमाणे गेल्या दोन वर्षापासुन कंत्राटी पध्दतीवर नेट / सेट पात्रता नसणा-या प्राध्यापकांच्या सेवा संपूष्टात येणार असे नमुद आहे याबाबत १. या अपात्र प्राध्यापकांच्या मूळ नियुक्तीच्या वेळी संबंधित सर्व संस्था चालकांनी प्राध्यापक निवड प्रक्रियेसाठी आवश्यक सर्व नियमांचे पालन केले होते काय? उदा. नियमानुसार सुपरिचित वर्तमान पत्रात जाहिरात, सेवा योजन कार्यालयाकडे यादी, समाज कल्याण विभागाकडुन पात्र उमेदवारांची यादी, यु.जी.सी./सेट/नेट या विभागाकडील पात्रता उमेदवाराची यादी मागविणे इ. प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या काय ? असल्यास त्या तीनशे प्राध्यापकांच्या नियुक्त्या महाविद्यालय निहाय व संस्थानिहाय आपल्या कार्यालयाकडे संस्थेने केलेल्या निवड प्रक्रियेच्या अंमलबजावणीबाबत कशा व कोणत्या नियमानी खात्री केली याचा पुराव्यासह तपशिल.

४. सामान्य प्रशासन विभाग, मुंबई, म.रा.मुंबई यांनी मा. सर्वोच्य न्यायालय यांच्या आदेशानुसार २८-८-२००५ रोजी काढलेल्या शासन निर्णयाचे आपले कार्यालय पालन करीत आहे काय? असल्यास केंव्हापासुन व अंमलबजावणी केलेल्या पहिल्या महाविद्यालयाचे नांव व करीत नसल्यास स्वयंस्पष्ट कारणे?

५. यापूढे आपले कार्यालय यु.जी.सी./सेट/नेट विभाग व इतर ठिकाणी पात्र उमेदवारांसाठी संस्थांना प्रयत्न करण्यांस भाग पाडणार काय? किंवा आपले कार्यालय स्वतः होऊन पात्र उमेदवार यादी पुरवुन भावी प्रशासकीय व न्यायालयीन कामाचा विनाकारण अतिरिक्त कामाचा बोजा कमी करणे कामी सुदूरदर्शी निर्णय घेणार काय ?

६. पात्र उमेदवार उपलब्ध असतांना अपात्र उमेदवारांच्या झालेल्या निवडीला आपण मान्यता कां व कोणत्या नियमांनी दिली आणि संबंधित सर्व महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांना संस्थांनी पात्र व प्रशिक्षीत उमेदवारांच्या शिकवनुकीपासून वंचीत ठेवुन अपात्र उमेदवारांकडुन पुरेपूर ज्ञानार्जनांपासून वंचीत का ठेवले व याला जबाबदार कोण याचा लेखी स्वयंस्पष्ट खूलासा.

७. कला व वाणिज्य महाविद्यालय, हदगाव, जिल्हा नांदेड येथील समाजशास्त्र अधिव्याख्यात्याच्या पदभार नियूक्तीस मा.प्राचार्य यांनी मा.संचालक,विकास समिती विद्यापीठ, नांदेड यांना दिनांक- १५-०४-१९९८ ला दिलेल्या प्रस्तावास मान्यता का देण्यात आली नाही याबाबत विद्यापीठ व शासन नियमाची सत्यप्रत द्यावी.

८. या सेवामान्यता प्रस्तावाची सत्यप्रत व या प्रस्तावास किती दिवसात कार्यवाही होणे आवश्यक आहे ? प्रलंबीत ठेवण्यास जबाबदार अधिका-यांची नावे व पद याबाबत माहिती सत्यप्रत.

९. एम.एस.डब्ल्यू. बी.प्लस नसून समाजशास्त्र युजीसी.सेट उत्तीर्ण समकक्षता प्रमाणपत्रानूसार अधिव्याख्याता या पदावर सेवामान्यता देता येते किंवा नाही याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, सेट विभाग, पूणे, शासन नियमाची सत्यप्रत द्यावी.

अपिलार्थीने सदर माहिती पोष्टाने मागितली असून सोबत ते दारिद्रयरेषेखलील असल्याचा पुरावा त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जात जोडला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अपिलार्थीने माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक- १३-१०-२००६ रोजीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-१०-२००६ रोजी प्राप्त झाला आहे.

जनमाहिती अधिकारी अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जाच्या संदर्भाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून वरीलप्रमाणे मिळालेल्या माहितीमूळे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिका-यास शास्ती लावण्याची मागणी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेली आहे. अपिलार्थी यांनी ज्या प्राधिकरणाकडे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणजेच कुलगुरु यांच्याकडे सदर अपील दाखल करणे आवश्यक असतांना त्यांनी हे अपील संचालक, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे केले आहे. त्यानी या अपीलावर जनअपिलीय अधिकारी म्हणून कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे व निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थी यांना दिनांक- ०४-०१-२००७ रोजी संस्थेच्या संचालकानी पत्र देवून त्यांना, अपिलार्थीने यापूर्वी पुरविण्यात आलेल्या माहिती संदर्भात काही शंका असल्यास किंवा माहिती अपुर्ण वाटल्यास प्रत्यक्ष विद्यापीठात उपस्थित राहण्या विषयी कळविले. जेणेकरुन त्यांच्या शंकेचे निरसन करणे जनअपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना सूकर होईल. तथापि सदर पत्र

प्राप्त होवूनही अपिलार्थी हे विद्यापिठात प्रत्यक्षात उपस्थित झाले नसल्याचे उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्षात विद्यापिठात चर्चेसाठी बोलाविले असतांना देखील अपिलार्थी हे विद्यापीठात उपस्थित न राहता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे, दिनांक- ०१-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितावर कारवाइ करण्याची आयोगास विनंती केली आहे. याच अर्जामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून माहिती देण्याचे टाळले व अपिलार्थी दिनांक- १०-०१-२००७ रोजी आजारी असतांनाही जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्या मतावर ठाम राहून त्यांनी अपिलार्थीस खरी माहिती मिळविण्यापासून वंचित ठेवले, असल्याचे असेही त्यांनी पुढे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत, याची नोंद घेण्यात आली. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने विचारलेली माहिती मुळात प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या माहिती या व्याख्यात बसत नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये २ (च) मध्ये माहितीची व्याख्या खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

(च) ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल)

कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधार सामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

सदर व्याख्येचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्यासाठी सादर केलेला अर्ज हा कायद्यातील या तरतुदशी अनुसरुन नाही. एवढे असूनही जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २८-११-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे पुढे असाही युक्तीवाद करण्यात आला की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली असून अशा प्रश्नार्थक स्वरुपात माहिती त्यांच्याकडील नस्तीवर विद्यापीठात उपलब्ध नसल्यामूळे ती अपूर्ण ठरते किंबहूना एखादी माहिती अपिलार्थीने स्पष्ट शब्दात मागितली असती तर ती नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास त्यांना सूकर झाले असते.

त्याचबरोबर त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थींना संपूर्ण माहिती मिळण्यासाठी व त्यांना देण्यांच्या दृष्टीने विद्यापीठाने त्यांना दिनांक- ०४- ०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही शंका असल्यास विद्यापीठामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची विनंती केली होती. तथापि अपिलार्थी नंतर विद्यापीठामध्ये उपस्थित राहिले नाहीत.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने बहूतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली हे स्पष्ट होते. अपिलार्थीस माहिती पुरविण्याचा विद्यापिठाने प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचेही दिसून येते. अपिलार्थी यांची प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुपस्थित राहणे, राज्यमाहिती आयोगाकडे व्दितीय अपील करुनही आयोगाकडे ही सुनावणीसाठी उपस्थित न राहणे, या

अपिलार्थीच्या कृती पाहता, त्यांच्या माहिती मागण्याच्या हेतू बाबत, शंका घेण्यास पुरेसा वाव निर्माण करतात.

अपिलार्थीने मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या व्याख्येत बसत नसल्याने तसेच विद्यापीठाने त्यांना माहिती देण्यासंदर्भात घेतलेली सकारात्मक भूमीका व त्यास अपिलार्थीने दिलेला नकारात्मक प्रतिसाद पाहता राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २५-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ साठे राजाभाऊ बाबासाहेब, मु.पो.वडगांव (दा)
तालूका- परळीवैजनाथ, जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा संचालक, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, ,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३

निर्णय दिनांक २६-०७-२००७

सौ. चंद्रकला उत्तम सुर्यवंशी, : अपिलार्थी
गट नं. ९९, वाळूज (बु.) तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
उपविभाग, गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, (ग्रामीण)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. चंद्रकला उत्तम सुर्यवंशी, वाळूज (बु.)

तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, गंगापूर जिल्हा औरंगाबाद श्री. सुरेंद्र नारायण शेवतेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, औरंगाबाद श्री. पांडव शिवाजी विठ्ठलराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> "वाल्मिकी ऋषि डिपीवर असलेले एकूण ग्राहक व एकूण एच. पी. लोड बाबत माहिती."

सदर माहितीचा कालावधी अपीलार्थीने ५ ते ८ दिवस असा दर्शविला असून अपीलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

सदर अर्ज अपीलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडे सादर केला होता.

अपीलार्थीने अर्ज जरी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून केला असला तरी तो प्रत्यक्ष सादर करतांना मात्र त्यांनी कार्यकारी अभियंता – जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत – त्यांच्या कार्यालयाकडे -- सादर केला आहे. तदनंतर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडील दिनांक ०८-०१-२००७ च्या पत्रान्वये सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या या अर्जावर दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिल्याचे आयोगास, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन, दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

(ग्रामीण मंडळ) जावक रजिस्टर वरील दिनांक १२-०१-२००७ अनुक्रमांक ९४ मध्ये याबाबत नोंद आहे.

जन माहिती अधिका-याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक ०९-०२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. सदर सुनावणी न घेण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपीलार्थीने अपील अर्ज विहीत नमुन्यात नाही व "प्रती" हा रकाना अपीलार्थीने रिकामा सोडला असल्यामुळे त्यांनी अपील घेतले नाही असे नमूद केले. तथापि या अर्जात देखील अपीलार्थीचे पूर्ण नाव व पत्ता अपीलार्थीने लिहिला आहे, त्याबरोबर या प्रकरणी स्वतः कार्यकारी अभियंता हेच जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांच्या पदाचा उल्लेख "प्रति" या शब्दापुढे न केल्याने सदर अपीलाची सुनवणी घेतली नाही हा जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद पोकळ वाटतो. आपला युक्तिवाद करतांना जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे आयोगाच्या असे निदर्शनास आणले की त्यांनी २३ फेब्रुवारी २००७ रोजी अपीलार्थीस त्यांचे अपील फेटाळल्याचे त्यांनी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचे पत्र आयोगासमोर सादर केले. या पत्रामध्ये अपीलार्थीने केलेला अपील अर्ज १९ (१) व संबंधित नियम ५ (१) अन्वये दाखल केलेला नाही व सोबत शपथपत्र दिले नाही त्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात येत असल्याचे त्यांनी अपीलार्थीला कळविले असल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचे अपील फेटाळ्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी अपील करण्याचे प्रयोजन म्हणून ''माहिती न मिळणे'' असे कारण दर्शविले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये असे दिसून येते की, अपीलार्थीने केलेल्या दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात अपीलार्थीस दिनांक १५-०१-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिका-याने अपीलार्थीस माहिती पुरविली. पुरविलेली माहिती पाहता ही माहिती अपीलार्थीने मागितलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. अपीलार्थीस जरी माहिती मिळाली असली तरी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी आपले कर्तव्य माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहीत तरतुदीप्रमाणे बजावले नसल्याचे दिसून येते. त्यांनी अपीलार्थीच्या अपील अर्जावर सदर अपील फेटाळण्याची जी दोन कारणे, त्यांच्या दिनांक २३-०२-२००७ च्या पत्रामध्ये, लिहिली आहे ती कारणे या प्रकरणी लागू होत नाही. अपीलार्थीने अपील अर्ज कलम १९ (१) व संबंधित नियम ५ (१) अन्वये दाखल केलेला नाही व सोबत शपथपत्र दिले नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी या पत्रात म्हटले आहे. अपीलार्थीने केलेला अपील अर्ज शासनाच्या ११ ऑक्टोंबर २००५ रोजी प्रसिध्द झालेल्या नमुन्याप्रमाणे केलेला आहे त्यामुळे त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांना या उत्तराव्दारे नक्की काय म्हणावयाचे आहे ते जन अपिलीय अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळतांना अपीलार्थीने सोबत शपथपत्र दिले नाही असा अपिलाच्या निर्णयपत्रात जन अपिलीय अधिकारी यांनी उल्लेख केला आहे तथापि शासनाच्या ११ ऑक्टोंबर २००५ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसुचनेमध्ये अशा प्रकारचे शपथपत्र दाखल करण्याचा कोठेही उल्लेख नाही त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे त्यांचे अपील फेटाळण्याची कळविलेली ही कारणे देखील चुकीची ठरतात. आज रोजी झालेल्या युक्तिवादात जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीने अपील करण्याचे अर्जावर २० रुपयाचे पोस्टाचे तिकीट

चिकटविले नसल्याचे आयोगाच्या तोंडी युक्तिवादाव्दारे निदर्शनास आणले आहे. हा मुद्दा जर, जन अपिलीय अधिकारी यांनी अपील ठरवितांना विचारात घेऊन त्याप्रमाणे अपीलार्थीस वेळीच कळविले असते तर अधिक उचित झाले असते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्राप्त होणा-या अपीला संदर्भात निर्णय घेतांना यापुढे दक्ष राहावे अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत मुदतीमध्ये दिली असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. चंद्रकला उत्तम सुर्यवंशी, गट नं. ९९, वाळूज (बु.) तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/४०६
निर्णय दिनांक २६-०७-२००७.

१. श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार .. अपिलार्थी.
पंकज मोटार्स,स्टेडियम
कॉम्प्लेक्स, जालनारोड बीड,
तालूका जिल्हा-बीड ४३११२२.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक अधिक्षक अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
उपविभागीय कार्यालय, तेलगाव,
तालूका- वडवणी, जिल्हा-बीड.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.
विभागीय कार्यालय, अंबाजोगाई
जिल्हा-बीड.

### <u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-२६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत तर जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.तेलगाव ता.वडवणी, जि.बीड,

श्री.किशोर यादवराव देशपांडे, ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, श्री.के.बी.फकीर, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. वडवणी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

आदर्श सहकारी दालमिल व कृषी प्रक्रिया संस्था म.वडवणी यांच्या संदर्भात सन १९९८ पासून ते १२-०२-२००६ पर्यंतच्या कालावधीतील खालील माहिती मागविली होती.

“ १) या संस्थेला प्रथम विद्युत पुरवठा कधी दिला. याची माहिती संस्थेने विद्युत पुरवठयाची मागणी केलेल्या अर्ज व ठरावाच्या प्रतीसह द्यावी.

२) विद्युत पुरवठयाबाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या पाहणी अहवालाची प्रत द्यावी.

३) या संस्थेस प्रथमतः दिलेले विद्युत कनेक्शन आज चालू आहे किंवा कसे या बद्दलची माहिती द्यावी. जर आपणामार्फत सदरील संस्थेचा विद्युत पुरवठा खंडीत करुन पुन्हा वीज पुरवठा दिलेला असेल तर वीज पुरवठा मागणीसाठी पुन्हा केलेल्या अर्जाची आपल्या कार्यालयाच्या टिपणीसह व पाहणी अहवालासह प्रत द्यावी.

४) संस्थेस प्रत्येक वर्षासाठी किती रुपयांचा वीज पुरवठा केला व संस्थेने प्रत्येक वर्षी किती वीज बील भरले याची माहिती द्यावी. हे वीज बीज कोणकोणत्या तारखेला भरले याची माहिती वर्षनिहाय द्यावी.

५) संस्थेकडे आज रोजी किती थकबाककी आहे व ती वसूल करण्यासाठी आपण काय कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीच्या आदेशाच्या प्रती द्याव्यात. म्हणजेच वसूलीसाठी प्रथम पासून आजपर्यंत बिलाव्यतिरिक्त कोणकोणता पत्रव्यवहार केला त्याच्या प्रती द्याव्यात.

६) विद्युत पुरवठा खंडीत करुन तो त्याच जागी पुन्हा नव्याने अर्ज घेवून जोडून दिलेला असेल तर असे करताना घेतलेले नाहरकत प्रमाणपत्र, पाहणी अहवाल व सदरील संचिकेवरील आपल्या कार्यालयाची टिपणी इत्यादीची प्रत द्यावी.

७) थकबाकी असतांना वरील प्रमाणे विद्युत पुरवठा जर जोडून पुन्हा नव्याने वीज पुरवठा केलेला असेल तर त्यासाठी कोणते नियम / शासनादेश आहेत, त्याची प्रत द्यावी.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने मूळात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी न करता ती संबंधीत कनिष्ठ अभियंता यांच्याकडे केली आहे. कनिष्ठ अभियंता हे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी किंवा सहाय्यक जनमाहिती अधिकारी नाहीत. असे जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी ते स्वतः या प्रकरणी जनमाहिती अधिकारी अथवा सहाय्यक जनमाहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडील दिनांक- ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये परत केला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी हा अर्ज कोठे करावा याचे योग्य ते मार्गदर्शन केल्याचे दिसून येते. तदनंतर अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये परत, वर उल्लेख केलेले कनिष्ठ अभियंता यांच्याकडे मागणी केलेली माहिती मागविली. सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-१२-२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिनांक- २०-०१-२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे.

तथापि हया माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल २५०/- रुपये प्रतिदिन शास्ती लावण्याची व त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २५-०१-२००७ रोजी घेवून अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या या व्दितीय अपीलामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना कनिष्ठ अभियंत्याने त्यांचा मूळअर्ज परत करण्याच्या प्रक्रिये पासून ते त्याच्या जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथम  अपीलावर निर्णय देण्या पर्यंतच्या सर्व टप्प्यावरील प्रक्रिया बाबत हरकत घेतली असून,  या उप्पर जनमाहिती अधिका-यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) मधील तरतुदीनूसार  प्रतिदिन रुपये २५०/- इतकी शास्ती लावण्याची व कलम २० (२) प्रमाणे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाइ प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांचा जो दिनांक- ०४-१२-२००६ रोजी अर्ज केला आहे व त्यांनी जनमाहिती अधिकारी अथवा

सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांना उद्देशून त्यांच्या कार्यालयात सादर करावयास हवा होता. तथापि अपिलार्थीने तसे न करता संबंधीत विभागाचे कनिष्ठ अभियंता जे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी अथवा सहाय्यक जनमाहिती अधिकारी नाहीत, त्यांना सादर केला होता. संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थी यांचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सात दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक-११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये परत पाठविला आहे व या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस हा अर्ज नेमका त्यांनी कोठे करावयाचा याबद्दल मार्गदर्शन केले आहे.

अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी एकदा सादर केलेला अर्ज, तो चुकीच्या अधिका-याकडे दिला असला तरी तो अर्ज अपिलाथीस परत करण्याची तरतूद या कायद्यात नाही व संबंधीत प्राधिकरणाने असा अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे परस्पर विहित कालावधीत पाठविण्याचे त्यांच्यावर बंधनकारक आहे. अपिलार्थीचा हा मुद्दा जरी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६ (३) (ii) प्रमाणे बरोबर असला तरी अपिलार्थीने पाठविलेला अर्ज कनिष्ठ अभियंता यांनी परत करण्यामध्ये त्यांचा या कलमाच्या तरतुदी विषयी असलेली अनभिज्ञता या व्यतिरिक्त इतर कुठलाही असद्‌हेतु होतो, असे आयोगास वाटत नाही.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे विश्लेषण करता असे दिसून येते की, मुद्दा क्रमांक-१ मध्ये सदर संस्थेच्या ठरावाची प्रत जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामूळे ते ती प्रत अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. तथापि उर्वरीत सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

मुद्दा क्रमांक-२ च्या बाबतीत सदर संस्थेला विद्युत पुरवठाच्या बाबतीत त्यांच्या कार्यालयाने त्यांच्या पाहणी अहवालाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामूळे त्यांनी दिली नाही. मुद्दा क्रमांक-४ च्या बाबतीत अपिलार्थीस सदर संस्थेने थकीत बील प्रत्येक वर्षी किती

व कोण-कोणत्या तारखांना पुरविली, याची वर्षनिहाय्य माहिती विचारली होती. अपिलार्थीस माहिती देतांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन विद्यूत पुरवठयाच्या बीलाची रकम, सदर संस्थेने भरणा केलेली रक्कम व रक्कम भरण्याची तारीख इतका ७ पैकी २ वर्षाचा व एकूण थकित रक्कमे संदर्भात माहिती दिलेला तपशील आहे. उर्वरीत ५ वर्षाचा तपशील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नसल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले. त्याचबरोबर सदर तपशील त्यांच्या कार्यालयाच्या संगणकीकरण करण्याच्या कामामध्ये नष्ट झाल्याची शक्यता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या शपथपत्राव्दारे विहित केली आहे. मुद्दा क्रमांक-७ च्या बाबतीत खंडीत झालेला वीज पुरवठा परत जोडण्यासाठी शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शनपर सूचना अथवा नियम नसल्याने ही माहिती जनअपिलीय अधिकारी अपिलार्थीस पुरवू शकले नाही व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे.

अपिलार्थीने त्यांचे व्दितीय अपीलअर्जामध्ये सदर संस्थेने मागणी केलेल्या विद्यूत जोडणीसाठी केलेल्या अर्जामध्ये अनेक रकाने कोरे सोडले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीच्या कार्यशैलीवर त्यांचा अभिप्राय व्यक्त केला आहे व अशा स्वरुपाचा कारभार विद्यूत कंपनीचा असल्यामूळे त्यांनी मुळीच माहिती करण्याचे टाळले आहे, असे म्हटले आहे.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपीलअर्जात सादर केलेले त्यांचे म्हणणे व आज रोजी उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी मांडलेला युक्तीवाद पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस पुरविली आहे व जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही ती उपलब्ध नसल्या बाबतही त्यांनी अपिलार्थीस कबुल केले आहे. सदर माहिती अपिलार्थीस देण्याचे टाळाटाळ करणे किंवा असद्हेतुने अपिलार्थी पासून ती लपवून ठेवणे, अशा प्रकारचा उद्देश जनमाहिती

अधिकारी यांचा असावा, हे या प्रकरणी सिध्द होवू शकत नाही. त्यामूळे जनमाहिती अधिका-यास शास्ती लावणे अथवा त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याची शिफारस करणे, हे आयोगास योग्य वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात आले आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २६-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
प्रति,

१ श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड-४३११२२

२ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. उपविभागीय कार्यालय, तेलगाव, तालूका- वडवणी, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म. विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४१०

निर्णय दिनांक २६-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. गंगाराम रामलू बक्कावाड,<br>चेअरमन, श्री. सोमेश्वर मच्छिमार सहकारी<br>संस्था मर्यादित, किनी, तालुका भोकर, जिल्हा<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था<br>(दुग्ध), नांदेड जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था<br>(दुग्ध), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी गंगाराम रामलू बक्कावाड, किनी, तालुका भोकर जिल्हा नांदेड हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), नांदेड जिल्हा नांदेड श्री. के. एम. कलेटवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), औरंगाबाद सौ. के. एम. शहा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक ०७-११-२००५ रोजीचा अर्ज महाराष्ट्र माहिती अधिकार कायद्यान्वये केलेला आहे व राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे व्दितीय अपील केले आहे तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये या प्रकरणी प्रथम अपील केलेले नाही.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीनुसार केलेल्या मूळ अर्जावरील पुढील अपील ठरविण्याची अधिकारिता, सदर कायदा आता निरसीत झाला असल्यामुळे, राज्य माहिती आयोगास नाही, त्यामुळे अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाराम रामलू बक्कावाड, चेअरमन, श्री. सोमेश्वर मच्छिमार सहकारी संस्था मर्यादित, किनी, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध),

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४३५

निर्णय दिनांक ३०-०७-२००७

श्री. विजय रामभाऊ धनवडे, : अपिलार्थी

मु. पो. तालुका शेवगाव

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगाव

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (रोहयो) विभाग,

अहमदनगर

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजय रामभाऊ धनवडे, शेवगाव जिल्हा अहमदनगर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगाव जिल्हा अहमदनगर हे गैरहजर आहेत व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (रोहयो) विभाग अहमदनगर श्री. एम. एम. सुरकुटवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००६ रोजी माजी खासदार दिलीपजी गांधी यांच्या निधीतून करण्यात आलेल्या कामाच्या विषयी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ माजी खासदार दिलीपजी गांधी यांच्या निधीतून करण्यात आलेल्या १) राक्षी २) भगूर या गावातील सांस्कृतिक भवनाचे अंदाजपत्रक त्यावरील प्लॅन इस्टिमेट देण्यात यावे लेखी स्वरुपात.”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपीलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये माहितीचा संबंधित कालावधी १५ दिवस असा उल्लेख केलेला आहे.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीने केलेला अर्ज महाराष्ट्र शासन राजपत्र १८ नोव्हेंबर २००५ भाग-४ जोडपत्र अ नमुना ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विहीत नमुन्यात नसल्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे त्यांना कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपीलाची सुनावणी दिनांक ०८-०५-२००६ रोजी घेऊन सुनावणीचे आदेश त्यांच्याकडील पत्र क्रमांक २९६४, दिनांक १६-०५-२००६ रोजी आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागणी केलेली माहिती त्वरीत पुरविण्याचे सुचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी वरील प्रमाणे आदेश दिल्या-नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०८-०६-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगा-कडे दिनांक १८-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर ४ महिने इतक्या उशीराने त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी हे विना परवानगी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी आहेत, परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीची काही माहिती नाही. तथापि आयोगास उपलब्ध करुन

देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज दिनांक २७-०२-२००६ रोजी केला. यावर जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीने केलेला अर्ज हा महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १८ नोव्हेंबर २००५ भाग ४ जोडपत्र-अ नियम ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विहीत नमुन्यामध्ये नसल्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचा निर्णय अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००६ रोजी कळविण्यात आला. जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीमधून त्यांचा अपीलार्थीकडून आलेल्या अर्जाबाबत उदासिन दृष्टीकोन स्पष्ट होतो. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील केवळ अपीलार्थीने त्यांच्याकडे केलेला माहिती अर्ज विहित नमुन्यात नाही म्हणून फेटाळला आहे. अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीचा अर्ज पाहता अपीलार्थीने महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ व्दारे विहित केलेल्या नमुना अर्जात माहिती मागितली आहे असे दिसून येते. विहीत नमुना व अपिलार्थीने केलेला अर्ज याची तुलना केली असता असे दिसून येते की, दोन्ही अर्ज फक्त एक मुद्दा सोडून सारखेच आहेत. पुर्वी (माहिती अधिकार अधिनियम २००५ अस्तिवात येण्यापुर्वी) वापरण्यात येणा-या अर्जामध्ये अपीलार्थीस माहितीचे प्रयोजन जन माहिती अधिका-यास सादर करणे आवश्यक होते तथापि नवीन नियमातील अर्जामध्ये हा मुद्दा काढून अपीलार्थी दारिद्र्य रेषे-खालील आहे किंवा कसे हा मुद्दा समाविष्ट करण्यात आला आहे. केवळ एका मुद्यात बदल झाल्याने अपीलार्थीस माहिती देण्याचे, केवळ या एका तांत्रिक त्रुटीच्या मुद्दयावर, माहिती नाकारणे, ही जन माहिती अधिकारी यांची कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील मूळ उद्देशावर घाला घालते. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रश्नी तारतम्याने विचार करुन अपीलार्थीने जी माहिती मागविली आहे ती विहित मुदतीत कशी पुरविता येईल अशा प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद अपीलार्थीस देणे आवश्यक आहे. किंबहुना जन माहिती

अधिकारी यांची माहिती देण्याबाबत सकारात्मक भुमिका असली तरच माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सफल होईल असे आयोगाचे मत आहे.

या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी एका शुल्लक चूकीच्या पध्दतीवर बोट ठेऊन अपीलार्थीस विहीत मुदतीत आपला निर्णय न कळविणे ही जन माहिती अधिकारी यांची कृती त्यांच्यातील बेजबाबदारपणाचे दर्शन घडवते. त्यांनी अपीलार्थीस मूळात जो प्रतिसाद दिला तो साधारणतः विहित मर्यादेपेक्षा दिड महिना इतक्या विलंबाने दिला आहे. त्यांच्या या विलंबाने माहिती देण्यामागे या आदेशा प्रती त्यांच्या मनात असलेला अनादरच एक प्रकारे त्यांनी दाखवून दिला आहे. आता अपीलार्थीस ती माहिती मिळाली असल्याचे दिसून येते तथापि जन माहिती अधिकारी यांच्या औदासिन्याची दखल वेळेत न घेतल्यास अशा प्रकारच्या प्रवृत्ती पुढे भविष्यात वाढीस लागू नयेत म्हणून असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपीलार्थीस प्रथम प्रसिसाद देण्यास लावलेल्या विलंबाने त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे तेव्हा सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अनुपालन अहवाल हे आदेश पारीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबाबत व

त्यांच्या बेजबाबदार कार्यपध्दतीबाबत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा आपला अनुपालन अहवाल हे आदेश पारीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत राज्य माहिती आयोगास सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय रामभाऊ धनवडे, मु. पो. तालुका शेवगाव जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगाव जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (रोहयो) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४३६

निर्णय दिनांक ३०-०७-२००७

श्री. सुभाषराव पाराजी शिंदे, : अपिलार्थी
मु. पो. सुपा, तालुका पारनेर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक वन सरंक्षक रोहयो अहमदनगर
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वन सरंक्षक, उप वनसंरक्षक जिल्हा
कार्यालय, अहमदनगर जिल्हा अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुभाषराव पाराजी शिंदे मौजे सुपा तालुका पारनेर जिल्हा अहमदनगर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन सरंक्षक रोहयो अहमदनगर जिल्हा अहमदनगर श्री. अर्जुन

पाटीला म्हसे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप वन सरंक्षक उप वनसंरक्षक जिल्हा कार्यालय अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री. एम. जी. चौधरी स्टेनो हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे एकूण ५ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती.

१. ‘‘श्री. येणारे यांचा नगर जिल्ह्यातील वन विभागातील नोकरीचा कार्यकाळ,

२. नगर जिल्ह्यातील कार्यालयात कोणकोणत्या ठिकाणी नेमणूक व कोणत्या कालावधीत तसेच झालेल्या बदल्यासंदर्भात तत्कालीन कारणे,

३. सदर वेगवेगळ्या ठिकाणी नेमणुकीस असतांना त्या ठिकाणी वन विभागात केलेल्या सर्व विकास कामाबाबत माहिती, सदर कामे करतांना कामांचे अंदाजपत्रक, कामांची मंजुरी, प्रत्यक्षात खर्ची पडलेली निधीव व तसेच कामाविषयी शासकीय नियम व निर्देशांची माहिती, (कामे करतांना मजुराकरवी अथवा यंत्राकरवी करावीत याची माहिती),

४. वन विभागातील विकास कामे पूर्ण झाल्यानंतर सदर कामाविषयीचा हेतू अगर उद्देश सफल झाला किंवा काय याविषयी वरिष्ठ अधिका-याकरवी सदर कामांना भेटी देऊन अवलोकन करुन तसेच वरिष्ठांचे त्या त्या कामाविषयी रिमार्केबल अहवाल दप्तरी रेकॉर्डला असतील त्याच्या प्रती,

५. नोकरी करत असतांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांच्या सी. डी. आर. १०८५/२५७९/६४/११ दिनांक ०५-०७-१९८६ जी. आर. प्रमाणे कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणतीही मालमत्ता खरेदी करण्यापुर्वी शासनाची पुर्वपरवानगी घेऊन, खरेदी करुन, स्वतः अगर इतर नातेवाईक यांचे नावावर

केली असल्यास शासनास लेखी स्वरुपात माहिती द्यावी लागते. त्या प्रकारची माहिती श्री. येणारे यांनी मालमत्ता खरेदी करण्यासाठी परवानगी मागितल्यासंबंधी लेखी स्वरुपात दप्तरी असलेली दस्तऐवजाची प्रत अगर त्यांचेकडून मालमत्ता खरेदी विक्री झालेल्या व्यवहाराच्या वरिष्ठांना अगर शासनास सादर केलेल्या माहितीच्या प्रती."

सदर माहिती अपीलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने मागितली असून अपीलार्थी यांच्या अर्जा-मध्ये संबंधित माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही.

अपीलार्थीच्या या माहितीच्या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक २३-०३-२००६ रोजी प्रथम माहिती पुरविली. ज्या माहितीमध्ये अपीलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ ची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडून नाकारण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०५-२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने केलेल्या मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ बाबतची माहिती एकत्र करुन व क्रमांक ५ च्या संदर्भात श्री. येणारे, वन क्षेत्र अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयास जी मालमत्ता विवरणपत्रे सादर केली आहे त्याच्या छायांकीत प्रती अर्जदार यांना देण्यास सूचित केले व अपीलार्थीचा अर्ज निकाली काढला.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ३० जून २००६ रोजी अपीलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ संदर्भातील संपूर्ण माहिती दिली.

तथापि मध्यंतरीच्या काळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदी-नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले, या अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली व माहिती मिळण्यासाठी केलेली विनंती दृष्ट हेतुने नाकारली आहे. त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसांचा विहीत कालावधी टळून गेल्यानंतरही अपीलावर निर्णय दिला नाही असे अपीलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणले व आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी जन माहिती अधिका-याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून टाळली असा त्यांचा युक्तिवाद आयोगासमोर मांडला. अपीलार्थी यांनी प्रथम अर्जात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पूर्णतः माहिती दिली नसल्याचे दिसून येते. अपीलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ मध्ये श्री. येणारे यांनी ते नोकरीस लागल्यापासून ते अपीलार्थी अर्ज केलेल्या कालावधीपर्यतच्या सर्व कालावधीची अंदाजपत्रके, कामाविषयी शासकीय नियम व निधीची माहिती अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले तथापि अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता ही माहिती जन माहिती अधिकारी यांना देता आली नाही. अपीलार्थीने मूळातच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेली मागणी ही कोणत्याही

विशिष्ट कामासंदर्भात नसून ती सर्वसाधारण स्वरुपाची असून तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. अपीलार्थीने जर विशिष्ट कामासाठी माहिती मागितली तर ती देण्याची त्यांची आजही तयारी आहे असे त्यांनी सांगितले. आयोगास सादर केलेली कागदपत्रे पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास मुद्दाम टाळाटाळ केली असे सिध्द होत नाही कारण श्री. येणारे यांची वैयक्तीक माहिती देखील जन माहिती अधिका-याने अपीलार्थीस दिनांक ३०-०६-२००६ ला पुरविली आहे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी वैयक्तीक माहिती देण्याचे आदेश त्यांच्या अपिल निर्णयामध्ये दिले आहे त्यामुळे अपीलार्थीने मागितलेली माहिती दृष्ट हेतुने जन माहिती अधिकारी यांनी दडविल्याचे सिध्द होत नाही. तथापि त्याच बरोबर अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांना अपूर्ण स्वरुपात मिळाली हेही सिध्द होते. आता अपीलार्थीस ज्या मुद्यावर अद्यापही माहिती द्यावयाची आहे त्या मुद्यावरील माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून विशिष्ट कामाचे नाव अथवा इतर तपशील त्यांना प्राप्त झाल्यानंतर २० दिवसाच्या आत अपीलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. या प्रस्तावावर अपीलार्थी यांनी सहमती दर्शविली आहे तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांना अद्यापही ज्या कामासंदर्भात माहिती हवी आहे त्या कामांची नांवे अथवा इतर तपशिल अपीलार्थीकडून प्राप्त झाल्यानंतर, सदर माहिती अपिलार्थीस २० दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांना अद्यापही त्यांना ज्या कामासंदर्भात माहिती हवी आहे त्या कामांची नांवे अथवा इतर तपशिल अपीलार्थीकडून प्राप्त

झाल्यानंतर अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांना २० दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाषराव पाराजी शिंदे, मु. पो. सुपा, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन सरंक्षक रोहयो अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वन सरंक्षक, उप वनसंरक्षक जिल्हा कार्यालय, अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/४३८

निर्णय दिनांक ३०-०७-२००७

श्री. गोविंद नामदेव शिंदे, : अपिलार्थी

मु. पो. तालुका नेवासा,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा गट शिक्षणाधिकारी,

पंचायत समिती, नेवासा, तालुका नेवासा,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपशिक्षणाधिकारी,

जिल्हा परिषद अहमदनगर,

जिल्हा अहमदनगर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोविंद नामदेव शिंदे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद जिल्हा अहमदनगर श्री. अनिल गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नेवासा तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर हे गैरहजर आहेत. त्यांचेबरोबर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नेवासा तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर श्री. के. पी. बोरुडे (सेवानिवृत्त) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पेन्शनेबल पे संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ श्री. शंकर महादू दरवडे हे जिल्हा परिषद कुकाणा शाळेवर प्रभारी मुख्याध्यापक होते. दुस-या शाळेवर मुख्याध्यापक पदोन्नती मिळाल्यावर पदोन्नती नाकारली त्या नाकारलेल्या पदोन्नतीची नकल पाहिजे आहे. सन १९७२ ते १९७७ पदोन्नती नाकारल्यानंतर सेवापुस्तकातील नोंदीची नकल, श्री. शंकर महादू दरवडे यांना कोणत्या शाळेवर पदोन्नती मिळाली होती त्याची नकल पाहिजे आहे.”

सदर माहिती अपिलार्थीने साध्या पोस्टाने मागितली आहे.

अपीलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुख्याध्यापक पदोन्नती नाकारल्याबाबतच्या आदेशासंदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपीलार्थीस ती देता येणार नसल्याचे कळविले तथापि श्री. शंकर महादू दरवडे यांच्या सेवा पुस्तकाच्या नकलेची प्रत देऊन अपीलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे अपीलार्थीस दिनांक ३०-०७-२००६ रोजी पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती जन माहिती अधिका-याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याची सूचना त्यांनी या दिनांक ३०-०७-२००६ च्या पत्रामध्ये अपीलार्थीस दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी त्यांना न मिळालेल्या माहितीची मागणी केली आहे व संबंधित जन माहिती अधिकारी हे

माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे कारण त्यांनी, प्रथम अपील करण्याचे कारण म्हणून दर्शविले आहे.

या अपीलावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली किंवा नाही हे कळण्यास काही मार्ग नाही, कारण या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे, आयोगासमोर उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नाहीत असे ते सांगत आहेत.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा निष्क्रीय प्रतिसादामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक १७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये अपीलार्थी यांनी ही माहिती पंचायत समिती शिक्षण विभागातील क्लॉर्क श्री. आहेर यांनी दिली नाही व ते माहिती अधिकार मानत नाहीत असे अपीलार्थीने या अर्जात नमूद केले आहे.  त्याच बरोबर शिक्षण विभागातील सदर जन माहिती अधिकारी हे दंड लावण्याशिवाय माहिती देणार नाहीत असाही त्यांनी या अपिल अर्जात उल्लेख केला आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलार्थी व जिल्हा परिषदेच्या दुस-या शाळेत उप शिक्षक म्हणून कार्यरत असलेले त्यांचे समकालीन सहकारी श्री. दरवडे या दोघांनाही वेगवेगळ्या वेळेस मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळाली. श्री. दरवडे यांनी पदोन्नती नाकारल्या-नंतरही त्यांना मुख्याध्यापकाच्या वेतनश्रेणी मध्ये पगार देण्यात आला व त्याचप्रमाणे त्यांचे सेवानिवृत्तिवेतन निश्चित करण्यात आले तर अपीलार्थी यांनी पदोन्नती नाकारल्यामुळे अपीलार्थी हे सेवानिवृत्त होईपर्यत उप शिक्षक या पदावर कार्यरत राहिले असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.  अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की श्री. दरवडे यांनी पदोन्नती नाकारली होती तर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे श्री. दरवडे हे सेवानिवृत्तिच्या दिनांकापर्यत मुख्याध्यापक म्हणूनच कार्यरत होते व त्यांचे

सेवानिवृत्तिची वेतन निश्चिती त्याप्रमाणे (मुख्याध्यापक पदावर वेतनश्रेणीप्रमाणे) झाली आहे असे म्हणणे आहे. अपीलार्थीने आयोगास एका वेगळ्या अर्जाव्दारे असे निदर्शनास आणून दिले आहे की, जिल्हा परिषदेच्या या प्रकरणाशी संबंधीत शिक्षण विभागाचे सर्व जुने रेकॉर्ड केडगाव तालुका अहमदनगर येथील गोडाऊनमध्ये आहे. या गोडाऊनची किल्ली पेन्शनर विनायक मारोती बोरुडे यांच्याकडे आहे. या रेकॉर्डमध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून घेतला असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अहमदनगर यांनी अपीलार्थीच्या या प्रश्नामध्ये स्वतः लक्ष देऊन अपीलार्थीने त्यांना दिनांक २७-०७-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्या-पासून १५ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे त्याच बरोबर अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अर्जाची प्रत त्यांना पाठविण्यात येत असून या अर्जाची त्यांनी त्वरीत दखल घेऊन या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून राज्य माहिती आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे. याच बरोबर अपीलार्थी यांच्यासारख्या इतर अनेक शिक्षकांच्या अशा प्रकारच्या तक्रारी / गा-हाणे त्यांच्या कडे प्रलंबीत असल्यास त्याचा त्यांनी नियमितपणे आढावा घेऊन पेन्शर शिक्षकांचे अशा प्रकारचे प्रश्न लवकरात लवकर कसे मार्गी लागतील याकडे त्यांनी विशेष लक्ष पुरवावे असेही त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने त्यांना दिनांक २७-०७-२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांचेकडे मागणी केलेली माहिती अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्या-पासून १५ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरविण्याची व्यवस्था करावी.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर जिल्हा अहमदनगर यांनी जन माहिती अधिका-यास संपूर्ण सहकार्य करुन अपिलार्थीस वरील मुदतीत माहिती प्राप्त होईल असे पाहावे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३० जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद नामदेव शिंदे, मु. पो. तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/४३९

निर्णय दिनांक ३०-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.रघुनाथ जगन्नाथ आंबेडकर<br>रा.आळवणी, ता.पारनेर,<br>जिल्हा-अहमदनगर | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>शेवगाव, जि.अहमदनगर. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम (रो.ह.यो.)<br>विभाग अहमदनगर. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३०-०७-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.रघुनाथ जगन्नाथ आंबेडकर, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगांव, श्री.बी.के.आदमाने (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (रो.ह.यो.) विभाग अहमदनगर श्री.एम.एम.सुरकटवार, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २३-०५-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडील शाखा अभियंता, श्री.ए.व्ही.खेडकर व शाखा

अभियंता, श्री. व्ही.एम.बडे यांनी सन २००५-२००६ मार्च अखेर केलेल्या सर्व कामांची खालील प्रमाणे माहिती मिळण्याबाबत अर्ज केला होता.

" अंदाजपत्रक,बीले यंच्या झेरॉक्सप्रती, पेजींग व स्वाक्षांकित करुन कामनिहाय मिळाव्यात तसेच उपविभागातील टेंडर रजिष्टरची झेरॉक्स प्रती मिळाव्यात. "

सदर माहिती अपिलार्थीने २००५-२००६ या कालावधीतील मागितली असून ती त्यांनी टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १५-०७-२००६ रोजी त्यास प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस त्यांचे कार्यालयामध्ये शाखा अभियंता यांनी केलेल्या कामाचे स्वतंत्र असे रेकॉर्ड ठेवता येत नाही. त्यामूळे अपिलार्थीस माहिती देता येत नाही, असे कळवून अपिलार्थीचा अर्ज दिनांक- २३-०२-२००५ रोजी निकाली काढल्याचे कळविले.

जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २२-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २१-०९-२००६ रोजी ठेवली होती. दिनांक- २१.०९.२००६ रोजी अपिलार्थी उपस्थित असतांना देखील जनअपिलीय अधिकारी यांनी 'अपील कामी वेळ नाही.' असे सांगून या प्रकरणी प्रथम अपीलाची सुनावणी त्यांनी घेतली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तथापि या दिवशी मा.उच्च न्यायालयात महत्वाचे काम असल्यामूळे ही सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी घेतली नाही. असे जनअपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. याच दिवशी (२१-०९-२००६) अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांना पत्र देवून ते राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करीत आहे, असे सांगितल्यावरुन जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रथम

अपीलाची  सुनावणी पुढे घेतली नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर विहित मुदतीत निर्णय न घेतल्यामूळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी  हे गैरहजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात प्रथम अपीलावर सुनावणी दिनांक- ०७-०८-२००६ रोजी ठेवली होती तथापि त्या दिवशी मा.मंत्रीमहोदयाच्या कार्यक्रमात ते व्यस्त असल्यामूळे ही सुनावणी होवू शकली नाही. तदनंतर ही सुनावणी दिनांक- ०९-०८-२००६ रोजी ठेवण्यात आली होती. त्या दिवशी कार्यालयास सुट्टी होती, त्यामूळे ही सुनावणी झाली नाही. तर पुढील सुनावणी दिनांक- २१-०९-२००६ रोजी घेण्याचे ठरले असतांना जनअपिलीय अधिकारी यांना मा.उच्च न्यायालयात जावे लागल्यामूळे, ही सुनावणी होवू शकली नाही. असे जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले व त्यास पूरक कागदपत्रे आयोगास सादर केली. या पत्रान्वये आयोगास असे आढळून आले आहे की, मुळात जनअपिलीय अधिकारी यांना  अपिलार्थीच्या अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय घेता येणे या ना त्या कारणाने शक्य झाले नाही. त्यामूळे अपिलार्थी यांची अशी धारणा झाली की, या अपीलावर निर्णय देण्याकरिता जनअपिलीय अधिकारी हे फारसे उत्सूक नाहीत. त्यामूळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे न्यायासाठी धाव घेतली. जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थीचे अपील ठरविण्यात थोडा कानाडोळा केला असल्याचे जाणवते. जनअपिलीय अधिकारी यांना उपरोक्त परिच्छेदात उल्लेख केलेल्या दिवशी अचानकपणे जरी कामे उद्‌भवली असली तरी त्या नंतरच्या लगतच्या तारखा ते अपिलार्थीस देवू शकले असते व अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर ते निर्णय देवू शकले असते. जनअपिलीय अधिकारी यांच्या या उदासिनवृतीच्या

संदर्भात त्यांच्या वरिष्ठ प्रशासनाने यथायोग्य दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज सुनावणीस उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी यांना या अपिलार्थीच्या मागितलेल्या माहिती विषयी विचारले असता त्यांनी, ती माहिती अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्यानंतर सात दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर मान्य केले. तेंव्हा असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश पारीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत स्वाक्षांकित करुन, स्पष्ट स्वरुपात व विनामुल्य पुरवावी.

त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती मागणीसाठी केलेल्या अर्जास सुमारे पंधरा दिवस इतका असमर्थनीय विलंब, प्रथम प्रतिसाद देण्यासाठी लावला आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या हया असमर्थनीय विलंबाबद्दल तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळाव्यात, असे त्यांना सुचीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश पारीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत स्वाक्षांकित करुन,स्पष्ट स्वरुपात व विनामुल्य द्यावी.

३. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या या विलंबाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून

त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळाव्यात. असे सूचित करण्यात येत आहे.

अहमदनगर | **(वि. बा. बोरगे)**
दिनांक- ३०-०७- २००७. | **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.रघुनाथ जगन्नाथ आंबेडकर (पत्रकार)
राहणार-आळवणी, तालूका- पारनेर, जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगांव, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, (रो.ह.यो.) विभाग अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग नाशिक यांना जनअपिलीय अधिकारी यांच्या, त्यांनी या प्रकरणी दाखविलेल्या उदासिन वृत्तीची नोंद घेण्यासंदर्भात.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६३

निर्णय दिनांक ३१-०७-२००७

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी

मु. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा वनक्षेत्रपाल, अंबड जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप वनरक्षक, वन विभाग, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख, अंबड जिल्हा जालना (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, अंबड जिल्हा जालना श्री. रत्नाकर रामचंद्र भोईटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, वन विभाग, औरंगाबाद श्री. ओमप्रकाश सदाशिवराव चंद्रमोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “वनक्षेत्रपाल श्री. भालेराव यांच्या कार्यक्षेत्रातील रोहयो अंतर्गत गावनिहाय कामाची यादी, मातीनाला बांधकाम, मजूरी हजेरीपत्रके, गहू कुपन यादी, अंदाजपत्रके तपशील (अंबड कार्यक्षेत्रात).”

सदर माहितीचा कालावधी अपिलार्थीने २००५ ते २००६ असा दर्शविला असून सदर माहिती कोणत्या मार्गाने हवी याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-११-२००६ रोजी प्रथम अपिल केले, तथापि या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस विहीत मुदतीत माहिती न देता एक प्रकारे माहिती दडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला असल्याचे म्हटले आहे.

अपीलार्थी यांच्याकडून सुनावणीसाठी अपील दाखल झाल्यानंतर जन अपिलीय अधिका-याने विहीत मुदतीत सुनावणी न घेणे ही बाब निश्चित आक्षेपार्ह आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जर अपिलाची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहीत केलेल्या मुदतीत प्रथम सुनावणी घेतली असती तर अपीलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे कदाचित व्दितीय अपील करावे लागले नसते व पर्यायाने अपीलार्थीस आयोगाकडे जाण्याचा त्रास झाला नसता हे येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न पुरविण्याची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अभिलेखे विभागीय कार्यालयात

उपलब्ध असल्यामुळे ते सदर माहिती अपीलार्थीस विहित मुदतीत ते देऊ शकले नाहीत असे त्यांनी प्रतिपादन केले. त्याच बरोबर त्यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे तथापि ही माहिती अपूर्ण आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली असल्याने त्यांनी अपीलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अपिलाची सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीच्या त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण आहे, या मुद्दयामध्ये आयोगास तथ्यंशः आढळून आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली दिनांक २९-०१-२००७ ची कथित माहिती अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही असे आयोगाचे मत आहे, अद्यापही अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या कामाच्या मस्टरच्या प्रती व ज्या मजुरांना गव्हाचे कुपन्स वाटप करण्यात आले त्या कुपनची मजूरांच्या नावासहीत यादी व अंदाजपत्रकाच्या प्रती जन माहिती अधिका यांच्याकडून पुरविल्या गेली नाहीत. अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती आवश्यक असल्याच्या मुद्यावर ते आजही दृढ आहेत.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये माहिती अधिकार अधियिम २००५ मधील विहीत कालावधीपेक्षा २ महिने १८ दिवस इतका विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती न देता येण्याचे कारण म्हणजे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती एवढे एकच आहे हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये खरोखरच स्वारस्य असते तर त्यांनी विभागा-च्या कार्यालयात जाऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित माहितीच्या मस्टरच्या प्रती, मजुराची यादी, गव्हाच्या कुपनची यादी इत्यादी तपशील त्यांनी स्वंयप्रेरणेने अपिलार्थीस

उपलब्ध करुन दिला असता, तथापि त्यांनी या प्रकरणात असे काहीही केल्याचे दिसत नाही. त्याच बरोबर अपीलार्थीस जी माहिती दिली आहे ती देखील अर्धवट स्वरुपात दिली आहे. या प्रकरणातील त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीमध्ये कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशित करण्यात येते की,

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे त्यांचेकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस स्पष्टपणे, साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित झाल्यानंतर १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

२. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर व अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस स्पष्टपणे, साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित झाल्यानंतर १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये यथायोग्य प्रशासकीय कारवाई

करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

| | |
|---|---|
| १ | श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पिंपळगाव रेणुकाई, तालुका भोकरदन, जिल्हा जालना |
| २ | जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, अंबड जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. |
| ३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप वनरक्षक, वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. |
| ४ | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), वन भवन, उस्मानापुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. |
| ५ | सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी. |
| ६ | निर्णय नस्ती |

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३०५

निर्णय दिनांक ३१-०७-२००७

श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर, : अपीलार्थी

(सचिव) बसवेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था

मर्यादित, वसमतनगर,

तालुका वसमतनगर जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, वसमतनगर तालुका वसमतनगर,<br>जिल्हा हिंगोली | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा. प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर, वसमतनगर जिल्हा हिंगोली हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, वसमतनगर तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली श्री. डी. ई. नामवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. सोमनाथ गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००६ च्या अर्जामध्ये एकूण १० मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक ०४-०५-२००६ रोजी प्राप्त झाला.

१. “लाईटसाठी ना हरकत व बांधकामाचा घर क्रमांक देणे बाबत,

२. संस्थेचे सचिव म. पि. भवानकर याची बांधकामाची पूर्ण फाईल गुंठेवारीमध्ये करण्यास दाखल केली आहे काय व कोणत्या कागदपत्रांची पुर्तता करणे आहे याबाबत कळविणे,

३. घर क्रमांक १७६० हा पंडीत तात्याराव फुलझळके आपल्याकडे न येता सदर क्रमांक आपल्या हस्तकाला देवून मोकळे झालात व आता ह्या घर क्रमांक १७६० कोणचा आहे ही बाब गैरप्रकारे झाली आहे कारणे कळवावी,

४. नगर परिषदेने ०-१६ जागेवर न. प. कर्मचारी यांना परवाने दिले आहेत त्याचा टोच नकाशा व लेआऊटची सत्यप्रत संस्थेस पुरविण्यात यावी कारण सदर जमीन संस्थेच्या ताब्यातील आहे,

५. सुधारित आराखड्यामध्ये जमीन १-१२ आरक्षण क्र. २० आहे तर मग आरक्षण क्र. २९ वर किती जमिनीवर आरक्षण आहे व त्याचे क्षेत्र व आरक्षणापुर्वी जमीन मालकास दिलेल्या नोटीसीची सत्यप्रत देण्यात यावी,

६. आपण संस्थेला लागून ४ एकर १७ गुंठे जी जमीन खरेदी केली आहे त्याचा योग्य खरेदीखत व मोजणी केलेला टोच नकाशा संस्थेला देण्यात यावा,

७. संस्थेत ब-याच अनाधिकृत व गैर सभासदांनी आपआपले पक्के बांधकाम केले जे की आपल्या सहकार्याने झालेले आहे अशा सर्वांची नांवे संस्थेला देण्यात यावीत,

८. महादेव चमकूटे यांच्या तक्रार अर्जाची नक्कल द्यावी.”

अपीलार्थीने सदर माहिती कशा प्रकारे हवी आहे याबाबत फक्त ''नाही'' असे लिहिले आहे.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक १९-०५-२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी हिंगोली यांच्याकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपील अर्ज जिल्हाधिकारी हिंगोली यांचेकडून जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यांच्याकडे दिनांक २२-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अपीलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२००६ रोजी या प्रकरणी सुनावणी घेऊन अपीलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेश पारीत केले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००६ रोजी पारीत केले.

या अपील निर्णयाची वाट न पाहता अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी केलेले व्दितीय अपीला-मध्ये संस्थेच्या जमिनीवर गैर सभासदांनी केलेले बांधकाम मोकळे करुन ती जागा संस्थेस उपलब्ध करुन देण्याची विनंती आयोगास केली. त्यांनी आयोगाकडे कोणत्याही विशिष्ट स्वरुपाच्या माहितीची मागणी केलेली नाही किंवा कोणतीही माहिती न पुरविल्याने, त्यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे, असा उल्लेख केलेला नाही तथापि अपिलार्थीने अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून

मिळालेली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे असे अनुमान काढून या अपिलाची सुनावणी घेण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००६ रोजी व ०९-०८-२००६ रोजी अशा दोन टप्प्यात दिल्याचे सांगितले, तथापि जर त्यांनी अपीलार्थीस दिनांक ०९-०८-२००६ रोजी माहिती दिली होती तर त्यांनी प्रथम सुनावणीच्या वेळेस ही बाब जन अपिलीय अधिका-याच्या निदर्शनास का आणली नाही असे विचारले असता त्यावर ते समाधानकारक खुलासा आयोगास करु शकले नाहीत.

या प्रकरणाची पाश्वभूमी समजावून घेतली असता असे सांगण्यात आले की, अपीलार्थी श्री. भवानकर यांनी त्यांच्या संस्थेची जागा अकृषिक करण्यासाठी व सदर जागेस विद्युत पुरवठा करण्यासाठी नगरपरिषदेकडे नाहरकत प्रमाणापत्राची मागणी केली होती, तथापि या जागेवर दुस-या कारणाकरिता नगरपरिषदेने आरक्षण ठेवले असल्यामुळे नगरपरिषदेने नाहरकत प्रमाणपत्र देणे शक्य नव्हते व त्याप्रमाणे त्यांनी सुरुवातीस अपिलार्थीस कळविलेही, तथापि तदनंतर अपीलार्थीस त्यांनी हे नाहरकत प्रमाणपत्र देऊन अपिलार्थीचा प्रश्न सोडविला असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. जागेवर आरक्षण असतांना विद्युत पुरवठा व अकृषिक वापरासाठी नगरपरिषदेने नाहरकत प्रमाणपत्र देणे ही नगरपरिषदेची कृती जरी अवैध असली तरी त्याच्या तपशीलात आयोग जाऊ इच्छित नाही. आजच्या सुनावणीस अपीलार्थी हे अनुपस्थित राहिले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे हे पाहता व अपीलार्थीस ही माहिती आता मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य असल्याचे दिसून येत नसल्याने अपीलार्थीचे हे अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर पिलाप्पा भवानकर, (सचिव) बसवेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, वसमतनगर, तालुका वसमतनगर जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, वसमतनगर तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/३१८
निर्णय दिनांक ३१-०७- २००७.

१.  श्रीमती.प.गं.कोदरकर, .. अपिलार्थी.
स्वातंत्र्य सैनिक,
'रेणूका' छत्रपती नगर, गारखेडा,
औरंगाबाद.

विरुध्द

१.  जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
विभाग नियंत्रक, राज्य परिवहन
महामंडळ, बीड, जिल्हा-बीड.

२.  जनअपिलीय अधिकारी तथा ..
प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्रीमती प.गं.कोदरकर, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हया गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड, श्री.प्रकाश बाजीराव जगताप, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.प्रमोद किशनराव महेंद्रकर, सहाय्यक वाहतूक अधिक्षक ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्यावर माहितीची मागणी केली होती.

" १. मार्च महिन्याच्या पुढील वर्षाच्या पासचे नुतनीकरण करुन घ्यावे लागते तथापि शेवटच्या दिनांकास होणारी भाऊगर्दी टाळण्यास्तव मार्चच्या शेवटच्या आठवडयात असे पास मिळणे आवश्यक आहे. तरी प्रत्येक वर्षी कोणत्या दिनांकापासून मार्च मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना पास दिले जातात.

२. आपणाकडून पास मिळाल्यापासून स्वातंत्र्य सैनिकांना जिल्हाधिका-याकडील पत्रा व्यतिरीक्त आपणाकडे वेगळा अर्ज करणे आवश्यक आहे काय ?

३. सदरहू अर्जात मी पासचा गैरवापर करणार नाही असे स्वा.सै.ने लिहुन देणे बंधनकारक आहे काय ?

४. महामंडळाचे कर्मचारी त्यांच्या सेवा बसमधून प्रवास करुन पार पाडतात. बसमध्ये स्टॉप नावाचा प्रवासी हमखास आढळतो. त्याबाबत २००५ मध्ये औरंगाबाद येथील दैनिक लोकमत ने विस्तृत अहवाल / माहिती प्रसिध्द केलेली आहे, असे करणे गैरवापर ठरत नाही का ?

५. महामंडळाच्या कर्मचा-यांना पास मिळतो. त्यावर त्याने केलेल्या प्रवासाचा तपशिल नोंदवावा लागतो तो नोंदविला जात नाही. ही बाब गैरवापर प्रकारात येत नाही काय ?

६. स्वातंत्र्य सैनिकांना महामंडळ सन्मानाने पास देत आहे काय ? असल्यास त्यांचेवर अविश्वास दाखविणे हा त्यांचा अनादर ठरत नाही काय ?

७. पास नुतनिकरणासाठी महामंडळाने ठराविक कालावधी कायमस्वरुपी ठरविल्यास नुतनीकरणासाठी आलेल्या वृध्द स्वातंत्र्य सैनिकांना परत हेलपाटा

घालाव्या लागू नये, या बाबत काही कायमस्वरुपी उपाययोजना आहेत काय, असल्यास कोणत्या ?

अपिलार्थीने सदर माहिती रजिष्टर पोष्टाने मागविली आहे.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेल्या वरील सात मुद्यावर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे. याची नोंद घेण्यात येत आहे. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-०४-२००६ रोजी केलेला अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक-१२-०४-२००६ रोजी पोंचल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या प्रथम माहितीच्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ११-०५-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देवून माहिती पुरविली आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार दिनांक- ११-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांचा निर्णय पत्राव्दारे दिनांक- ०१-०८-२००६ रोजी कळविला. त्या निर्णयामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीशी सहमती दर्शविली आहे. जनअपिलीय अधिकारी यांची हे अपील सुनावणीची ही कृती अपील ठरविणे प्रकरणी, अभिप्रेत असलेल्या कार्यपध्दतीशी पूर्णपणे विसंगत आहे. त्यांनी या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्र बोलावून दोघाचेही म्हणणे ऐकून घेवून आपला निर्णय आदेशाव्दारे पारीत करणे, हे ‘अपील ठरविणे’ या प्रकारात अभिप्रेत आहे. यापुढे अपील

ठरवितांना अशा प्रकारच्या पध्दतीचे पालन केले जाईल, याची खबरदारी जनअपिलीय अधिकारी यांनी कटाक्षाने घ्यावी, असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या निर्णयाने व्यथीत झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये अपिलार्थीने, जनमाहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती दिली नाही व जनअपिलीय अधिकारी यांनी लेखी व तोंडी बाजू मांडण्याची संधी दिली नाही, असे व्दितीय अपीलाचे कारण दर्शवून आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थी हे स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्यावर आपले अभिप्राय दिलेले आहेत. मुद्दा क्रमांक- 'अ' च्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी पासचे नुतनीकरण करण्याकरिता अपिलार्थीने काय करावे, याचे मार्गदर्शन करुन पासची मदत संपण्यापूर्वी आठ दिवस आधी पासचे नुतनीकरण करुन घेता येईल, असे कळविले आहे. तथापि अपिलार्थीस नेमक्या कोणत्या तारखेपासून हा नविन पास दिला जाईल, याबाबत माहिती हवी असल्याचा त्यांनी व्दितीय अपीलामध्ये उल्लेख केला आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या मुद्दा क्रमांक-'ब' च्या वर जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरा संदर्भात अपिलार्थीने आयोगास असे कळविले आहे की, पास नुतनीकरणाच्या अर्जामध्ये 'मी या पासचा गैरवापर करणार नाही.' असे प्रमाणपत्र स्वातंत्र्य सैनिकाने देण्याबाबत कोणताही उल्लेख नाही. तथापि बीड आगाराने स्वातंत्र्य सैनिका कडून, ' मी पासचा गैरवापर करणार नाही,' असे लिहून घेतले असल्याची बाब आयोगास निदर्शनास आणून दिली आहे. बीड आगाराने आपल्या मनानेच हया छापील

अर्जामध्ये बदल का केला, या सबंधी अपिलार्थीस माहिती हवी आहे. मुद्दा क्रमांक-'क' च्या संदर्भात महामंडळातील कर्मचारी त्यांच्या सेवा बसमधून प्रवास करुन विनातिकीट प्रवास करत असतात व या सदंर्भाचे वृत्त 'दैनिक लोकमत 'मध्ये प्रसिध्द झाले असून या बाबत महामंडळाने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याचबरोबर मुद्दा क्रमांक-'ड' च्या संदर्भात महामंडळाच्या कर्मचा-यांच्या कौटूंबीक प्रवासाची नोंद त्यांच्या पासवर ती करणे जरुरीचे असतांना देखील तशी नोंद करत नाहीत व मुद्दा क्रमांक- 'ई' बाबत आगार प्रमुखांना, स्वातंत्र्य सैनिकांना पासासाठी हेलपाटा पडू नये, याबाबत दिलेल्या सूचनाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. इ.बाबी. त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणल्या आहेत.

जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या या प्रतिक्रियासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक- ११-०५-२००६ रोजीच्या माहितीमध्ये हया सर्व माहितीचा समावेश असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यांनी आयोगाच्या हेही निदर्शनास आणून दिले की, बीड येथील आगाराने 'मी पासचा गैरवापर करणार नाही,' अशा अर्थाचे प्रमाणपत्र कोणत्याही स्वातंत्र्य सैनिकाकडून लिहून घेतले नाही, या संदर्भात बीड आगाराकडे अपिलार्थीने स्वतः दिलेल्या अर्जाची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. यामध्ये मी पासचा गैरवापर करणार नाही, अशा कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र अपिलार्थीने बीड आगाराकडे सादर केल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर स्वातंत्र्य सैनिकाने एसटी बसमधून प्रवास करीत असतांना सदर पास मिळविण्यासाठी मोफतचा पास देण्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने जे दिनांक २० मार्च, १९९१ चे परिपत्रक काढले आहे. त्या परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस

जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. या परिपत्रकामध्ये सर्वात शेवटी स्वातंत्र्य सैनिकाच्या सदर सवलती बाबत तक्रारी येणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व विभाग नियंत्रकांना दिले आहेत.

अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांना जरी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली असल्याचे आज रोजी झालेल्या सुनावाणीमध्ये दिसून आले आहे.

अपिलार्थी यांनी पास नुतनीकरण करण्याकरिता महामंडळाने ठराविक कालावधीत कायमस्वरुपी ठरविण्याची विनंती राज्य परिवहन महामंडळास केली आहे. त्या विनंती संदर्भात राज्य परिवहन महामंडळाने या विषयाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन निर्णय घ्यावा, असे त्यांना निर्देशीत करण्यात येते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये सुसंगती दिसून आल्याने अपिलार्थीचे आयोगापुढे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. तथापि अपिलार्थीने पास नुतनीकरण करण्याकरिता निश्चीत कालावधी ठरविण्या विषयी महामंडळाकडे केलेल्या अर्जाबाबत महामंडळाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा, असे निर्देशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ३१-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्रीमती प.गं. कोदरकर, 'रेणूका' छत्रपती नगर, गारखेडा, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, डॉ. आनंद नायरमार्ग, मुंबई सेंटर, मुंबई-८

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/४११
निर्णय दिनांक ३१-०७- २००७.

१. श्री.गोरख वामनराव पवार, .. अपिलार्थी.
श्रध्दा कॉलनी, म्हाडा, औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
उपविभागीय अभियंता, सा.बां.
उपविभाग फुलंब्री,जि.औरंगाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.गोरख वामनराव पवार, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, श्री.ओ.जी.चिंचोलीकर, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद,श्री.पी.के.पाटील,( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

> “ श्री.एम.एम.कोल्हे, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री येथे रो.ह.यो. योजनेतून १ फेब्रूवारी २००१ ते ३० मार्च २००१ या कालावधीत हाती घेतलेल्या कामावर नोंदविलेले हजेरीपटाचे झेरॉक्स प्रती. ”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यास दिनांक- २१-११-२००५ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस निश्चीतपणे कोणत्या कामावरील हजेरीपटाची त्यांना माहिती हवी आहे. याचा खुलासा करण्याचे अपिलार्थीस सुचीत केले. अपिलार्थीने जनमाहिती

अधिकारी यांच्या पत्रावर त्यांच्याकडील दिनांक- ०८-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. या उत्तरामध्ये त्यांनी श्री. एम.एम.कोल्हे यांच्याकडील सर्व कामाविषयी त्यांना माहिती अपेक्षित असल्याचे जनमाहिती अधिकारी यांना स्पष्ट केले. तथापि या नंतरही जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याच प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार दिनांक १०-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २०-०३-२००६ अन्वये सुनावणी दिनांक २६-०३-२००६ रोजी ठेवली असल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या या कथित सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी निश्चीतपणे कोणताही निर्णय न घेता जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- १९-०४-२००६ रोजी पत्र लिहिले. या पत्रामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे आदेश न देता जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५०/- याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही का करण्यात येवू नये, या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले. त्याचबरोबर सदर सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी शासकीय सुट्टीच्या दिवशी ठेवल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थीच्या सुनावणीवर कोणत्याही प्रकारे ठोस निर्णय न देता जनमाहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागण्याची जनअपिलीय अधिकारी यांची ही कृती त्यांनी घेतलेल्या या कथित सुनावणीवरील हा निर्णय अवैध ठरविते. मुळातच जनअपिलीय अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिन २५०/- रुपये शास्ती लावण्याचे अधिकार माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार त्यांना नसताना त्यांनी सदर शास्ती जनमाहिती अधिकारी यांना लावण्याचे सूचीत करणे, ही त्यांची कृती त्यांच्या अधिकार मर्यादेचे उल्लंघन करणारी व म्हणून ती चुकीची आहे, हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारच्या मिळालेल्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी सुनावणीस हजर राहीले नाहीत याची नोंद आयोगाकडून घेण्यात आली आहे. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास असे सांगण्यात आले की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये विनामुल्य दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्या प्रित्यर्थ अपिलार्थीची 'माहिती मिळाली' अशी पोंचपावती आयोगास दाखविली. अपिलार्थीस आता जरी माहिती मिळाली असली तरी ती माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या तरतूदीपेक्षा साडेआठ महिने इतक्या विलंबाने दिली असल्याचे सिध्द होत आहे. या प्रकरणी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे प्रतित होते की, जनमाहिती अधिकारी यांनी मूळातच अपिलार्थी यांना, अपिलार्थीस निश्चीतपणे कोणत्या कामाची माहिती हवी आहे, अशा प्रकारची विचारणा करुन ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी टाळाटाळ केली आहे. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी अपील ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत असलेली पध्दत न पाळता आपल्या अधिकार मर्यादेचे उल्लंघन करुन जनमाहिती अधिकारी यांना त्यांचे स्पष्टीकरण मागविणारे पत्र लिहीणे, ही त्यांची कृती माहिती अधिकार अधिनियमा विषयी, त्यांच्या दैनंदिन कामामध्ये आवश्यक असलेल्या ज्ञानाचा त्यांना गंधही नसल्याचे स्पष्ट करते. त्यांच्या या वर्तनाची नोंद त्यांच्या वरीष्ठ प्रशासनाने घ्यावी, असे सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना सूचीत करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यास जे तत्कालीन माहिती अधिकारी जबाबदार आहेत ते अशाच प्रकारच्या अन्य प्रकरणात निलंबीत होवून आता सेवेत पुर्नस्थापित झालेले आहेत. असे सध्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यास टाळाटाळ केली, अपिलार्थीस ही माहिती सुमारे साडेआठ महिने इतक्या विलंबाने दुस-या प्रभारी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली. हे सर्व प्रकार पहाता, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी हे निश्चीतपणे दोषी आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्यांनी हे प्रकरण बेजबाबदारपणे हाताळून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा सिध्द केला आहे. तेंव्हा असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दाखविलेल्या हया कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदार वर्तनाबद्दल त्यांच्यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील प्रचलित तरतूदीस अनुसरुन यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व त्यांचा अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांच्यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील प्रचलीत तरतूदीस अनुसरुन यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही

करावी व त्यांचा अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत

झाल्यापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक ३१-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.गोरख वामनराव पवार, श्रध्दा कॉलनी, म्हाडा, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ रामाआ/अपील/सिआर/४१७

निर्णय दिनांक ३१-०७- २००७.

१. श्री.निबांळकर उदयसिंह प्रकाशराव .. अपिलार्थी.
मेनरोड, निंबाळकर गल्ली,
उस्मानाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
उस्मानाबाद.

२.	जनअपिलीय अधिकारी तथा ..
विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,
लातूर, जिल्हा-लातूर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३१-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.),जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद, श्री.लावंड बिभिषण तुकाराम, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

“१. उस्मानाबाद नगरपालिकेने मजूर सहकारी संस्था मार्फत कामे हाती घेण्याकरीता किती प्रस्ताव दिनांक- ०१ मार्च २००३ ते ३० सप्टेंबर, २००६ पर्यंतचे मा.चेअरमन / व्यवस्थापक उस्मानाबाद मजूर सहकारी संघ म. (फेडरेशन) मार्फत आपल्याकडे पाठविले आहेत. त्यापैकी आपण किती प्रस्तावांना शिफारस दिली त्याचा तपशील सोबत जोडलेल्या नमुण्यात देण्यात यावा.

२. काम वाटप समीतीचे सदस्य किती असतात. त्यांची नावे व कार्यकाल, त्यांच्या नियुक्तीचा कोणता निकष आहे त्या संबंधी शासन नियम व परिपत्रकाची सत्यप्रत.

३. मजूर संस्थेला काम वाटप करण्याची पध्दतीसंबंधी शासनाचे नियम व परिपत्रकाची सत्यप्रत. शासन नियमानुसार काम वाटप समितीच्या एका वर्षात किती मिटींग घेता येतात.

४. मजूर सहकारी संस्थेला कोण-कोणत्या प्रकारची कामे करता येतात आणि कोण-कोणती कामे करता येत नाहीत. या संबंधी शासन नियम व परिपत्रकाची सत्यप्रत.

५. जिल्हा मजूर सहकारी संस्था संघ (फेडरेशन) यांचा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे काय ? त्याची दिनांक व निकालाची अंतीम दिनांक

६. या निवडणुकीसाठी आपल्या कार्यालयास आचारसंहिता लागू आहे किंवा नाही. या संबंधी शासनाचे परिपत्रक द्यावे.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्या प्रित्यर्थ संबंधीत आवक जावक विभागाच्या कर्मचा-यांची स्वाक्षरी अपिलार्थीने आयोगास दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. याचा अर्थ हा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये

दिनांक- २४-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपीलअर्ज विभागीय सहनिबंधक यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर प्रकरणी अपीलीय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद हे आहेत. त्यामूळे अपिलार्थीचा अपीलअर्ज त्यांच्याकडे पाठविला असल्याचे त्यांच्याकडील पत्र दिनांक- २९-११-२००६ अन्वये कळविले आहे. तथापि सदर अपीलावर सुनावणी झाली नाही, असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे. त्यांच्या म्हणण्यास उपस्थित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी दुजोरा दिला आहे. तदनंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक- ०६-१२-२००६ रोजी त्यांच्याकडून, त्यांना माहिती घेवून जाण्याचे सूचीत केले. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांचे म्हणणे असे आहे की, जरी त्यांना माहिती घेवून जाण्यासाठी सूचीत केले असले तरी त्यांनी ती माहिती अपिलार्थीस पोष्टाने दिनांक- ०६-१२-२००६ रोजी पाठविली व अपिलार्थी यांना ती माहिती दिनांक- ०९-१२-२००६ रोजी प्राप्त झाली. सदर माहिती दिनांक- ०९-१२-२००६ रोजी प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने कबुल केले आहे.

तथापि सदरच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांच्याकडे सदर माहिती अपूरी असल्याबद्दल दिनांक- १६-१२-२००६ रोजी कळविले. या पत्राचे उत्तर प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी व्यथीत होवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २८-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम २० (१) २० (२) अन्वये कारवाइ करण्याची शिफारस करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम १३-१०-२००६ रोजीच्या केलेल्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस मागितलेली माहिती देणे संदर्भात कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीस सदर माहितीचा अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांना उद्देशून केला होता. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (प्रशासन) हे जनमाहिती अधिकारी आहेत. अपिलार्थीने मुळतः त्यांच्याकडील माहिती संदर्भातील अर्ज सहकारी निबंधक सहकारी संस्था (प्रशासन) यांच्याकडे करावयास हवा होता. तथापि त्यांनी सदर अर्ज जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांना उद्देशून केला. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (प्रशासन) उस्मानाबाद यांच्याकडे तो पाच दिवसात पाठवावयास हवा होता परंतू या प्रकरणी त्यांनी अशी कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामूळे अपिलार्थीला विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे अपील करावे लागले. तथापि त्यांनी ते जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांच्याकडे, अपिलार्थीस योग्य तो खुलासा करुन, परत पाठविले. या अपीलाची सुनावणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी कोणत्याही प्रकारे न घेता अपिलार्थीस दिनांक- ०६-१२-२००६ रोजी काही माहिती कळविली. सदर माहिती अपूरी असल्याचे अपिलार्थीस वाटल्याने त्यांनी शेवटी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लागणारी सर्व माहिती ( जी पूर्वी दिली नव्हती  त्यासह ) त्यांच्या बरोबर आणलेली आहे व त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे आज रोजी आयोगास सांगितले.

या सर्व घडामोडीमध्ये तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी आपले कर्तव्य चोखपणे व ज्या जबाबदारीने त्यांनी हे कर्तव्य पार पाडणे सामान्यतः अपेक्षित होते त्याप्रमाणे त्यांनी ते पार पाडले नाही. त्यांच्या या बेजबाबदार कार्य पध्दतीची नोंद सचिव, सहकार, मंत्रालय, मुंबई यांनी घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. असेही पुढे आदेशीत करण्यात येत आहे. या प्रकरणी जे प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी आहेत. अपिलार्थीचा अर्ज गेला किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नसल्याने जनमाहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाइ आदेशीत करण्यात येत नाही. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळण्यास तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद हे निश्चितपणे जबाबदार असून त्यांच्या या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीची नोंद संबंधीत प्रशासनाने यथायोग्यरित्या घ्यावी. याचा पुनरुच्चार करण्यात येत आहे. वरील विवेचनासह अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

३. अपील मान्य करण्यात येत आहे.

४. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

५.	तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद यांनी आपले कर्तव्य चोखपणे व ज्या जबाबदारीने त्यांनी हे कर्तव्य पार पाडणे सामान्यतः अपेक्षित होते त्याप्रमाणे त्यांनी ते पार पाडले नाही. त्यांच्या या बेजबाबदार कार्य पध्दतीची नोंद सचिव, सहकार, मंत्रालय, मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

औरंगाबाद	**(वि. बा. बोरगे)**
दिनांक ३१-०७-२००७	**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१	श्री.निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, मेनरोड, निंबाळकर गल्ली, उस्मानाबाद.

२	जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३	जनअपिलिय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४	सचिव, सहकार, मंत्रालय, मुंबई –३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५	सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

निर्णय नस्ती.